म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन



आगत नं.
ता.

# जाहांदार आणि नूरमाहताब.

हें पुस्तक

**हरी भगवंत भोळे**

यांनीं तयार केलें

तें

## पुरंदरे आणि कंपनीनें

सर्व हक्कांसह विकत घेऊन

मुंबईत,

"युनिव्हर्सल" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

आवृत्ति दुसरी.

---

सन १८९८, शके १८१९.

---

किंमत १ रुपया.

ह्या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें राखिले आहेत.

# प्रस्तावना.

आपल्या ह्या आर्यावर्त भूमिकेची प्राचीन स्थिति ध्यानांत आणली असतां चमत्कारिक प्रकारचे उद्गार अंतःकरणांत उत्पन्न होतात, कीं ज्या आर्यावर्त देशास इतर लोक बद्धांजुलीनें प्रणिपात करीत असत तोच देश सांप्रत परद्विपस्थांच्या स्वाधीन होऊन अगदीं दीन होऊन गेलेला आहे ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. आतां हा निकृष्ट दशेस कां आला ह्याचीं कारणें पाहूं गेलें असतां अनेक आढळून येतील, व त्या सर्वांचें वर्णन करूं लागल्यास एक मोठा ग्रंथच बनून जाईल. पूर्वीं या आपल्या देशांत महान पराक्रमी योद्धे रणशूर होऊन गेले, व ज्यांच्या शौर्यानें व अकलेनें व कलाकौशल्यानें हा देश इतर देशांवर आपलें वर्च्यस्व वाळगून असे तोच देश अज्ञानाचें प्राबल्य वाढून, द्वेषबुद्धीनें, आपस्वार्थीपणानें, मत्सरानें व दांभिक अभिमानानें अगदीं नीच अवस्थेस येऊन पोंचला हें एक आमच्या देशाचें दुर्दैवच समजलें पाहिजे. असो, अलिकडे आपल्या देशांत अनेक प्रकारचीं पुस्तकें, नाटकाचीं, गाण्याचीं व चमत्कारिक गोष्टींचीं वगैरे प्रसिद्ध ात आहेत; सांप्रत हें पुस्तक रचण्याचा माझा उद्देश हाच कीं, मला पूर्वींपासून अनेक पुस्तकें वाचण्याचा फार नाद आहे, त्याप्रमाणें एक हिंदुस्थानी पुस्तक वाचित

असतां सदरील गोष्ट मला चांगली लागल्यानें ती छापून प्रसिद्ध करण्याची इच्छा अंतःकरणांत उत्पन्न झाली; तथापि कोणतेंही कृत्य झालें तरी तें '**द्रव्येण सर्ववशः**' ह्याप्रमाणें आहे; ह्मणून कांहीं मित्रमंडळीची मदत मिळाल्यावर मला उमेद आली व हें पुस्तक छापविण्याचें हातीं धरिलें. पांच सहा फर्मे छापल्यावर दैवानें धांव घेऊन मध्येंच गाडा अडखळून टाकला, व बहुत विघ्नें उत्पन्न झालीं, परंतु तीं सर्व जगदीश कृपेनें लयास गेलीं. ह्या पुस्तकाच्या गोष्टीवरून वाचकांस इतकें समजून येईल कीं पूर्वी ह्या आपल्या आर्यावर्त देशांत स्त्रिया देखील युद्धकलेमध्यें निपूण होत्या, हिंदुस्थानाच्या बहिर प्रदेशांतील यवनादि लोकही येथील राजे लोकांशीं मोठ्या साम्यतेनें वागून प्रसंगीं परस्परांस सहाय करीत असत, व चांगल्याचा परिणाम चांगला व वाईटाचा वाईट हें दिसण्यांत येईल. ह्या पुस्तकांत लेखनानुसंधान घसरून पुष्कळ दोष आढळण्याचा संभव आहे व हा माझा प्रथमचाच प्रयत्न आहे ह्मणून त्या सर्व दोषांबद्दल विद्वज्जन मला क्षमा करतील अशी मी आशा करितों.

ह० भ० भोळे.

# जाहांदार आणि नूरमाहताब.

## श्लोक.

चमत्कृति निधानही कृति तुझी जगाच्या पते ॥
तुझेंच जगदंड जें अखिल चित्त आकर्षितें ॥
सुरम्य इतुकी जरी कृति तुझी तरी तूं किती ॥
अगम्य असशी प्रभो खुटतसे मतीची गती ॥

सर्व जगाचा व्यापक आणि त्राता जो प्रभु त्याचे आह्मीं मानवी प्राणी केवळ आज्ञाधारक सेवक आहोंत. हस्तपादादि विलक्षण अवयवांनीं जो त्यानें आपला पुतळा बनविला आहे. त्याच्या सुक्ष्म घटनेविषयीं क्षणमात्र विचार केला असतां आपली मति अगदीं गुंग होऊन जाते. पृथ्वी, आप, तेज, वायु इत्यादि पंचमहाभूतांची या सृष्टींत सर्वापेक्षां जास्ती आवश्यकता आहे, त्यांचा पुरवठा त्यानें किती विपूल केला आहे, व ज्या ज्ञानशक्तीच्यायोगें व्याघ्रादि महाबलाढ्य पश्वादिकांवरही आपण आपल्या विजयश्रीचा झेंडा मिरवितों. ती व अशा त्याच्या दुसऱ्या अमोल्य देणग्यांविषयीं जों जों विचार करावा तों तों आपणावर त्याची ममता किती आहे याविषयीं खात्री होऊन आपण चकित होऊन जातों तरी असा जो आपला दयालु त्राता त्याची अवज्ञा केली असतां आपण महत्पातकी होऊं व अंतकालपर्यंत सुखाचा लेशही आपणास प्राप्त होणार नाहीं

परंतु शुद्ध अंतःकरणानें त्या अनंतकोटि ब्रह्मांडनायकावर भाव ठेऊन सर्वकाळ सदाचरणांत घालवील त्यास मोठें सुख प्राप्त होऊन त्याची कीर्ती दिगंतरीं गाजेल यांत तिलप्राय तरी संदेह आहे काय? त्याच्या आज्ञेप्रमाणें आपला वर्तनक्रम असून जर वर्तनप्राय स्थितींत संकटानें आपण वेष्टिले गेलों असून अगदीं निराश्रित झालों तरी न डगमगतां संकटसमयीं धैर्य हाच पिता, क्षमा हीच जननी असून ज्ञानामृत हेंच भोजन याचें सेवन केलें असतां त्याचें परमेश्वर विलक्षण रीतीनें संरक्षण करितो, व शुद्ध अंतःकरण ठेऊन इहलोकीं व परलोकीं सुख देणारा जो प्रभु, त्यास अनन्यभावें करून शरण गेलें असतां अत्यंत सुख होतें हें स्पष्ट दिसून येईल.

अहाहा! हा वर्षाऋतु किती आनंदकारक आहे!! जिकडे पहावें तिकडे शेतें, मळे, डोंगर इ० हिरवेगार दिसतात. शेतकरी लोक आनंदानें शिदोऱ्या घेऊन, खांद्यावर असूड टाकून शेतावर नांगर हांकण्यास जातात, आकाशांत प्रचंड मेघांचा गडगडाट होत असतो, चकचक विजा चमकून धडाधड मोठे प्रतिध्वनि होत असतात, तेणेंकरून भीति व अंतःकरणांत जगन्नियंत्या प्रभोच्या अपार सामर्थ्याचें दिग्दर्शन होत असतें. अशासमयीं एक खुबसुरत तरुण मुलगा सुमारें २० वर्षांच्या वयाचा आपल्या विचारांत गर्क असतां अनेक प्रकारचे तर्क मनांत आणीत एका डोंगराच्या पायथ्याशीं आपला घोडा हळू हळू चालवीत एका झऱ्याजवळ आला; त्या झऱ्याचें स्वच्छ उदक पाहून घोड्याखालीं उतरला, व घोड्यास एका झाडास बांधून आपण तोंड व हातपाय धुवून किबला पसरून निमाज

पडूं लागला. प्रार्थना आटोपल्यावर घोड्यावर बसून जाऊं लागला, तेव्हां त्यास कांहीं स्मरण होऊन आपणाशींच ह्मणतो.—अहाहा! परमेश्वराचे या जगांतील मनुष्यपक्षादि प्राण्यांवर तसेच ल्हानमोठे अणू रेणू प्रमाणें जीवजंतूवरही अनंत उपकार आहेत. ते तर विचारे अज्ञानी प्राणी मानिले आहेत, परंतु आह्मीं ज्ञानवान असतां त्याची कितीशी आठवण करितों. अरेरे! किती हा आमचा कृतघ्नपणा आहे! पण आह्मीं त्याचीं लेकरें आहोंत. व तो आमचा परम कृपाळू पिता आहे. खरोखर त्याची आह्मांवर किती ममता आहे. कारण एका कवीनें आपल्या एका अभंगांत कसें लिहिलें आहे पहा.—

**बाळ जाणेना मातेशीं ॥ तिचें चित्त बाळापाशीं ॥**
**तैसा देव हा दयाळू ॥ करी सर्वांचा सांभाळू ॥**

वाहवा! मी तरी किती अल्प मतिचा आहें!! मला हें ठाऊक असतां उगीच मी आपल्या मनांत चिंता करितों तसेंच एका यवन कवीचें काय ह्मणणें आहे.—

**“ जब दंत नथे तब दूध दियो अब दंत दिये कौं अन्न नदै है जो जलमे थलमे पशूपंखकी सुद लेत सो तोरी हू लैहै काहेको सोचकरे मनमुरख सोच करे कछु हाथना ऐहै जानकों देत अजानकों देत सो तो कुं हूं दै है. ”**

मग मी असा भ्रमांत कां पडलों! माझें राज्य गेलें ह्मणून काय झालें? पाकपर्वरदिगारची (ईश्वराची) जर आपणावर कृपा आहे तर तोच माझ्या मदतीस आकाशांतून आपले दूत पाठवून देईल! आतां एखाद्या शहरचा मार्ग

भरून एकाद्या राजाश्रयास जाऊन रहावें ह्मणजे कधींना-कधीं तरी आपली इच्छा पूर्ण होण्याचा संभव आहे. नाहीं तर असें अरण्यांत भटकून काय होणार? (क्रोधाचा आविर्भाव दाखवून) दुष्टांनीं संधी तरी कशी साधली कीं मी शहरांत नसतां एकाएकीं माझ्या वृद्ध पित्यास बंदीवान करून राज्य हस्तगत करून घेतलें. असो त्यांनीं माझ्या पित्याचा सर्व अधिकारच मात्र आपल्या स्वाधीन घेतला आहे. बाकी त्यास पाहिजे तिकडे जाण्यास व राज्य प्रकरणाखेरीज दुसरें पाहिजे तें करण्यास स्वतंत्रता दिली आहे, हा एक ईश्वरी प्रसाद असेंच समजलें पाहिजे, नाहीं तर त्याची बंदीखान्यांत काय दशा झाली असती! खरोखर. त्यानें प्राणच सोडिला असता. असो आपणांस हा व्याप करणें कशास पाहिजे! कोठें आपल्यामागें खाणारीं कोणी मनुष्यें आहेत कीं, त्याबद्दल आपणास काळजी वाहिली पाहिजे! अल्लाह ताल्लाचें (ईश्वराचें) नामस्मरण करीत सृष्टी-चमत्कार पाहत फिरावें ह्मणजे झालें. (आपल्या भावी प्रियेचे स्मरणानें) अरेरे! परंतु ती मूर्त्ती स्मरणांत आली ह्मणजे हें सर्व ब्रह्मज्ञान गुंडाळून ठेवावें लागतें! काय हा ईश्वरी चमत्कार तरी आहे! खरोखर स्त्रियांसारखा मोह-कारक पदार्थ जगतांत दुसरा कचितूच असेल! माझे क्ष-णोक्षणीं असे विचार तरी किती बदलतात हे! आपण जें तिला वचन दिलें आहे तें खरें करणार! मग माझ्या जि-वाचें कांहीं तरी होवो, पण मला थोडासा संशय येतो कीं जर माझ्या पाठीमागें दुसऱ्या कोणी त्या गुहेंतील च-मत्काराचा शोध लावून आणिला तर ती त्याला वरील! मग आपली ही सर्व खटपट व्यर्थ जाणारना? छे!

छे!! काय ही माझी विलक्षण कल्पना! तिनें पूर्ण वचन दिलें आहे कीं, मी परत येऊन तिला भेटून कांहीं खुलासा सांगितल्या शिवाय "मी दुसऱ्या मनुष्याशीं त्या गुहेविषयीं कांहीं संभाषण करीन, तर मला आपल्या पैगंबराचीच शपथ आहे." मग ती आपलें वचन मोडील! छे! छे! असें कधींच होणार नाहीं! ती सत्यवादिनी आहे ह्मणून आपला जो निश्चय झाला आहे तो कायम आहे. पुढें तो एका शहरच्या वेशी जवळ आला, तेव्हां सुमारें दहा वाजण्याचा समय झाला होता, नंतर शहरांत जाऊन एका मुशाफरखान्यांत (भोजनगृह खाणावळ) जाऊन उतरला. तेथील मनुष्यांनीं त्याचा घोडा वगैरे ठिकाणावर बांधल्यावर एक मनुष्य येऊन त्यानें त्यास वरील मजल्यावर नेऊन एका स्वतंत्र दिवाणखान्यांत नेऊन बसविलें, थोडक्याच वेळानें एक सेवक येऊन विचारूं लागला कीं, आपल्यास स्नान करण्याची इच्छा आहे कीं चहा·काफी व कांहीं फराळाचें आणूं? त्यानें आपली इछा स्नान करण्याची दर्शविल्यावरून त्या सेवकानें त्यास एका हमामखान्यांत (स्नान करण्याचें गृह) नेलें. ही खोली समचौरस असून संगमरवरी पाषाणांनीं बांधलेली होती, खोलीमध्यें उजेड स्वच्छ रितीनें पडत असे, खोलीच्या मध्यभागीं एक वाटोळा गरगरीत स्फटिकाचा गुळगुळीत केलेला चौरंग ठेविला होता. ह्या खोलीच्या एका बाजूस सात आठ नळांच्या चाव्याच फक्त दिसत असत, हें पाहून राजपुत्रानें त्या सेवकास प्रश्न केला कीं, ह्या इतक्या चाव्या कसल्या दिसतात? त्यावरून त्यानें उत्तर दिलें कीं, सर्व पाण्याचे टांक्याच्या नळांच्या ह्या चाव्या आहेत.

पहिली चावी आहे तींतून अगदी थंडगार पाणी येतें. दुसरींतून किंचित उष्ण उदक बाहेर येतें. तिच्या पुढील अधिकाधिक उष्ण पाणी येण्याच्या ह्या चाव्या आहेत. येथें स्नान करण्यास जे येतात त्यांच्या इच्छेप्रमाणें अधीक कमी उष्ण उदक जसें त्यांस सोसतें तसें मिळण्याकरितां ही व्यवस्था करून ठेविली आहे. नंतर दोन मनुष्यांनीं त्याच्या आंगास सुवासिक तेलें वगैरे लावून त्याच्या शरीराचें मर्दन केलें व जसें त्यास उष्ण उदक सोसत होतें तशा उदकानें त्यास स्नान घातलें. ही स्नानाची खोली इतक्या सोईची केली होती कीं, कदाचित कोणी फिरिस्ते श्रीमंत अथवा अमीर उमराव आपल्या कुटुंबासह येथें उतरल्यास त्यांच्या जनानखान्याच्या स्त्रियांसही स्नानें करण्यास कांहीं हरकत पडूं नये इतकी त्यांत सर्व व्यवस्था करून ठेविली होती. स्नान केल्यानंतर त्यानें थोडीशी काफी पिऊन लागलाच तो शयन करण्यास गेला. ह्या मर्दनाच्या व स्नानाच्या योगानें त्यास आपला थकवा उतरून गेल्यामुळें गाढ झोंप लागली. झोंपण्यापूर्वीं त्यानें सेवकांस सांगून ठेविलें होतें कीं, दोन तासांनंतर मला जागृत करावें, त्याप्रमाणें त्यांनीं त्यास जागृत केल्यावर त्यास चांगली भूक लागलेली होती ह्मणून त्यानें भोजन केलें व पान खात बसला असतां त्या खाणावळीच्या मालकानें येऊन त्यास सलाम केला व एका बाजूस अदबीनें उभा राहिला. राजपुत्रानें त्यास परत सलाम केल्यावर एका सेवकानें राजपुत्रास सुचविलें कीं हे गृहस्थ ह्या गृहाचे मालक असून आमचे धनी आहेत. हें ऐकून राजपुत्रानें त्यास जवळ येऊन

संग्रा ७८

बसण्याविषयीं सूचविलें. ह्याचें नांव मुबारिक असें होतें, नंतर राजपुत्राचें व त्याचें संभाषण सुरू झालें.

मु०—किबले आलम ! आप कौन शेहेरकें बाशिंदे हा और आपका किस लिये यह मुल्कमें आना हुवा येसब आपका हाल सुननेके लिये बंदा बहोत इंनतेजार है.

ज०—आहा ! ! अफसोस ! !

मु०—इस गरीबके जाये आप जैसे उतारा लेतें है इस लिये बंदेकु बहोत आसान होता है ( हात जोडून ) आपकु यहां कुच तस्दी या हरकत हुई होवे तो मुझे मवाफ् किजिये ?

जा०—इनशाअल्ला! आप ये क्या जबां निकालते हो! मैतो दिलमे ऐसा समजतां हु के मेरे घरसे जियादा यहां मेरा मरतबा हुवा; फिर गुन्हः क्या चीज है! जैसे आपने कबख्त हो वैसे आपके नोंकरोंभी नेक है. यहां आके मै बहोत आराम पायाहुं.

मु०—हम आपके बंदे गुलाम है.

जा०—नहीं नहीं! अपन सब बंदे तो खुदाताल्लाके है! आदम आदमका बंदा नहीं हो सकता अब मेरा हाल सुन लिजिये मैं एक शहाका फर्जंद हुं और सेहेल करनेके लिये शहरोंशहर फिरते फिरते यहांतक आ पोहोंचाहुं अब मेरा ऐसा इरादा है के इस शेहेरके राजाकों मिलकर कुच नौकरीखातर अर्ज गुजारना.

मु०—यहांका राजा बडा दाना आदमी है लेकिन बिचारेपर बहोतसे आफतिया आपडी है.

जा०—( अति आतुरतेनें ) इनशाह अल्ला! ऐसी क्या मुसिबते पडी है !

मु०—जनाब! उन्होंके खंडियारे चाऱ्हों तरफसे जंगमचाकर बहोत तश्दी देते है! इसलिये बिचारा बहोत हैरान है. दुसरे मुल्कसे कोनसेभी इसलामका आदम आवे तो उसिको अपने रैयतके मुवाफिक् जानताहै और तमाम रैयतकों अपने फर्जंदोंके मुवाफिक जानके अच्छि तऱ्हांसें सबको खुशीमें रखताहै, तमाम रैयत उसिके उप्पर बहोत खुशहै और अपने पैदरके मुवाफिक उसिके उपर पियार रखतें है.

जा०—( गुढगे टेकून ) या:पाकपर्वरदिगार ! ये क्या तेरे दरगाहका इनसाफ है! के नेकीसें चलनेंवालोंपर इतना गहजब!! और बदामाषोंपर मोहबत! नहीं नहीं!! ऐसा कभू न होवे! आखरतमे नेकी हीकी फत्ते होजायगी !! ( नंतर मुबारिकास दहा मोहरा देतो व प्रत्येक चाकरांस एकेक मोहर देतो तेणेंकरून सर्वजण खुशी होतात. )

जा०—( आपणाशींच ) आतां मी कचेरींत कोणत्या वेशानें जाऊं? आपल्या ह्या यवन वेशानें जावें किंवा दुसऱ्या वेशानें जावें? हिंदुच्या वेशानें गेलों तरी मला कोठें हरकत् पडणार नाहींच कारण मला हिंदूचे सर्व रितीरिवाज ठाऊक आहेत, व जे मला ठाऊक नव्हते त्या सर्वांची माहिती आपल्या आईकडून पूर्ण रितीनें मिळाली असून मला त्यांची भाषाही पूर्णतेनें अवगत आहे, तींत मी कधींच अडखळणार नाहीं. परंतु कदाचित मला कोणी ओळखिलें तर लोकांत हांसें होईल !! ओळखून तरी माझें कोण काय करणार आहे !! मी राजपुत्र आहें व माझी माता तर सांप्रत हिंदूची ( रजपूत ) कन्या असून माझा जन्मही आजोळीं हिंदुच्या रिवाजाप्रमाणेंच झाला! पण सकृत्दर्शनी तर मी मुबारकाच्या खाणावळींत

उतरलों मग विचार कसचा करितों ! आपल्या ह्या कायम यवनी वेशानेंच जाऊन राजास भेटावें. असें ह्मणून घोड्यावर बसून मुबारिकादि सर्वांचा निरोप घेऊन राजवाड्याकडे गेला. ह्या शहराचें नांव मत्सपूर असें होतें, कारण ह्या शहरचा आकार मत्स्याप्रमाणें होता येथें चंद्रकांत राजा राज्य करीत असे.

हें शहर फारच भरभराटींत असे व आपले शस्त्रबलें करून त्यावेळेस त्यानें सभोंवतांतील सर्व राज्यांचें आधिपत्य मिळवून आपल्या तलवारीची दहशत सर्वांवर बसविली होती. अशा भरभराटीच्या दिवसांत त्या शहराचें सौंदर्यही वर्णन करण्यास योग्य होतें. चौफेर आंबराई व बागबगीचे असल्यामुळें अगदीं सान्निध आलें असतां येथें जवळच शहर आहे कीं काय असा भास होत असे चौफेर मोठ मोठाले अगम्य तट केवळ मनोऱ्यांप्रमाणें भव्य आणि मजबूत असत, पायथ्यास एक मोठी नदी वाहत असून तिजवर मंडप घालून त्याजवर द्राक्षवेली सोडून दिल्या होत्या ह्मणून अगदीं गर्द छाया पडली होती. तेथें सूर्याचे कोमल किरण पडले असतां हजारों हिऱ्यांच्या चकचकाटाप्रमाणें एक मनोरंजक शोभा दिसून हें जलमंदिरच आहे कीं काय असा भास होत असे. तेथें शहरांतील संभावित लोक स्त्रियांसह जलक्रिडा करण्याकरितां सुंदर नौकेंत बसून मौजेनें इकडेतिकडे फिरत असत; शहरांत गेलें असतां तें केवळ एक विस्तीर्ण बागच दिसत असे. रस्त्याच्या चोहींबाजूस सुंदर कारंजीं उडत असून चहूंकडे वाहाणाऱ्या झऱ्यांचा मंद आवाज कांनीं पडून मोतिया, जाई, जुई, चमेली, शेवती

इत्यादि लहान लहान झाडें प्रफुल्लित होत्सातीं आपला मृदु आणि मधुर सुगंध झुळ झुळ वाहणाऱ्या मंद वायुंतून पसरीत असत. कोकिलादि पक्षांच्या मंजूलध्वनीनें सर्वकाळ आकाश भरून गेलेलें असे. चहूंकडे मोठ्या आनंदांत मयुरादि पक्षी थै थै नाचत असत. यामुळें हें इंद्रभुवनच आहे कीं काय असा भास होई. सूर्याच्या तीक्ष्ण किरणांचाही शिरकाव होणें कठीण, अशी गर्द छाया असून तेथें भर उन्हाळ्यांत दोनप्रहरीं थंडी वाजण्यास आरंभ होत असे. हा लहान चमत्कार काय ? त्याचप्रमाणें सुंदर व भव्य देवालयें, चमत्कारिक रंगानें सुशोभित केलेले राजवाडे, सभामंडप, तालिमखाने, शिकारखाने, बांधीव घाट व तलाव, मोठमोठ्या हवेल्या, फरसबंदी केलेले रस्ते व दुसरे अनेक तऱ्हेचे कारखाने असल्यामुळें मत्सपुराची शोभा फारच आल्हादकारक दिसत होती.

परंतु मांडलिक राज्यांत राजसिंहासनीं दुष्ट राजांची योजना झाल्या कारणानें आपण सर्व राजे एकोप्यानें रहावें, हें त्यांस आवडलें नाहीं, आणि सर्वांनीं आपणांस स्वतंत्रता मिळविण्याकरितां आपसांत युद्ध करण्यास आरंभ केला मग अर्थातच सर्व झोटिंगपादशाही होऊन गेली; देशचे देश ओसाड पडून रक्ताच्या नद्या वाहल्या, हजारों लोक यमसदनास गेले. शेतें पिकवणें बंद पडल्यामुळें मोठा दुष्काळ पडला. अन्न अन्न करून शेंकडों लोक गतप्राण झाले. वैधव्य प्राप्त झालेल्या स्त्रियांचे करुणास्वर कानीं येऊं लागले. सुधारणुकेचीं सर्व कामें बंद पडलीं; याप्रमाणें एकच गोंधळ होऊन गेला. आतां आपले भरभराटीचे दिवस गेले व नष्टचर्य स्वरूप आलें, असें शहाणे

व चतुर लोकांच्या मनांत पक्कें ठिंसून गेलें. परमेश्वर आपल्या देशावर कोपला ह्मणून अशा दुष्ट वासना लोकांस उत्पन्न झाल्या. असें चंद्रकांतासही वाटलें. आतां काय संकट कोणत्या वेळीं येईल या विचारांत तो निमग्न झाला. पुढील दुश्चिन्हें आतांच त्याच्या डोळ्यांसमोर उभीं राहिलीं. हे त्याचे विचार अक्षरशः खरे होते; परदेशांतील राजांनीं या देशावर अगदीं टक लाविली होती. आपणांस संधीं केव्हां मिळेल, आणि हा देश हस्तगत केव्हां करूं इकडे सर्वांचें लक्ष्य होतें. मग काय विचारावें, ज्या देशावर आपला हेतू त्याचीच अवस्था कशी आहे व ते राजे आपसांत झगडून अगदीं जेर झाले आहेत असें ज्यावेळीं त्यांनीं ऐकिलें, त्यावेळीं त्यांचा आनंद कोठें मावेल!! ज्यांनीं त्यांनीं आपल्या तलवारी उपसून मत्सपुरावर स्वारी करण्यास आरंभ केला; आणि सर्वांनीं आपल्या सेनेचें आधिपत्य एका " दुर्वीर्य " नामक राजास दिलें.

इकडे मत्सपुरांत चंद्रकांत राजानें दरबार भरून ह्या उत्पन्न झालेल्या शत्रूस कोणत्या प्रकारें टाळावें ह्याविषयीं विचार चालला असतां भालदारानें पुकार केला तसा राजानें त्यास विचारल्यावरून त्यानें सुचविलें कीं, कोणी एक तरुण यवन राजपुत्र आपल्या भेटीची इच्छा करीत आहे, राजानें त्यास आज्ञा दिल्यावरून राजपुत्र आंत आला व त्यानें राजास लवून सलाम केला. तेव्हां राजा एकसारखा त्याच्या तोंडाकडे टक लावून पाहूं लागला. **जहांदार** यानें आपली मान खालीं घालून मर्यादेनें एका बाजूस उभा राहिला होता. थोड्या वेळानें

राजानें ह्मटलें—मुला, तुला म्यां कोठें पाहिलें असावें, परंतु मला आतां आठवत नाहीं. तर कृपा करून तूं आपलें नांव गांव व तुझ्या पित्याचें नांव काय हें सांग बरें ?

जा०—महाराज! माझें नांव जाहांदार व माझ्या पित्याचें नांव शहाजमान असून बदकशान येथील मी राहणारा आहें.

चंद्र०—( आश्चर्यानें उभा राहून ) काय तूं भगिनी चंद्रप्रभेचा मुलगा ?

जा०—होय सरकार मी रोशनजेहेलचा मुलगा. ( दरबारी मंडळी नांवाच्या भेदामुळें साशंकित होते. )

चंद्र०—प्रिय मित्र शहाजमान सुखरूप आहेतना ?

जा०- शरिरानें मात्र सुखरूप आहेत, परंतु अंःतकरणानें नाहींत.

चंद्र०—( आश्चर्यानें ) ह्मणजे !

जा०—महाराज ! आमचें राज्य विरूपाक्षानें घेतलें आणि आईस व बाबास राज्य प्रकरणाखेरीज पाहिजे तिकडे हिंडण्या फिरण्याची मोकळीक ठेविली आहे बंदीखान्यांत टांकिलें नाहीं ही एक त्याची कृपाच समजली पाहिजे नाहीं तर त्यांची अशा स्थितींत काय व्यवस्था झाली असती. ( दुःखित होतो )

चंद्र०— बा, कांहीं चिंता करूं नको, ईश्वरकृपेनें सर्व कांहीं नीट होईल.

हा जो उभयतांच्या बोलण्यांत भेद झाला याचें कारण वाचकांच्या लक्षांत आलें नसेल. जाहांदार याच्या पित्याची व चंद्रप्रभा हिच्या पित्याची पूर्वींपासून फार मैत्री असे. एकेसमई शहाजमान यानें युद्धांत ऐन आणिबाणीच्या

प्रसंगीं जयसिंगास मोठी मदत केली होती त्यामुळें त्याचे फार उपकार झाले आहेत ते कसे फिटतील ह्याची त्यास मोठी काळजी होती. एके दिवशीं जयसिंगानें मोठी मेजवानी करून आपल्या मित्रमंडळीसह शहाजमानास आमंत्रण केलें होतें शहरांत चांगली रोषनाई केली होती शहाजमान आल्याबरोबर तोफांची सरबत्ती होऊन दारुकामही बरेंच सुटलें. नंतर जयसिंगानें सामोरे जाऊन शहाजमान यास हातीं धरून आपल्या दिवानखान्यांत नेलें, त्यावेळीं सहज जयसिंगाच्या कन्येची व शहाजमान ह्याची दृष्टादृष्ट झाली. त्यावेळीं त्याच्या मनांत तिजविषयींची उत्कंठा उत्पन्न झाली; परंतु हा जातीचा मुसलमान व ती जातीची हिंदु, तेव्हां ह्याचा विवाहसंबंध कसा साधणार परंतु शहाजमान ह्याच्या मनांत तिजविषयीं चटका लागल्यामुळें तो विचारांतच गर्क होता; इतक्यांत जयसिंगाचें लक्ष जाऊन त्या सहज विनोदानें ह्मटलें, कां सरकार मार्गांत एखाद्या तरुणीनें तर चित्त हरण केलें नाहींना ? हें ऐकून शहाजमान किंचित चपापला खरा, परंतु आपलें हृद्गत न दर्शवितां ह्मणाला नाहीं महाराज ! तसें कांहीं नाहीं ! परंतु आपण चव्हाट्यावर जें कारंजें बांधिलें आहे तसें आमच्या येथें बांधविण्याच्या विचारांत मी गर्क होतों दुसरें कांहीं नाहीं. नंतर इकडील तिकडील गोष्टी झाल्यावर जयसिंग ह्मणाला अमीर साहेब, आपले मजवर महत उपकार झाले आहेत, त्याचा मी कसा उतराई होईन ? ह्यावर शहाजमान यानें उत्तर दिलें कीं, छी ! छी ! ह्यांत हो उपकार कसचे, आपण परस्पर बंधु आहों ह्मणून परस्परांस सहाय्य करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे आज तुह्मांवर प्रसंग तसाच

उद्यां आह्मांवरही येईल त्याचा कांहीं नियम नाहीं; तेव्हां जयसिंग ह्मणाला, खरी गोष्ट. परंतु उपकाराचा मोबदला करणें हें कृतज्ञ मनुष्याचें कर्तव्य आहे. ह्याकरितां तुह्मांस माझ्या राज्यांतून जें पाहिजे तें मागा मी तें आपणास स्वसंतोषानें देईन. माझें सर्व राज्य, संपत्ति, किंबहुना माझें हें शीर मागितलेंत तरी देखील मी देण्यास तयार आहें. शहाजमानानें उत्तर दिलें मला राज्य आहे संपत्तीही आहे मग तीं मला काय करावयाचीं आहेत. बाकी जें तुह्मीं शीर घेण्यास सांगतां तर आपण परस्पर मित्र असून शत्रूत्वाचें कृत्य करण्यास मला सांगतां काय? ह्यावर आपली इच्छाच जर मला कांहीं देण्याची असेल तर वचन द्यावें. जयसिंग ह्मणाला अमीरसाहेब वचन कशास पाहिजे मी तोंडानें ह्मणतों हेंच माझें वचन आहे या उप्पर तुमची खात्री होत नसेल तर हें घ्या वचन. (जयसिंग त्याच्या हातावर हात देतो.) वचन मिळाल्यावर शाहजमान ह्मणाला, महाराज बेमर्यादेची क्षमा असावी जी वस्तु मी मागणार तिजमुळें जी आपली मित्रता आहे ती अधिक दृढ होईल, माझी इतकीच विनंती आपणाजवळ आहे कीं अद्यापपर्यंत मी अविवाहित आहें ह्मणून आपली कन्या मला अर्पण करण्याविषयीं मी तुमची प्रार्थना करितों. तर येवढी वस्तू कृपा करून मला द्यावी, दुसरी कांहीं नको व कदाचित् आपणास क्रोध येईल तर मी पूर्वीं क्षमा मागितलीच आहे व पुन्हाही मागतों. हें ऐकून जयसिंगास मोठा विचार पडला खरा, परंतु वचन दिलें आहे ह्मणून तो अगदीं स्तब्ध राहिला, थोडक्या वेळानें ह्मणाला अमीर साहेब ही गोष्ट जरा दरबारी मंडळीस व घरांतील मनुष्यांच्या

कानांवर घालून अनुमोदन घेतलें पाहिजे. कारण आपणास ठाऊकच आहे कीं आपल्या उभयतांची जात एक नाहीं जर का तुह्मीं स्वजातींचे असता तर आज सायंकाळींच कोणाचेंही अनुमोदन घेतल्याशिवाय लग्न लावून दिलें असतें. असो ह्याकरितां जरी मला लोक दुषणें देतील तरी मी आपलें वचन सत्य करीन व तुह्मांस जासूद पाठवीन. तेव्हां स्वारीनिशी इकडे निघून यावें. नंतर जयसिंगानें आपल्या मुलीजवळ, अशा प्रकारची विवाहाची गोष्ट काढतांच तिनें स्पष्ट सांगितलें कीं, अमिराखेरीज इतरास वरण्याची माझी इच्छा नाहीं. त्यावर जयसिंग ह्मणाला कीं तो यवन आहेना ? त्यावर तिनें उत्तर दिलें कीं तो यवन असो कीं दुसरा कोणी नीच असो माझे मनाला आवडला तो खरा ! अशा कन्येच्या अनुमोदनानें जयसिंगास मोठें आश्चर्य वाटलें. पुढें कांहीं दिवसांनीं जयसिंगाच्या मुलीचा शहाजमान ह्याजबरोबर विवाह झाला, आणि तिचें नांव रोशनजहेल (प्रकाशाचा गोळा) असें ठेविलें. कांहीं वर्षांनीं ती गरोदर राहिल्यावर माहेरी आपल्या बापाच्या घरीं बाळंत होण्यास गेली होती तेथून कांहीं महिन्यांनीं परत सासरीं जात असतां तेथें मार्गांत आपले चंद्रकांत महाराज ज्या आरण्यांतून ती जात होती त्याच आरण्यांत शिकारीस गेले होते, तेव्हां त्यांची व त्यांच्या बरोबरच्या लोकांची चुकामूक होऊन हे अरण्यांत एकटेच भ्रमण करीत असतां चोरांनीं ह्यांस अकस्मात् गाठिलें. त्यांची व ह्यांची बरीच चकामकी झाली, त्यांत चंद्रकांतानें बहुतेक चोरांस यमसदनीं पाठिवलें, परंतु ते पडले जास्त व हा पडला एकटा; त्यांतून त्यास जखमा होऊन रक्त वाहत होतें असा हा निकरानें लढत असतां

त्याच मार्गानें आपली रोशनजहेल जात होती तिच्या लोकांपैकीं एकानें ही सर्व हकिकत तिला कळविल्याबरोबर तिनें त्यांस सांगितलें कीं एकदम भरधांव घोडे हांकून त्या बिचाऱ्यास सोडवा नंतर त्या शूर रजपूत शिपायांनीं चोरांची कत्तल चालविली, तसे ते घाबरून शिल्लक राहिलेले पळून गेले. प्रथम तर चंद्रकांतास हें एक दुसरें अरीष्ट आलें कीं काय असें वाटलें परंतु हे आपले रक्षणकर्ते आहेत.असें त्यास समजल्यावर त्यानें त्यांचे आभार मानिले. पुढें तुह्मीं कोण कोठील ह्या अरण्यांत कसे आलां वगैरे त्यांस विचारणार होता तों त्यास एकाएकीं मुर्च्छाना आली व तो पडला. तेव्हां परक्या पुरुषाजवळ आपण कसें जावें ही शंका मनांत न आणितां रोशनजेहाल चंद्रकांताजवळ गेली व एका प्रकारच्या वनस्पतीचा रस त्याच्या जखमांस लावून वर पटे बांधले व थोडें गुलाबपाणी त्याच्या तोंडात घालून व थोडेंसें डोळ्यांस लाविलें व त्याचें मस्तक आपल्या मांडीवर घेऊन वाळ्याचे पंख्यानें वारा घालूं लागली. कांहीं वेळानें चंद्रकांतानें आपले डोळे उघडून पाहिल्यावर त्यास असा भास झाला कीं, ही प्रत्यक्ष उमा माझे सहायास शंकरानें पाठिवली कीं विष्णुनें लक्ष्मी पाठविली ह्याचें मोठें त्यास आश्चर्य वाटलें, नंतर तो उठून बसला व तिला ह्मणूं लागला बाई ! आपण कोणी वनदेवता आहां कीं स्वर्गदेवता आहां ! तिनें उत्तर दिलें तसें कांहीं नाहीं मी जयसिंग महाराजाची कन्या आहें व आपल्या सासरीं जात आहें; चंद्रकांतानें विचारिलें तुमच्या पतीचें नांव काय व ते कोठें राहतातः ती किंचित् लज्जायमान होऊन ह्मणाली बदकशानचे अमीर

इतकें ह्मणून स्तब्ध राहिली त्यावर चंद्रकांत ह्मणाला बाई तुह्मीं कांहीं लाजूं नका येथें कोणी परकें नाहीं व मी तुमच्या प्रत्यक्ष बंधू प्रमाणें आहे किंबहुना माझा तुह्मीं प्राण वांचविलात त्या आपण मला प्रत्यक्ष मातेप्रमाणें आहां ! तेव्हां ती ह्मणाली छे ! छे ! महाराज ! असें काय तुह्मीं ह्मणतां मी तर तुमच्या कन्येप्रमाणें आहे; माझ्या पतीचें नांव शहाजमान असें आहे.

चंद्र०–( आश्चर्यानें ) बाई तुह्मी क्षत्रियाची कन्या असून तुमचा पति यवन कसा ?

महाराज ही हकिकत मोठी आहे व येथें आपणास भय आहे कारण ते पळून गेलेले चोर आपल्या दुसऱ्या साथीदारांस कदाचित् घेऊन येतील मग आपणास मोठी पंचाईत पडेल ह्मणून जवळच एक गांव आहे तेथें आपण पोंचल्यावर सर्व कळून येईल. त्या गांवीं पोंचल्यावर जेवण खाण आटपल्या नंतर तिनें आपली सर्व हकिकत सांगितली तीवरून चंद्रकांतास मोठें नवल वाटून तो ह्मणतो.

## कवीत.

प्रीतनजाने जात कुजात
प्रीतन जाने रंक और राज
प्रीतन जाने दिन और रात
प्रीतन जाने भीखशिर ताज
प्रीतन जाने वन मेहेलों आरास
प्रीतन जाने भूखउपवास

दुसरे दिवशीं चंद्रकांतासह रोशनजहेल तेथून निघाली व आपल्या पतीच्या राज्यांत सुखरूप पोंचली. नंतर तिनें चंद्रकांताविषयींची सर्व हकिकत सांगिली ती ऐकून शहाजमान फार खुश होऊन ह्मणाला, प्रिये ! अशींच सत्कृत्यें नेहमी करीत जावीं, तेणेंकरून परवरदिगार आपणास सुखी ठेवील, बेगमसाहेब सुखरूप पुत्रासह आली असें पाहून जिकडे तिकडे राज्यांत आनंद होऊन उत्साह सुरु झाले, अमिरानें दरबार भरून सर्वांस नजरनजराणे दिले व आनंदानें पुत्राचें नांव "**जाहांदार**" ह्मणजे जिवन देणारा असें ठेविलें. नंतर कांहीं दिवसांनीं चंद्रकांत बरा झाल्यावर त्यानें रोशनजहेल व अमीर यांची परवानगी घेतली व स्वराज्यांत निघून गेला.

इकडे दुर्वीयास सेनाधिपत्य मिळतांच त्या भयंकर सेनेसहित तो चारी दिशा व्यापीत या देशांत येऊन पोंचला. मग आपल्या मूर्खपणाचीं फळें त्या मांडलीक राजांच्या दृष्टोत्पत्तीस आलीं. दुर्वीयानें वाटेनें पुष्कळ राजांपासून खंडणी घेत व न देतील त्यांचा समरांगणीं पराभव करीत मत्सपुरासन्निध येऊन डेरे दिले, आणि राजास पत्र पाठविलें कीं, शरण ये नाहींतर युद्धास सिद्ध हो. तो निरोप पोंचतांच चंद्रकांत आपल्या अंतःपुरांत चिंताग्रस्त बसून विचार करितो कीं, आपला तर वृद्धापकाळ झाला आहे तर अशावेळीं शरण जाऊन परतंत्र होण्यापेक्षां जीव जाईल तर उत्तम. राज्य सोडिलें असतां तो दुष्ट प्रजेचे हाल करील आजपर्यंत दिवस सुखांत जाऊन आतां वृद्धापकालीं दुःख होणार हे विचार मनांत

येऊन त्याची छाती अगदीं धबकून गेली. त्याचप्रमाणें तो दुर्वीर्य जिकडे तिकडे विजय करीत आला असल्या कारणानें त्यांस मोठें धैर्य आलें आहे, त्याजपाशीं शूर सरदार पुष्कळ आहेत. आतां काय करावें असा विचार करीत आहे तों मेनकावती त्याची पट्टराणी तेथें आली. तिनें यास चिंताग्रस्त पाहून विचारलें कीं, स्वामी " आज आपली वृत्ति अशी चिंतातुर कां बरें दिसते! अशीं मुखचंद्रमावर ढगें येण्याजोगें संकट तरी कोणतें आलें आहे? एकाएकीं आपणास असें पाहून माझी तर बाई कंबर अगदीं खचून गेली ऐकूंद्या तरी काय तें. " राजानें उत्तर केलें, प्रिये आपणावर परचक्र आलें आहे, तो राजा शरण येण्यास लिहीत आहे तर त्यास शरण जाण्याचें आपल्या नशिबीं येणार!! मेनकावती उत्तर करिते प्रिया, त्या मर्कटास शरण कांहो जावयाचें!! आपण स्वस्थ बसा, मीच स्वतः जाऊन त्या दुष्टाचा पराभव करित्यें!! प्रजा, हीं आपलीं तान्हीं आहेत, त्यांस दुःखांत घालून आपण जिवंत रहावें यांत कसली शोभा मग येईना तें मरण!'' अशीं बोलणीं चाललीं आहेत, इतक्यांत राजानें मुख्य मंत्री व दुसरे बरेच लोक जमवून कचेरीचा थाट जमविला नंतर त्यानें त्यांस सर्व वृत्तांत निवेदन करून विचारिलें कीं, या दुर्वीर्याबरोबर युद्ध करावें कीं, शरण जावें? याविषयीं तुमचें मत काय असेल तें निवेदन करा. त्यावरून कितीएकांनीं मत दिलें कीं, शत्रु बलाढ्य आहे, याकरितां हल्लीं शरणच जावें ह्मणजे आपल्या देशाचा नाश न होतां राज्यसंरक्षण होईल. तो लोभी असेल तर त्याला द्रव्य देऊन वश करावें. आपणापेक्षां बलवान् असेल तर त्याजपाशीं नम्रतेनें वागावें,

आणि आपणापाशीं जर सैन्याची ऐक्यता, द्रव्याची विपुलता आणि प्रजेची अनकूलता हीं आहेत तर युद्धच करावें, हा राजधर्म आहे. समय पाहून वर्तणूक करीत नाहीं तो नदीतिरावरील उद्धट वृक्षाप्रमाणें उत्पाटण पाऊन दुःखप्रवाहीं पडतो; अशीं प्रधानादिकांचीं मतें पडलीं; परंतु चंद्रकांताच्या मनांत शरण जावें असें येईना. शत्रूस शरण जाणें हें मोठें लांछन होय, व आपला देश संरक्षण करण्यांत जीव जात आहे तरी मागें सरूं नये असें त्यास वाटलें. नंतर त्यानें आपल्या वीरभद्र नामक सेनाधिपतीस तुझें मत काय आहे हें विचारिलें.

वीरभद्र पुढें तलवार सरसावून बोलूं लागला कीं, महाराज, त्या मुर्खास खंडणी द्यावी हा उच्चारही करूं नये. तो आतां वाघाच्या गुहेंत येऊन पडला आहे जो आमच्या प्रजेचा नाश करावयास आला आहे, त्या दुष्टाचा आह्मीं विध्वंस करूं, मरूं किंवा मारूं!! युद्धांत जयप्राप्ति होईल तर स्वर्गसुख मिळेल. मेलों तर सत्कीर्ति होईल. शरण जाऊन परतंत्र होणें हें आपल्यासारख्या कुलीन व कीर्तिमान पुरुषांस लांछन होय. मजला आज्ञा होईल तर मीं आतांच त्या दुष्टास समरांगणीं चार पट्टयाचे हात दाखवून येतों. असें संभाषण होत आहे तों चंद्रकांत राजाचा मुलगा “ वीरसिंह ” पित्यास प्रीतिपूर्वक नमन करून जवळ बसला, आणि ह्मणूं लागला कीं, बाबा, आह्मीं सिंहाचीं लेकरें आहोंत, मदोन्मत्त हत्तींचीं गंडस्थळें विदारण करणें हें आमचें कर्तव्यकर्म आहे. दुर्जनास शरण जावें हें आमचे हातून कालत्रयींही घडणार नाहीं. त्यापेक्षां आत्मत्याग करणें हें उत्तम. शरण जाणें क्षत्रियांचा धर्म नव्हे.

आपल्या शत्रूपेक्षां पायदळ, स्वार, तोफखाना द्विगुणित करण्याकरितां जें आपल्या वडिलोपार्जित द्रव्य आहे तें काढावें. पुढें युद्धच करावें याप्रमाणें शेवटीं त्या सर्व सभेचा विचार ठरला, आणि चंद्रकांतानें शत्रूस पत्र लिहिलें कीं, "परमेश्वराच्या कृपेनें माझे पदरीं अशी फौज आहे कीं, एकाद्या बलाढ्य शत्रूस पादाक्रांत करण्याची अद्याप त्याच्या बाहूंत शक्ति आहे तथापि समरांगणीं लढाईच्या प्रसंगांत हजारों लोकांचे निरर्थक प्राण घेण्यापेक्षां सर्वांनीं शांततेंत राहावें हें उत्तम होय. याजकरितां परत स्वदेशीं जाणें हें आपणास उचित् आहे."

असें पत्र तिकडे पाठविल्यानंतर इकडे मेनकावती व वीरभद्र आपलें सैन्य तयार करावयास लागलीं. शहरांत रणढोल वाजण्यास आरंभ झाला. चहूंकडे लख चक शस्त्रानिशीं लोक युद्धाची तयारी करीत आहेत असें दिसूं लागलें. पायदळ, घोडे स्वार, तोफखाना, यांची एकच गर्दी होऊन गेली. याप्रमाणें सर्व तयारी करून राजाच्या जिवास कदाचित् धोका येईल असें जाणून त्या सर्व सेनेचें अधिपत्य मेनकावतीनें आपणच घेतलें. याप्रमाणें एक लक्ष फौज तयार करून मेनकावती त्या राजावर चढाई करून जाती झाली. इकडे दुर्वीर्यानें पत्र वाचतांच त्याचे नाकबुलीचें पत्र लिहून मत्सपुरावर हल्ला करण्याचे तयारीस लागला असतां जरी पर्जन्यकाळचे दिवस संपत आले होते तरी पर्जन्य पडण्याची चिन्हें दिसूं लागलीं, ह्मणून आपल्या सेनेची सर्व तयारी चांगल्या रीतीनें करण्यांत त्याणें बरेच दिवस लाविले. मोठा पाऊस पडत असतां मध्यरात्रीच्या समयीं एकदम मत्सपुरावर हल्ला कर-

ण्याकरितां सैन्य घेऊन दुर्वीर्य येता झाला. रात्रौ सुमारें दहा वाजतां मोठ्या जोराचा वारा सुटण्यास आरंभ झाला. स्वभावतः काळोखी रात्रीचें स्वरूप भयंकर मग विद्युल्लतेच्या चमकेनें, अकाशांतील गर्जेनेनें व पर्जन्य वृष्टीनें तें अधिकच भयंकर दिसूं लागलें. अशासमयीं दोन्हीं सैन्याची मध्यरात्रीं अकस्मात एका कीर्र अरण्यांत गांठ पडली. मग काय विचारावें, एकच गोंधळ होऊन गेला. आपलें सैन्य कोठें आहे, शत्रूचें कोठें आहे हें कोणास समजेना. चहूंकडे तलवारी मात्र चमकण्यास आरंभ झाला. हातीं लागेल त्यास मारहाण याप्रमाणें एकच कत्तल होत चालली. दोन्हीं सैन्यें एकमेकांत मिसळून गेलीं मग दोहोंकडून निघणारे तोफांचे भडिमार, अकाशांतील गडगडाट, विद्युल्लतेचे चकचकाट, घोडेस्वारांचा एकच दणदणाट, उत्पाटण होऊन पडणारे वृक्षांचे कडकडाट, तशांत रण ढोल, नगारे, यांचे झणझणाट यांची एकच गर्दी होऊन गेली. या वेळीं प्रलयकालचा समय आहे कीं काय, असा भास झाला. याप्रमाणें एकसारखी कत्तल चालली आहे. कोणी ओळखीना तों झुंजूमुंजू दिसूं लागलें. सुमारें ४०००० हजार लोक त्या भयंकर रात्रीं दुष्ट लोकांच्या मूर्ख उद्देशास बळी गेले. तों दिशा फांकल्या; दोन्हीं सैन्यें अगदीं थकून गेलीं व लढाई न करितां एकमेकांकडे टकमक पहात स्तब्ध उभीं राहिलीं. सुमारें चार घटिका दिवस आला तोंपर्यंत सर्वांनीं शस्त्रें ठेविलीं होतीं तितक्यांत सर्व दंगे नाहींशीं झालीं. पर्जन्य थांबला, वारा बंद झाला, सूर्याचे कोमल किरण हळू हळू बाहेर पडूं लागले. जसें

कांहीं गंधर्व आपल्या विमानारूढ होऊन मानवी प्राण्यांचीं दुष्ट कर्मे आकाशांतून पहात आहेत, अशी चमत्कारिक शोभा दिसूं लागली, इतक्यांत पुनः ती भयंकर लढाई सुरू झाली. पुनः रणढोल वाजण्यास आरंभ झाला. मरणास किंचितही न डरतां काळाच्या तोंडांत जाऊन पडावें याप्रमाणें ते परस्परावर तुटून पडले. सर्वांचीं आंगें चिखलानें व रक्तानें भरल्यामुळें ते यमस्वरूपी दिसूं लागले. जे समरांगणीं पडत, त्या बिचाऱ्यांवर हजारों जण पाय देऊन थय थय नाचत. याप्रमाणें दोन्हीं सैन्यें निकरानें लढत आहेत; मेनकावती, राजपुत्र व जहांदार हीं सर्वांपुढें असून आपल्या लोकांस उत्तेजन देत आहेत. इतक्यांत एक भयंकर गोळा त्यांजकडे येऊन पडला. त्याकडे पाहून हंसत हंसत राणी तेथेंच उभी आहे तों वीरसिंहानें आपल्या आईस एकदम मिठी मारिली व आपल्या अंगानें तिचें आंग अगदीं आच्छादून तिजबद्दल आपण मरण्यास सिद्ध झाला. परंतु तेथें चिखल अतिशय असल्यामुळें तो गोळा न फुटतां तेथेंच मुरून राहिला. अशीं कितीएक शौर्याचीं कृत्यें चाललीं आहेत तों दोनप्रहर झाली. अन्न नाहीं, पाणी नाहीं, विश्रांति नाहीं, साह्य नाहीं, यामुळें दोन्हीं पायदळें अगदीं थकून गेलीं. आणि दोघांनींही आपला युद्धव्यवहार सोडिला तों इतक्यांत चहूंकडून दणदणाट ऐकूं येऊं लागला. दोहोंकडील घोडेस्वार एकमेकांवर येत आहेत असें थोड्याच वेळांत परस्परांच्या नजरेस आलें, वाद्यांचा एकच गजर होऊन गेला लक्षावधी घोड्यांच्या दणदणाटानें पृथ्वी थरथर कांपत आहे असा भास झाला. हा देखावा इतका भव्य व आणिबाणीचा

होता कीं दोन्हीं सैन्यें तिकडे पहात उभीं राहिलीं. सूर्यकिरण तप्त पडल्यामुळें सर्वांच्या अंगाची लाही होऊन गेली. हजारों घोडेस्वार पहिल्या तडाक्यासच धुळीस मिळाले. जिकडे तिकडे त्यांच्या आरोळ्या, घोड्याचीं खिंखाळणीं व तलवारीचे खलखाटानें चारी दिशा व्यापून गेल्या. सूर्य अस्तास चालला तरी लढाई संपेना. रात्र पडली, एका पाठीमागून एक असे तारे उगवूं लागले, चंद्रोदय झाला, इतक्यांत लढाई थांबत चालली; कारण कीं, दुर्वीर्याचे घोडेस्वार बहुतेक समरांगणी पडले, मग त्याच्यानें शत्रूपाशीं टिकाव धरवेना. आपला अपजय झाला आतां काय करावें, ही दुर्वीर्यास मोठी काळजी पडली. सुमारें एक प्रहर रात्र झाली, पुष्कळ विचार करून आपल्या सेनेस एकदम परत स्वदेशीं जाण्याचा मार्ग क्रमण करण्यास दुर्वीर्यानें हुकूम दिला. आजपर्यंत जय मिळवून आतां स्वदेशीं परत जाणें हें तर एकीकडेच राहिलें; परंतु शत्रूचे हातीं सांपडून आपला सर्वस्वी विध्वंस होणार, हे विचार मनांत येऊन सर्वांस मोठा खेद झाला, पण करतात काय? निमूटपणें आपल्या शत्रूकडे पाठ करून मोठ्या दुःखानें त्यानें आपला रस्ता धरिला.

मध्यरात्रीचे समयीं चहूंकडे निवांत असल्यामुळें हलकासा आवाज झाला असतां मोठा शब्द होतो. मग ते समरांगणी पडलेले लक्षावधी लोक चिखलांत उघड्यावर तळमळत असतां, दयानिधी परमेश्वराचा धांवा करून करुणास्वर काढीत असल्यामुळें ती रात्र फार भयंकर दिसूं लागली. तशांत तें सैन्य ज्यावेळीं त्यांस सोडून जाऊं लागलें तेव्हां त्यांचें दुःख काय विचारावयाचें!! त्या

बिचाऱ्यांचे मनांत अनेक विचार येऊं लागले कीं, ते आपणास अशा संकटसमयीं सोडून परदेशीं जाणार! आपण शत्रूच्या हातीं सापडूं! ते आपले हाल हाल करून प्राण घेतील ही एक मोठीच त्यांस धास्ती पडली. आपलीं मुलेंबाळें घरीं काय करतील त्यांचें पालग्रहण कोण करील हे विचारही त्यांचे मनांत येऊन ते अधिकच करुणास्वर भाकूं लागले. पहा बरें लढाई किती भयंकर आहे ती! हजारों लोकांचे गळे कापून लोभी लोक आपला हेतू तडीस नेण्यांत वैभव मानितात, हें किती लाजिरवाणें आहे! कोणाचे हात पाय तुटून पडले आहेत, कितीएक घोड्यांच्या लाथेखालीं जखमी होऊन वेडे विद्रुप झाले आहेत, कितीएक या दुःखांतून लौकर सुटावें ह्मणून आपल्याच हातानें आपल्या जखमा फाडीत आहेत, कितीएक आपल्या मुलांबाळांची आठवण करून आक्रोश करीत आहेत, कितीएक अन्न अन्न थंडी थंडी करून प्राणोत्क्रमण करीत आहेत, या लढाईसारिखा दुसरा कोणता देखावा अतिशय भयंकर असेल बरें!

इकडे दुर्वीयाचें सैन्य निमुटपणें मोठ्या रागानें व दुःखानें पाऊल उचलीत चाललें होतें. स्वदेशीं सुरक्षित पोंचण्याची त्यांची आशा तुटून गेली होती; इतक्यांत शत्रूचे घोडेस्वार पाठलाग करीत आले कीं काय? असें टकमक इकडे तिकडे पहात आहेत, तों तीं आपल्याच घोड्यांचीं पावलें वाजत आहेत असें त्यांस दिसून येई. अशी त्या सैन्यांस मोठी दहशत पडून गेली होती, पुढें पाहतात तों एक मोठी नदी दुथडी भरून चालली आहे, तेव्हां तर त्यांची कंबर अगदींच खचून गेली. दुर्वीय

आपल्या सैन्यास नदीचे कडेनें घेऊन चालला तों थोड-क्याच वेळानें मत्सपुराच्या रस्त्यास येऊन मिळाला. हें त्याचे लोकांनीं पाहतांच त्यांचा आनंद कोठें मावेल ! ! सर्वांस मोठा धीर येऊन उल्हास झाला, चहूंकडे आनंदाचा पुकारा होऊं लागला. आपसांत आपल्या सेनाधिपतीचे लोक गुण गाऊं लागले. याप्रमाणें चाललें असतां दुर्वीर्य त्याच मार्गानें खालीं होऊन ज्या सैन्यास त्यानें सोडिलें होतें त्या-च्याच पिछाडीस पुनः आला, आणि त्यांस चौफेर घेरून टाकिलें. यांत दुर्वीर्यानें पहिल्यानें मागें परतण्याचा आविर्भाव मात्र दाखविला, परंतु त्याचा उद्देश इतकाच कीं, ती जागा लढाईस चांगली नसल्या कारणानें आपले लोकांस त्याणें दुसऱ्या रस्त्यानें नेऊन मत्सपूर व तें सैन्य यांच्यामध्यें येऊन वेढा दिला.

अरुणोदय होतांच शत्रूचें कपट मेनकावतीच्या दृष्टो-त्पत्तीस आलें. आतां प्रसंग कठीण आहे असें तिला वाटलें. चारी बाजूनें आपण घेरिलों गेलों आहों, असें जेव्हां तिनें पाहिलें तेव्हां ती मनांत किंचितही न डरतां शत्रूच्या दुस्तर सैन्यांतूनच आपला रस्ता तलवारीनें साफ करण्याचा तिणें विचार केला व मागें पाहूं लागली तों जाहांदार आपल्या पाठीमागें असून मोठ्या निकरानें लढत होता. त्यानें मेनकावतीस पाहिल्यावर मोठ्यानें हांक मारून सांगितलें कीं, काकू ! कांहीं घाबरूं नका, मी आपल्या जवळच आहें. पुनः त्या तीक्ष्ण शस्त्रांच्या झणत्कारानें उभय पक्षांतील हजारों लोक समरांगणीं पडूं लागले. याप्रमाणें मोठ्या शौर्यानें व हट्टानें भांडत झग-डत मेनकावती शत्रूच्या सैन्यांत घुसून सुमारें मध्यभागीं

येऊन पोंचली, तों तिच्या घोड्यास मोठी जखम लागून तो मरण्याच्या वेधनेंत बेफाम झाला. मग एकाएकीं उधळून शत्रूच्या भरसैन्यांत जाऊन तूटून पडला, व तेथें मेनकावतीनें ही विलक्षण धिटाईनें शत्रूच्या जरीपटक्यास हात घातला. तेव्हां कितीएक नागव्या तलवारी तिच्या भोंवतीं चमकूं लागल्या, तिचा घोडा ही समरांगणीं पडला, इतक्यांत तिणें त्वरा करून जवळच शत्रूचा घोडा होता त्याजवर बसून पट्टा परजीत चमकत चालली होती; दोन्हीं सैन्यांतून वाहवा! वाहवा! असे उद्गार निघत आहेत. तों दुर्वीर्याचा मुलगा दुर्मती यानें एकाच तलवारीच्या घावानें तिच्या घोड्याचा शिरच्छेद केला, मग मेनकावतीही समरांगणी पडली.

आपली राणी गेलीसें पाहून इकडे मोठा हाहःकार झाला; सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. परंतु जाहांदार यानें त्यांस उत्तेजन येण्याकारितां ह्मटलें बहादुरांनो ! हाच वेळ आणीत्राणीचा आहे तर नीमक हलालीनें आपल्या शत्रूशीं लढून आपलें शौर्य त्यांस दाखविलें पाहिजे आपण रणांत पडलों तर स्वर्गास जाऊं व स्वदेशाखातर लढलों अशी आपली कीर्ति होईल; जय मिळाल्यासही आपली कीर्ती होईल; हीं दोन्हीं कारणें आपणांस श्रेयस्कर आहेत. पुढें पाहतात तों शत्रूचें सैन्य अपरमित पसरलें आहे, मार्गे दृष्टी टाकितात तों हजारों लोक एका ओळीनें पडले आहेत. उदासीनपणानें इकडे तिकडे पहात आहेत तों अपरमित सैन्य भयंकर आरोळ्या देत आहे, व समरांगणांत शिरत आहे. असें त्यांस दिसूं लागलें, व हें आपले शत्रूचें सैन्य आपला नाश करण्यास येत आहे, तर आतां जीव जावो अथवा राहो, निकरानें त्याजपाशीं समर करण्याचा निश्चय

करून त्यांनीं तलवारी सरसाविल्या; परंतु थोडक्या वेळानें त्यांच्या नजरेस आलें कीं, आपला राजा चंद्रकांत आपल्यास मदत करण्यास येत आहे. हें पाहतांच त्या शूरांच्या नेत्रांतून आनंदाश्रू वाहूं लागले. चंद्रकांत! चंद्रकांत! असा एकच चहूंकडे गजर होऊन गेला. प्रातःकालीं जेव्हां चंद्रकांतास बातमी लागली कीं, शत्रूंनीं आपल्या सैन्यास अगदीं वेढून टाकिलें आहे. तेव्हां त्यानें आपले सर्व मांडलिक राजे बरोबर घेऊन राणीचे साह्यास येण्याचा निश्चय केला. आणि अशा संकटसमयीं आपल्या लोकांस येऊन मिळाला. मेनकावतीची अशी दशा झाली हें जेव्हा राजानें ऐकिलें तेव्हां त्यास फारच दुःख झालें. अनेक विचारानें पूर्वीच त्याचें अंतःकरण अगदीं गढून गेलें होतें; त्यांत मेनकावतीचें जाणें हें त्याच्या दुःखावर डाग झाला. एवढा गंभीर राजा त्याच्या दुःखाचे उमाळे त्याच्या अंतःकरणांत मावेनातसे झाले. आपली प्रियपत्नि आपणास टाकून गेली; त्या सकुमार सखीचे दुष्टांनीं हालहाल करून प्राण घेतले असतील; असें त्यास वाटलें. आज थोडक्याच वेळेपूर्वी जे आह्मीं सुखानें नांदत होतों त्या आह्मावर वृद्धापकालीं परमेश्वरानें कसा घाला घातला? आतां सोमकांताची दशा काय होईल?

असें अनेक प्रकारें दुःख आठवून राजा शोकार्णवांत बुडून गेला. मग ते जवळच मायावी मांडलिक राजे होते, त्यांनीं त्याचें शांतवन करण्यास आरंभ केला. सर्वांनीं मोठी विनयपूर्वक प्रार्थना केली कीं, आपणच धीर गाळाल तर मग अशा संकटसमयीं आमचें संरक्षण करण्यास कोण आहे? प्रसंगावर नजर देऊन आपण आपलें शमन केलें पाहिजे. प्रारब्धीं असेल तें भोगिलेंच पाहिजे, त्यास

उपाय नाहीं. संसार हें केवळ दीर्घ स्वप्न आहे. मुलें, बाळें हीं आपलीं कोणी नाहींत सर्व माया आहे. या मायेच्या भ्रमांत पडून आपण किमर्थ शोक करितां ? राणीसाहेब समरांगणीं अवर्णनीय चातुर्य दाखवून गेली, त्यापेक्षां त्यांची कीर्ति सर्वकाळ राहील. आह्मां पुरुषांचें धिक् जिणें ! त्यांसारखी कीर्ति मिळवावी तरच या जगांत राहून हांशील, नाहींतर हजारों किडे प्रत्येक जन्मास येऊन मरत नाहींत काय ? राणीसाहेब किर्तीरूपें या जगांत जिवंतच आहेत. अशा अनेक विचाराच्या गोष्टी सांगून त्यांचें कांहींसें शांतवन केलें. असो राजानें सर्व दुःख विसरून हा भयंकर समय कसा तरी टाळला पाहिजे ह्मणून अश्वारूढ होऊन लढाई करण्याच्या तयारीस लागला. याप्रमाणें थोडक्याच वेळानें पुनः ती भयंकर लढाई सुरू झाली. आणि मोठ्या निकरानें लढाई चालत आहे तों दुर्वीर्याच्या लोकांनीं पलायन करण्यास आरंभ केला. शत्रूची अशी दशा पाहून चंद्रकांतानें ती आनंदकारक बातमी जासूदाकरवीं मत्सपुरास पाठविली. आतां चंद्रकांत त्यांचा सर्वस्वी विध्वंस करणार ! इतक्यांत ते मायावी मांडलिक राजे एकामागून एक याप्रमाणें आपल्या शत्रूस जाऊन मिळूं लागले. याप्रमाणें थोडक्याच वेळांत सुमारें आठशें लोकांशिवाय बाकीचें सर्व सैन्य दुर्वीर्यास जाऊन मिळालें.

इकडे चंद्रकांताचा जय होत आहे व शत्रूचें सैन्य दाही दिशा पळत आहे, ही बातमी जेव्हां मत्सपुरास येऊन पोंचली, तेव्हां तेथील आनंदास काय विचारावें ! त्या बिचाऱ्या लोकांस परचक्र हें कित्येक पिढ्या माहित-

ही नव्हतें. सर्वकाल आनंदांत व सत्कृत्यांत ते घालवीत असत. ही बातमी जेव्हां त्यांनीं ऐकिली तेव्हां एकच आनंदमय होऊन गेलें. तो मोठा उत्सहाचा दिवस मानून चहूंकडे गुढ्या उभारल्या. आपल्या विजयी सैन्यास सामोरें जाण्याकरितां थोर थोर लोक सुंदर पोषाक करूं लागले. लोकांचे थवेच्या थवे देवालयांत जमून हें अरिष्ट चुकविल्याबद्दल ते देवाचे गुणानुवाद गाऊं लागले. राजवाड्यासन्निध चौघडे व दुसऱ्या मंगल दायक वाद्यांनीं दिशा भरून गेल्यां, नाच, बैठक, तमाशे यांची गर्दी होउन गेली. या प्रमाणें आनंद चालला असतां थोडक्याच वेळानें वीरसिंह ( राजाचा मुलगा ) व वीरभद्र सेनापति हे राजास सामोरे जाण्याकरितां निघाले व वीरभद्र व वीरसिंह रत्नजडित अंबारींत हत्तीवर बसले होते त्यांच्या मागून न्यायाधीश, प्रधान, मंत्री, हेही अंबारींतच होते. कितीएक पालख्यांत, कितीएक घोड्यावरून चालले होते. पुढें नाच चालला आहे, छडीदार, भालदार ललकारताहेत, नानाप्रकारचीं वाद्यें वाजताहेत, माडीवरून सुंदर स्त्रिया फुलांचा वर्षाव करीत आहेत, याप्रमाणें ती स्वारी मोठ्या थाटानें चालली, आणि शहराबाहेर येऊन डेरे दिले.

इकडे मांडलिक राजांनीं विश्वासघात केला, हें पाहून चंद्रकांत मोठ्या विचारांत पडला. परंतु मनांत किंचितही न भितां समरांगणीं त्या दुष्टाबरोबर युद्ध करून प्रजेचें संरक्षण करण्यांतच आपला देह अर्पण करण्याचा त्यानें निश्चय केला. त्यानें राहिलेल्या लोकांस आपणापाशीं बोलावून त्यांस सांगितलें कीं, ज्यांस आपले प्राण संरक्षण

करणें असतील त्यांनीं एकदम शत्रूस जाऊन सामील व्हावें, तरच तुमचे जीव बचावले जातील. मी तर या समरांगणांत देहत्याग करण्याचा निश्चय केला आहे. याप्रमाणें राजानें त्या लोकांस जीव बचाविण्याची युक्ती सांगितली. परंतु तसें करण्यास एकाचेंही मन वळेना. सर्वांच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागले; कंठ भरून आल्यामुळें बराच वेळ त्यांच्या तोंडांतून शब्द निघेना. नंतर त्यांनीं राजास हस्त जोडून विनंति केली कीं, महाराज, आह्मीं आपलीं मुलें आहोंत, आपण आज्ञा कराल ती आह्मांस शिरसा मान्य आहे. परंतु आह्मीं आपले चरण सोडून कोणीकडे जावें ? असा त्यांचाही दृढ निश्चय पाहून तो शूर चंद्रकांत आपल्या लोकांस घेऊन त्या सेनासमुद्रांत शिरला. एकदम चहूंकडून शत्रूंनीं त्याला गांठिलें. अशा प्रसंगीं तो ज्या ज्या घोड्यावर बसे, तो तो घोडा जखम लागून पडे. याप्रमाणें पांच घोडे मेले. आपणास एक गोळी लागेल तर आपण या व्याधींतून मुटूं असें त्यास वाटलें. आत्महत्या करावी, तर महत्पातक आहे हेंही मनांत येई. नंतर कांहीं वेळानें निराश होऊन चंद्रकांत हातांत नागवी तलवार घेऊन मृत्यूच्या तोंडावर धांवून जात आहे इतक्यांत दुसऱ्या बाजूस जाहांदार मोठ्या निकरानें लढत होता त्यास पाहून राजानें शाबास ! शाबास ! असें ह्मटलें. पाठीमागें कितीएक घोड्यांच्या टापांचा शब्द त्यांच्या कानीं पडला. हे शत्रू कीं काय याविषयीं तो विचार करीत आहे, तों ते घोडेस्वार येऊन ठेपले. त्यांपैकीं एका मनुष्यानें पुढें होऊन राजाचे कंबरेस एकदम मिठी मारिली. इतक्यांत रा-

जानेंही आपला हा प्रिय सेनापति आहे असें जाणिलें, आणि दोघांनीं परस्परांस आलिंगनें देऊन कुशलवृत्त विचारिलें. राजाची याप्रमाणें स्थिति पाहून वीरभद्र मोठ्या अचंब्यांत पडला. त्यानें त्या दुष्ट मांडलिक राजांचीं कर्में त्यास सांगतांच वीरभद्र रागानें अगदीं संतप्त होऊन गेला. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले, थरथर कांपूं लागला, नेत्र आरक्त होऊन गेले, भोंवया वर चढल्या आणि केवळ यमरूपी भासूं लागला; पण मेनकावतीची दशा ऐकून मात्र त्याची कमर खचली. त्याला वाटलें कीं, आज आपले भरभराटीचे दिवस लयास गेले. कांहीं वेळ स्तब्ध राहून, देवाची प्रार्थना करून ह्मणूं लागला, हे देवा, असा आह्मी तुझा कोणता अपराध केला. परक्या लोकांचे गुलाम होऊन रहाणें आमच्या नशीबीं आलें ना ? आमच्या मुलांबाळांस जन्मापासून बंधनच ना ? जळो आमचं जिणें, नको हा जन्म, परतंत्र राहाण्यापेक्षां मरण येईल तर उत्तम. कृपाघना, तूं आमच्या साह्यास येत असतां आमचीं पापकर्में तुला वाटेंत आड आलीं काय ? आतां आमची काय दुर्दशा होईल, याप्रमाणें शोकांत निमग्न असतां चंद्रकांतानें त्याचें शांतवन केलें. नंतर वीरभद्र राजास विनयपूर्वक प्रार्थना करून ह्मणाला कीं, महाराज, आपली प्रजा रस्त्यावर डोळे लावून तटस्थ वाट पहात उभी राहिली आहे, व मला त्यांनीं समोर पाठविलें आहे; तरी आतां आपण तिकडे गेलेंच पाहिजे. याप्रमाणें आपल्या सेनेचा व सेनापतीचा फारच आग्रह पाहून चंद्रकांत त्याची शेवटची सलामी घेऊन मागें परतला.

इकडे वीरसिंह, गावांबाहेर डेरे देऊन आपल्या पि-

त्याची वाट पहात होतांच तों तिकडून कांहीं घोडेस्वार उधळत येत आहेत, असें त्यानें पाहिलें. जवळ येतांच आपला पिता चंद्रकांत यास त्यानें ओळखिला. पुढें धांवत जाऊन त्यास आलिंगन दिलें, चंद्रकांताचे कपडे रक्तानें आणि चिखलानें भिजून चींप झाले होते "आई कोठें आहे" ह्मणून वीरसिंहानें लागलीच चौकशी केली तें ऐकतांच राजाचा कंठ सद्गदित झाला; आणि ह्मणाला, बाबारे, ती आपणास टाकून गेली. ते शब्द वीरसिंहाच्या हृदयांत बाणासारखे टोंचले. एक शब्दही न बोलतां तो मूर्च्छा येऊन धाडदिशीं जमिनीवर पडला. मग त्या आकांतास काय विचारावें. तें ऐकतांच सर्वांच्या हृदयांत धडकी भरली सर्व आपला व्यवहार सोडून तेथें जमले. शीतोपचार करून राजपुत्रास सावध केला, परंतु परत हंबरडा फोडून त्यानें रडण्यास आरंभ केला. कोणासही तें दुःख आवरेना, मग काय विचारावें एकच कल्होळ होऊन गेला. चंद्रकांतानें आपल्या पुत्राच्या गळ्यास मिठी मारिली, आणि ह्मणाला, बाळा, आतां शोक पुरे कर. माझा सगळा जोर तुझ्यावर आहे. तूंच असें दुःख करशील तर सोमकांत तुझा धाकटा भाऊ काय बरें करील ? आह्मांकडे पहा. गत गोष्टीचा शोक करून काय बरें होशील. मग राजपुत्रही शुद्धिवर येऊन मोठ्यानें ह्मणाला, " आई " तूं आपल्या तान्ह्यास टाकून कांग गेलीस. आतां मुला, ह्मणून मला हांक कोण मारील ! आई, आह्मीं कायग तुझा अपराध केला ! सोमकांत तुझा प्रिय बालक याजवर तरी तूं इतकी निर्दय कां बरें झालीस ! तूं आतां हंसत हंसत माझ्यापाशीं केव्हां तरी दोन गोड शब्द

बोलशील काय ? तूं सर्वांआधीं त्वरा कांग केलीस ! आई, मी दुष्ट तुझा अंतरवैरी कसाग झालों ! ये माझ्या- पाशीं दोन गोड शब्द बोल; मग तूं जा. तूं आतां कसली येतेस. आतां मला कशानें भेटणार ! असा विलाप करीत आहे, तों पुनः कंठ भरून आला. हृदय सद्गदित झालें. डोळ्यांपुढें आंधारी आली आणि पुनः मुर्च्छा येऊन जमि- नीवर पडला. मुलाची अशी दशा पाहून चंद्रकांतासही गहिंवर आला, पुनः राजपुत्रास शीतोपचार करून शुद्धि- वर आणिला. मग चंद्रकांतानें त्याला मांडीवर घेतलें, आणि हातानें तोंड कुरवाळून ह्मणाला बाळा, आतां शोक पुरे कर. असें करून आतां वृद्धापकाळीं मला दुःख देऊं नको. परमेश्वर आपणावर कोपला त्याला उपाय नाहीं. सर्व दिवस—सारखे कसे येतील ! जगांत सुख दुःख आहेच याप्रमाणें अनेक तऱ्हेनें त्यानें पुत्राचें शांतवन केलें.

मत्सपुर शोकानें व्याप्त झालें. सर्वांचा उल्हास गेला, तो सर्व समारंभ विषतुल्य दिसूं लागला. त्या सुंदर शह- रास मृत्युकळा आलीसें दिसूं लागलें. इतक्यांत राजे- साहेबांचीही स्वारी शहरांत आली, असें भालदारांच्या ललकारण्यावरून आणि सिंगाच्या आवाजावरून समजून आलें, त्या उभयतांचें म्लान वदन पाहून सर्वांस मोठें दुःख झालें, आणि ते सर्व राजसभेंत येऊन पोंचले.

राजेसाहेबांची स्वारी सभेंत येतांच समरांगणांतून सर्व सेनेच्या नाशाची बातमी घेऊन जासूद आला. तरी रा- जानें धैर्य न सोडितां आपल्या अष्टप्रधानादि लोकांस सांगितलें कीं, जरकरितां तुमचें साह्य मजला आहे, तर अद्याप परमेश्वर आपणावर कृपा करील, यांत

कांहीं संशय नाहीं. परंतु ते दुष्ट लोक आपल्या मतास प्रतिकूल आहेत, असें थोड्याच वेळांत दिसून आलें. तो दुर्वीर्य महान कपटी, त्यानें पूर्वींच त्या लोकांस लांच देऊन फितुर केलें होतें, व या दुष्टांनीं विचार केला कीं, चंद्रकांताचा आतां पराभव झाला आहे व त्याच्या राज्यांत आपले हेतू तडीस नेतां येत नाहींत, त्यापेक्षां दुर्वीर्य राजा असल्यानें मग हें राज्य आपलेंच. पाहिजे तसे लोकांवर कर ठेवून अगर अनेक उपायांनीं द्रव्य गोळा करूं. याप्रमाणें स्वतःच्या हितार्थ आपला देश धुळीस मिळविण्याची त्यांनीं युक्ती योजली. राजाचा स्वभाव फार शांत होता, त्यानें या दुष्ट लोकांचे सर्व उद्देश जाणिले आणि त्यांस सांगितलें कीं, हें राज्य मला माझ्या वैभवाकरितां नको. सर्वांस आनंद आहे तरच राज्य चालविण्याची गोडी, राज्य कारभाराच्या काळजीपेक्षां भगवत्चरणारविंदीं कालक्षेप करण्यांतच मला आनंद आहे. आपणास आवडेल तो आपण राजा करा; माझ्या प्रजेच्या हितार्थ हें राज्य तर काय ? परंतु आपला प्राणही अर्पण करण्यास मी सिद्ध आहें. असो, अशीं बोलणीं चाललीं आहेत तों दुर्वीर्यानें सर्व सेनेसह येऊन शहरास वेढा घातला, ही बातमी येऊन पोंचली इकडे मेनकावती आपल्या सैन्यांत येत असतां दुर्मतीनें तिला मूर्च्छित पाडिलें, हें मागें सांगितलेंच आहे. नंतर तिला सावध करून दुर्वीर्यापाशीं घेऊन गेले. तूं कोण आहेस ? असें त्यानें विचारिसांच तिनें उत्तर केलें, मी राजपत्नी आहें; जुलुमी लोकांपासून आपले प्रजेचें संरक्षण करीत असतां परमेश्वर आह्मांवर कोपल्यामुळें या सांपळ्यांत येऊन पडल्यें आहें. तें ऐकतांच त्याला मोठा

राग आला, आणि तिला पहाऱ्यांत नेऊन ठेवण्याविषयीं हुकूम दिला. बिचारी करते काय ? वाघाच्या तावडीस गाय सांपडावी तद्वत तिची अवस्था झाली तेथें अन्न पाण्याशिवाय तळमळत राहणें तिला भाग पडलें. तेथें तिला तिच्या प्रिय बाळकाची आठवण झाली, आणि करुणास्वर काढून ह्मणूं लागली, बा सोमकांता, तूं कोठेंरे आहेस ? तुला केव्हांरे पाहीन; जो तुझ्यावांचून माझा एक क्षणही जात नसे, तो आतां घटिकांच्या घटिका, प्रहरच्या प्रहर, दिवसच्या दिवस ही जाणारना ? मी तुझ्याशिवाय कशीरे वांचेन ? देवा, मी तुझा असा कोणता अपराध केला बरें ? त्वां अशी मायलेकरांची तूट कशीरे पाडिलीस ? हे देवा, आमचे सर्व अपराध पोटांत घाल, आतां क्षमा कर. तूं उदार आहेस, कृपण नाहींस आह्मीं तुझीं लेकरें दुःखानें पीडिलों आहों, तुजपाशीं कृपारूप उदकानें भरलेले प्रचंड मेघ आहेत त्यांतील थोडासा अंश इकडे टाक; फार नको, अगदीं थोडा टाक. या प्रमाणें विलाप करीत भर दोनप्रहरीं, उन्हानें तळमळत मेनकावती पडली होती. अन्न नाहीं, पाणी नाहीं, यामुळें घशास कोरड पडली. दैवाची गति किती विचित्र आहे, जिनें इतक्या वेळांत चार वेळा ऐष आरामींत मिष्टान्नाचें भोजन व्हावयाचें, त्याच मेनकावतीनें आतां भाकरीच्या तुकड्यासाठीं, आणि पाण्याच्या घोटासाटीं तळमळत पडावें काय ? परमेश्वराची लीला अद्भुत आहे. तो एका क्षणांत राजाचा रंक आणि रंकाचा राजा करूं शकेल. कोणत्या वेळीं काय होईल याचा नेम नाहीं. असो, आपल्या प्रिय पतीची अवस्था काय झाली असेल ही एक मोठीच काळजी तिला येऊन पडली, सर्वांगास घाम सुटला, तोंड

काकऋतवाणी दिसूं लागलें, इतक्यांत लांकडाच्या तंबोऱ्यांत कांहीं पाणी, हातांत दोन भाकरीचे तुकडे घेऊन एक मनुष्य तेथें आला, विचारी काय करते, अतिशय भूक लागल्यामुळें पोटाची अगदीं दामटी वळून गेली होती, मग खावत नव्हतें तरी त्यांतील थोडासा तुकडा खाऊन विलाप करीत ती तेथेंच पडली. तो दुष्ट दुर्वीर्य फार कपटी असे त्यानें विचार केला कीं, राणीला तह करण्यास शहरांत पाठवावें व जर तिला त्यामध्यें यश आलें नाहीं, तर राणीनें परत यावें. परंतु तो पक्कें समजत असे कीं, ही एकदां शहरांत गेल्यावर परत येणार नाहीं. कारण कपट्यास सर्व कपटीच दिसतात. परंतु आपला मतलब साधण्याकरितां आपण हिला शहरांत परत पाठविली असतां आपली ख्याति होऊन लोकांचीं मनें आपणाकडे वळतील; असा विचार करून तिची रवानगी मत्सपुरास केली.

ज्या मेनकावतीची पूर्वींच आशा तुटली होती, तीच मेनकावती काळाच्या तोंडांतून सुटून जेव्हां त्या राजकुटुंबास भेटली, तेव्हां त्याचा आनंद कोठें बरें मावेल! ती येतांच त्या राजसभेंत सर्व आनंदमय होऊन गेलें. कांहीं वेळ आनंदांत गेल्यानंतर मेनकावतीनें आपला येण्याचा उद्देश त्यांस सांगितला, कीं दुर्वीर्य तुमच्या पाशीं सर्व मजबूत किल्ले, दर वर्षास ९ लक्ष रुपये खंडणी, शिवाय या लढाईचा सर्व खर्च मागत आहे, परंतु यापैकीं एकही ठराव कबूल केला असतां आह्मांस लांछन आहे, फार तर काय, परंतु प्राण गेला तरी हे ठराव आह्मांस कबूल नाहींत, असें मेनकावतीनें आपलें मतही लागलेंच प्रदर्शित केलें. याप्रमाणें तिनें त्याजपाशीं तह करण्याचें नाकारून आपल्या कुटुं-

त्रास सोडून त्या भयंकर बंदीखान्यांत जाण्याचें कबूल केलें. नंतर त्या कपटी प्रधानांनीं राजास बाह्यात्कारी सांगितलें कीं, शत्रूस आमचाही शरण जाण्याचा इरादा नाहीं त्यापेक्षां आपण लढाईची तयारी करीत आहों. नंतर ती रात्र त्या राजकुटुंबानें आनंदांत घालविली.

**वीर०**—( जाहांदार याचें स्मरण होऊन ) बाबा! दादास कोठें पाहिलें काय ?

**राजा०**—बाळा त्याची गती काय झाली हें मला बिलकूल समजलें नाहीं. (दुःखानें ) अरेरे त्यास म्यां आश्वासन दिलें होतें कीं तुला मी सैन्याची मदत देऊन तुझें राज्य तुझ्या स्वाधीन करून देईन ! तें माझें ह्मणणें खोटें झालेंना ? त्याच्या आईचे मजवर किती उपकार आहेत! त्यांचीं कांहींतरी फेड होण्याची संधी आली असतां एकाएकीं असें झालें! मी आतां त्याच्या पित्यास कसें तोंड दाखवूं ! !

**वीरसिंह**—बाबा तो युद्ध क्रियेमध्यें फारच कुशल होता. मला अशी उमेद होती कीं, जर आपला जय झाला असता तर आह्मीं दोघांनीं ज्या दुष्टांनीं आपला असा हा विध्वंस केला त्यांचें पारिपत्य केल्याशिवाय हातांतील शस्त्रच खालीं ठेविलें नसतें ! !

**वीरभद्र**—महाराज तो एक अलौकिक गुणवान मुलगा होता. ईश्वर कृपेनें तो सुरक्षित असो ह्मणजे कधीं तरी तो आपल्यास येऊन भेटल्याशिवाय राहणार नाहीं, मग आपले सर्व हेतू सिद्धीस नेणार प्रभू समर्थ आहे.

**वीरसिंह**—कसचा बिचारा आतां आपल्या दृष्टीस पडतो ! सुरक्षित असता तर आपल्यास भेटल्याशिवाय

मुळींच राहिला नसता ! ! कोठेंही असो परंतु ईश्वर त्यास सुरक्षित ठेऊन आपणास पुन्हां भेटवो.

प्रभातकाल झाल्यानंतर, राणी, आपल्या परत जाण्याच्या तयारीस लागली, हें पाहून सर्वांस मोठें दुःख झालें, कित्येकांनीं आतां परत न जाण्याविषयीं तिजपाशीं फारच आग्रह धरिला; परंतु विश्वासघातापेक्षां मरणच मला प्रिय आहे असें तिनें सांगितलें, पुष्कळ लोक जमल्यामुळें एकच गर्दी होऊन गेली होती. सर्वांच्या नेत्रांतून आश्रुपात चालले आहेत, हें पाहून तिलाही गहिंवर आला. चंद्रकांतही तेथें स्तब्ध उभा होता; त्याच्या चेहऱ्यावर उठलेली दुःखाची मुद्रा उघड दिसत होती. वीरसिंहही खिन्न वदन होऊन एकीकडे बसला होता. सोमकांताचें वय सुमारें तीन साडेतीन वर्षांचें होतें, तो मेनकावतीच्या कडेवरच होता, ती निघतांच सर्वांस जें दुःख झालें त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. मग दगडासारिखें ह्रदय करून तिनें आपल्या प्रिय लेंकरांस दुसऱ्याजवळ दिलें, परंतु जो त्यानें तिचा पदर धरिला होता, तो कांहीं केल्या सोडीना, आणि आई, "तूं कुनीकलेग जातेस, मला बलोबल कांग नेत नाहींस, मी तिकले येतों." असे बोबडे शब्द बोलून एकच हंबरडा फोडिला. तें पाहून मेनकावतीलाही अतिशय दुःख झालें. तिनें त्यास पोटाशीं धरिलें. तोंडावरून हात कुरवाळला, आणि मुके घेऊन ह्मणूं लागली कीं, तूं रडूं नको, मी तुझ्याकडे लवकरच येईन, अशी समजूत करून ती निघाली. चार पांवल पुढें जात आहे तों पुनः सोमकांत रडूं लागला, आणि आईला हांक मारून ह्मणतो, " आई दमधल, जाऊं ओको-

एकदां मला कवटाळून घे. तूं मला टाकून जातेस हें काय बरें." मग तिचें तरी पाऊल पुढें कसें उचलतें; ती तेथें स्तब्ध उभी राहिली. सोमकांतास सोडतांच तो तिजपाशीं धांवत गेला, त्याला पोटाशीं धरून त्याजकडे पहात ती राहिली. कंठ दाटून आल्यामुळें तिच्या तोंडांतून शब्द निघेना; तें पाहून चंद्रकांतास आणि वीरसिंहासही गहिंवर आला, इतक्यांत मेनकावतीचा रथ येऊन पोंचला. मग ती कांपत कांपत त्याजवळ गेली. सोमकांत विचारतो, आई " तूं कोठें जातेस, " परंतु तिच्या तोंडांतून एकही शब्द निघेना. वीरसिंहाच्या गळ्यास मिठी मारून हमसा हुमशीं रडूं लागली. नंतर तोंडांतून शब्द निघेना म्हणून हातानेंच तिनें रथ हांकण्यास इशारत केली. रथ दिसेनासा होईपर्यंत सर्वांचे डोळे तिकडे लागले होते. मग सर्व हळु हळु दुःख करीतच आपल्या घरीं जाते झाले.

ही सर्व बातमी त्या दुष्ट प्रधानांनीं दुर्वीर्यास दिली. त्याचे जासूद जात येत होतेच. मेनकावती परत आली हें पाहून दुर्वीर्यास आश्चर्य वाटलें. इकडे त्या कपटी प्रधानांनीं आपण लढाई करीत आहों असें दाखविण्याकरितां मोठी धामधूम चालविली. जेथें सैन्य ठेवण्याची जरूर नव्हती तेथें मोठा बंदोबस्त ठेविला. जे महत्वाचे किल्ले होते, तेथें एक मनुष्यसुद्धां नव्हतें. तो चतुर चंद्रकांत हें सर्व कपट जाणतच होता; परंतु आतां आपणांस राज्यकारभारांत कांहीं कर्तव्य नाहीं असें समजून एक शब्दही काढिला नाहीं. इकडे शत्रूनींही शहरांत घुसण्यास आरंभ केला.

प्रातःकाल झाल्यामुळें नित्यनेमाप्रमाणें सज्जन होते ते

आपलें प्रभात कर्म आटपून परमेश्वराचें स्तवन करूं लागले. दुर्जन होते ते ही संधी चांगली आहे, असें जाणून आपले मूर्ख उद्देश सिद्धीस नेण्याचे उद्योगास लागले. शत्रू शहरांत घुंसले व चंद्रकांतानें आपलें राज्य सोडिलें, ही बातमी गावांत फुटतांच सर्वांस फार दुःख झालें. हजारों लोकांचे थव्याचे थवे राजमंदिरासन्निध जमूं लागले. त्या लोकांनीं आजपर्यंत परशत्रूचें तोंडही पाहिलें नव्हतें, मग ते आपणावर राज्य करणार हें त्यांस सहन कसें होईल? आपण मरेपर्यंत लढाई करण्यास सिद्ध आहों, मात्र राजानें आह्मांस समरांगणीं न्यावें आह्मीं त्यांचे आज्ञाधारक सेवक आहों, परदेशांतील लोकांपाशीं गुलामगिरी करण्यापेक्षां मरण उत्तम आहे असे ध्वनि चहूंकडे निघूं लागले. लोकांचीं मनें अगदीं उद्विग्न होऊन गेलीं. राजमंदिराजवळील वागा हत्यारबंद लोकांनीं अगदीं भरून गेल्या, इतक्यांत चंद्रकांतही आपल्या लोकांस पाहाण्यास गच्चीवर आला. लोकांची नजर राजाकडे पोंचतांच त्यांनीं एकदम जयजयकार केला. तो नाद ऐकून रस्त्यावरील जमलेल्या लोकांनींही त्याचप्रमाणें केलें. तो आवाज एखाद्या भयंकर गडगडाटाप्रमाणें शत्रूचे कानीं जाऊन पडला. याप्रमाणें चहूंकडे एकच गर्दी होऊन गेली, आपल्या लोकांची आपणावर इतकी प्रीति आहे, हें पाहून राजासही मोठा आनंद झाला. राजाच्या तोंडचा एक शब्द निघतांच सर्व लोक शत्रूबरोबर लढण्यास कंबरा बांधून तयार होते. परंतु तो फार विचारी असे " आपल्या प्रधानादि थोर थोर लोकांच्या मनांतून आपण राज्य करावें असें नाहीं. शत्रूचाही नाश केला असतां पुढें तरी

शांतता होऊन मुरळीत चालेल, अशींही चिन्हें दिसत नाहींत. दुष्ट लोक आपला नाश करण्यास अगदीं प्रवृत्त आहेत. ते अनेक तऱ्हेच्या अवाई उठवून आपणावरील लोकांचें मन उडविण्याचा यत्न करितील त्यांतही जय न पावतील, तर प्रजेचा नाश करण्याकरितां दुसरी कांहीं तरी नवीन युक्ति काढतील ह्मणून आपण आतां हा राज्यकारभार सोडून महायात्रेस जावें हेंच उत्तम आहे. याप्रमाणें राजानें निश्चय केला. राजाचा हा निश्चय पाहून वीरसिंहास राजा करण्याचें लोकांनीं मनांत आणिलें; परंतु त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, राज्यसुख भोगण्यापेक्षां पित्याची सेवा करण्यांत कालक्षेप करावा, यांतच मला सुख आहे.

शत्रू येऊन आपली काय दशा करितील ही सर्वांस मोठी काळजी पडली, एकच धांदल चालली आहे, तों अस्तमान झाला, शत्रू शहरांत घुसले. दुर्वीर्य फार कपटी, त्यानें त्यावेळीं लूट वगैरे कांहीं केली नाहीं. मग मोठ्या थाटानें दुर्वीर्य महाराज, राजसभेंत येण्याकरितां निघाले. बरोबर सर्व सैन्य घेतलें, मागें पुढें भालदार ललकारताहेत, मशालींचा एकच चकचकाट होऊन गेला आहे, हजारों घोडेस्वार, श्रृंगारलेले हत्ती, पदाती, मागें पुढें चालले आहेत, नानाप्रकारचीं वाद्यें वाजत आहेत. तोफांच्या सलाम्या चालल्या आहेत, अशा मिजाशीखालीं स्वारी राजसभेसन्निध येऊन पोंचली; इतक्यांत ते दुष्ट मंत्री हंसत हंसत सामोरे येऊन महाराजांचा हात धरून आसनीं बसविलें दुर्वीर्याची व चंद्रकांताचीही मुलाकत झाली. त्याचें शांत गंभीर सुहास्य वदन पाहून दुर्वीर्यास मोठें आश्चर्य वाटलें. दुर्वीर्य महाराजांनीं मेनकावतीस बंधनमुक्त केलें

आणि त्या त्रिवर्गांबरोबर यात्रेस जाण्याकरितां आपल्या लोकांपैकीं बरेच शिपाई दिले.

प्रातःकाल होतांच महायात्रेस जाण्याची तयारी राजवाड्यांत चालली. गावांतील नरनारी सर्व पोंचवण्यास आल्या. आजपर्यंत पित्याप्रमाणें पालिग्रहण करून आतां आपणास राजा सोडून जाणार, हें पाहून सर्वांस फार दुःख झालें. मग चंद्रकांत, मेनकावती, वीरसिंह आणि सोमकांत राजवाड्यांतून बाहेर पडलीं. सर्व नगरी शोकानें व्याप्त झाली, नगरांतील हजारों लोक दूरपर्यंत राजास पोंचविण्यास गेले; चंद्रकांतानें त्यांस परत जाण्याकरितां फारच आग्रह केला. शेवटीं सांगितलें कीं, आपण माझ्यावर इतकी प्रीति करितां, हें पाहून मी तुमचा फार आभारी आहें, आजपर्यंत मला राज्य चालविण्यांत आपण फार चांगली मदत केली, त्याचप्रमाणें हल्लींच्या राजास करून त्याचे आज्ञेंत वागत जा. याप्रमाणें उपदेशपर कांहीं गोष्टी सांगून त्यांचा निरोप घेतला.

आतां आपण जरा मागें वळूं. जाहांदार निकरानें लढत असतां कोणी दुष्टानें त्यास पाठीमागून येऊन त्याच्या मांडीवर घाव केला तसाच तो एकदम घोड्यावरून खालीं पडला, परंतु एकाच बाणानें त्यानें त्या घाव करणारास यमाच्या भेटीस पाठविला. जाहांदार खालीं पडल्यावर लागलाच एक शिपाई आला व त्यानें त्यास पाठीवर बांधून नीट अरण्याचा मार्ग धरिला. हा शिपाई एक रामोशी जातीचा होता व असाच लढाईंत एकदां दुर्वीर्याच्या सैन्यांतील शिपायानें त्यास मारण्याकरितां हात वर केला असतां जाहांदार यानें त्या शिपायाचा हात वरच्यावर

तरवारीच्या झटक्यानें उडवून दिला होता तो उपकार त्या रामोशानें ध्यानांत ठेविला होता, दुसरें चंद्रकांताजवळ हा शिपाई फार शूर आहे अशी शिफारस करून त्याची पदवी वाढवून त्यास जाहांदार यानें इनामही देवविलें होतें. रामोशानें त्यास आपल्या घरीं नेल्यावर एका जातीच्या वनस्पतीचा रस हातावर चोळून त्याचे जखमेवर लावतांच ती जखम मिळून गेली. कांहीं दिवसांनीं चंद्रकांतासह सर्व राजकुटुंब अरण्यवासांत गेलें अशी बातमी रामोशाकडून त्यास कळल्यावर त्यास फार दुःख झालें. ( हा रामोशी वेश पालटून शहरांतील बातमी गुप्त रीतीनें काढून जाहांदार यास कळवीत असे. ) जाहांदारानें त्याच अरण्यांत कांहीं दिवस राहून सुमारें तीनशें चारशें रामोशी गोळा केले व त्यांजवळून त्यांच्या देवीची शपथ करवून त्यांस युद्धाचे कामांत तरबेत केलें, व त्या सर्वांवर आपल्या सुभानरावास मुख्य करून त्याचा हुकूम सर्वांनीं मानावा अशी सुचना त्यांस केली होती. जहांदार याची जखम बरी झाल्यावर तो वेश पालटून चंद्रकांतादि विरसिंह मेनका यांचा शोध करण्यास निघाला. इकडे तें राजकुटुंब व दुर्वीर्यानें बरोबर दिलेले शिपाई त्या दिवशीं जवळच डेरा देऊन दुसऱ्या दिवशीं पुष्कळ मजल घेऊन स्वारी एका अरण्यांत उतरली, मनुष्यें बरींच होतीं ह्मणून रानांतील जनावरांची धास्ती नव्हती. राजेसाहेबांची जेवणांची तयारी होईपर्यंत हवा खात बसण्याकरितां शिपायांनीं चांदण्यांत उघड्यावर बिछाईत पसरली. नंतर तें राजकुटुंब तेथें हवा खात बसलें. सोमकांताच्या बोलण्याचें सर्वांस मोठें कौतुक वाटत असे. तो इकडे तिकडे

धांवे, मेनकावती त्याचे पाठीमागें धांवत धांवत जाऊन त्यास धरून आणून राजापाशीं देई, तो मोठा सुंदर आणि चपल असल्यामुळें त्याजकडे पाहिलें असतां सर्वांस मोठा आनंद होत असे. आपलें राज्य गेलें त्याजबद्दल एकाच्याही मनांत दुःखाचा लेशही वसत नव्हता, असो ज्यांस सुंदर रंगमहालांत निजण्याची सवय, त्यांस थंडींत कुडकुडत पडणें ह्मटलें ह्मणजे फार कठीण आहे, परंतु तीं सर्व फार विचारी होतीं ह्मणून मोठ्या आनंदानें त्यांनीं तें दुःख सोशिलें. मात्र सोमकांताच्या तोंडांतून कांहीं दिनवाणे शब्द निघाले असतां त्यांचा कंठ दाटून येत असे, इकडील तिकडील बोलणीं चाललीं आहेत तों भोजनाची तयारी झाली. त्या दिवशीं सोमकांत आईजवळ जेवीना; ह्मणून चंद्रकांतानें त्यास आपणाकडे हांक मारिली. मग धांवत धांवत जाऊन तो त्याच्या मांडीवर बसला, मग सर्वांचें आनंदांत जेवण झाल्यावर तांबूल घेऊन तीं सर्व निद्रिस्थ झालीं. सर्वांनीं आपलीं कामें आटपून तेही झोपीं गेले.

सुमारें दोन अडीच घटिका रात्र उरली आहे तों मेनकावती जागी झाली, आणि आज सर्व रात्रींत सोमकांत जागा झाला नाहीं, ह्मणून त्याजवर हात टाकून पाहते तों तो सुस्त पडला आहे. तेथें दिवा जळत असावयाचा तो नव्हता, ह्मणून ती पाहरेवाल्यांस हांक मारूं लागली, परंतु कोणी हांक देईना, ह्याचें तिला मोठें आश्चर्य वाटून पोटांत धस्स झालें ! ! वीरसिंह जवळच तेथें निजला होता, त्यास जागा केला; तो उठून सुमारें अर्ध घटिका इकडे तिकडे फिरला, परंतु एकही मनुष्य त्याचे

दृष्टीस पडलें नाहीं. बापाचा बिछानाही त्यास सांपडेना मोठ्यानें आरोळ्या ठोकूं लागला, तरी कोणीं हांक देईना. हें पाहून मेनकावतीच्या मनांत भलतेच विचार येऊन तिची बोबडी वळली, तिच्या तोंडांतून शब्दही निघेना व तेथून उठवेना. आई, हा कांहीं तरी घात आहे, इतके वीरसिंहाचे तोंडचे शब्द तिचे कानीं पडतांच एकदम धाडदिशीं ती खालीं पडली आणि परमेश्वरा, हें काय संकट उद्भवलें इतकें बोलून तिनें हंबरडा फोडिला. मग त्या बिचारीस कांहींच देहभान राहिलें नाहीं. काळोख किट्ट पडला होता, तरी ती वेड्यासारखी इकडे तिकडे धावूं लागली, गडबड गडबड इकडे तिकडे लोळून तिनें एकच आकांत केला. रानांतील भयंकर पशूंच्या किंकाळ्या कानीं पडत आहेत, भालू इत्यादि भयंकर पशूंचे आवाज ऐकूं येत आहेत, इतक्यांत पुढें कोणीं आहे कीं काय कांहीं खुसबुसलें कीं काय! असें वाटे, परंतु कोणासही न भितां आपल्या प्रियपतीसाठीं मेनकावतीनें दारुण शोक चालविला. इकडे वीरसिंहानें काळोखांतून बराच शोध केला; परंतु पत्ता नाहीं, असें पाहून तोही रडूं लागला. ती काळोखी रात्र त्यांस यमस्वरूपी दिसूं लागली. मग धांवत धांवत जाऊन त्यानें आपल्या आईच्या गळ्यास मिठी मारिली. मग दोघांनीही आक्रोशाचा आकांत मांडिला, परस्परांचा शोक आवरेना, परंतु आपण कोणत्या स्थितींत आहों याची वीरसिंहास आठवण झाली, इतक्यांत मेनकावतीनें त्यास विचारिलें कीं मुला, तूं नीट पाहिलेंस काय ? असें होईल तरी कसें ? एका रात्रींत आपणावर घाला कसा रे बा येईल ? हें मला स्वप्न तर पडलें नाहींना ? मला तरी जाऊन पाहूं दे; असें

ह्मणून वर उठली, आणि एकदम घेरी येऊन खालीं पडली. रडतां रडतां तिचा घसा अगदीं बसून गेला, तोंडांतून शब्दही निघेना, आईची ही दशा पाहून वीरसिंहास अधिकच दुःख झालें, परंतु यासमयीं आपणही शोक करूं तर हिचे प्राण वांचणार नाहींत, ह्मणून तो स्तब्ध राहिला. आईची मान आपल्या मांडीवर घेऊन त्यानें अनेक तऱ्हेनें तिचें शांतवन चालविलें. मेनकावती डोळे उघडून पाहते तों दिशा फांकल्या मग तिला आपली स्थिति काय आहे हें दिसून आलें. आपण एका भयंकर अरण्यांत आहों, वीरसिंहाशिवाय येथें कोणी नाहीं. चंद्रकांताचा बिछानाही तिच्या दृष्टीस पडेना. हें पाहून तिचें अंतःकरण धडधडां उडूं लागलें. सर्वांगास घाम सुटला मग निराश होऊन जमिनीवर हात आपटून विलाप करण्यास आरंभ केला, व ह्मणूं लागली प्रिया; आपल्या दासीची कांहो सांड केली. मला अरण्यांत टाकून आपण निघून गेलां, इतकी चूक माझ्या हातून कोणती तरी झाली ! माझी येथेंच मान कापून आपण गेलां असतां तर मला दुःख न होतें. सोमकांताशिवाय तुह्मांला कसेंहो चैन पडेल! त्याजवरसुद्धां आपण इतके निष्ठूर कशानें झालां! शिव शिव! असें दुःख भोगण्याचें माझ्या कसें हो प्रारब्धीं लिहिलें होतें ! आतां मी काय करूं. हे आई, धरित्री माते, तुला तरी माझी करुणा येऊं दे; आणि मला एकदां आपल्या पोटांत घे. प्रिया, आपला त्या दुष्टांनीं घात करून ते निघून तर गेले नसतीलना! अशी आकाशांतील कुऱ्हाड आह्मांवर एकदम कशीहो कोसळली ! तुमचे तेथें त्यांनीं हाल कींहो केले असतील; पण आह्मी जवळच असतां आह्मांवर कशी हो

काळझोंप लोटली ! शेवटचा एक गोड शब्द तरी बोलावयाचा होता ! एक हांक तरी मारावयाची होतीत ! आतां तुह्मांवांचून मी या जगांत काय करूं! असा विलाप करीत आहे तों डोळ्यांपुढें कांहीं दिसेना. कंठ दाटून आला, आणि तेथें कांहीं वेळ स्तब्ध राहिली. अद्यापपर्यंत सोमकांत सुस्त निजला आहे, हा विचार मनांत येऊन ती एकदम दचकून उभी राहिली. वीरसिंहानें सोमकांतास उचलून तिच्या मांडीवर दिलें, आणि बोलूं लागला कीं याजकडे पाहून तरी आतां उगाच रहा. तूंच असा शोक करशील तर मी काय करूं, आपणावर परमेश्वर कोपला खरा, आतां शोक करूं नको. माझ्यानें तुझें दुःख नाहीं पाहवत. मेनकावतीनें आपल्या मुलास मांडीवर घेऊन त्याचें तोंड कुरवाळलें. त्याजकडे पाहून तिला जरा दुःखांत सुख झालें खरें, परंतु सोमकांत उठेना हें पाहून तिची कंबर खचून गेली. मग त्यास उठविण्यास त्या उभयतांनीं फार यत्न केला, तरी तो उठेना, हें पाहून मेनकावतीनें जो शोक केला, त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. आपला प्रिय बालकही आपणास टाकून गेला कीं काय असें तिला वाटलें. एका रात्रींत आपणावर असा प्रसंग कशानें आला, याविषयीं तिला कांहींच सुचेना. घडोघडी त्याच्या तोंडावरून हात कुरवाळून त्याचे मुके घेई, आणि ह्मणे बा ऊठ, तूं तरी माझा अंत पाहूं नको; अरे दुःखानें माझें अंतःकरण अगदीं पोळून गेलें आहे. ऊठ, लौकर तूं डोळे उघडून माझ्याकडे पहा. परंतु सोमकांत उठत नाहीं असें पाहून तिची अगदीं निराशा झाली. कांहीं सुचेना, गडबडां जमिनीवर लोळूं लागली. अनेक तऱ्हेनें सोमकांताकडे पाहून

त्याची विनवणी करून ह्मणते, वा सोमकांता, वा चंद्रवदना, मला कसारे टाकून गेलास ! या पृथ्वीच्या पाठीवर मजसारिखी कोणीतरी दुःखी असेल काय ? हा कुटुंबघात अशा स्थितींत मी कसारे सोसूं! पण कालच तूं हंसत खेळत होतास--गेल्या रात्रीं तूं आपल्या गोड शब्दांनीं आह्मांस आनंदवीत होतास, तें आतां सर्व स्वप्नवत् झालेंना ! असा विलाप करीत आहे तों टळटळित दोनप्रहर झाली. वीरसिंहही शोक करीत एकीकडे पडला होता. आपल्या प्रिय पित्याची व बंधूची अशी दशा पाहून त्याचें अंतःकरण अगदीं विव्हलित होऊन गेलें. मेनकावतीचेंही शांतवन त्याच्यानें करवेना अन्नपाण्याशिवाय दोघेंही तेथें दिवसभर विलाप करीतच पडलीं. आपला प्रिय बालक, आपणास टाकून गेला व आपणास वैधव्य प्राप्त झालें हें पाहून त्या दिवशीं तिनें अतिशयितच शोक केला. आतां आपल्या प्रिय बालकास आपण सोडून जाणार हें परस्परांच्या मनांत येतांच मेनकावती त्यास पोटाशीं कवळून मोठ्या दुःखानें ह्रदय पिटूं लागलीं. ह्मणते वा सोमकांता, सकुमारा, वत्सा, वा सर्वांआधीं त्वरा कशीरे केलीस. असें रुदन करीत आहे, हें पाहून वीरसिंहही शोकार्णवांत बुडून गेला; परंतु वीरसिंहास सोमकांताविषयीं धीर तुटेना, त्याच्या अंगांत ऊब होती. यावरून विचार करितां करितां वीरसिंहाची खात्री झाली कीं, ज्याप्रमाणें एखादा अमलांत गुंग पडतो त्याप्रमाणें हा पडला आहे, तरी ज्यावेळीं हा अमली पदार्थ चारिला आहे, त्यावेळेशिवाय उतरावयाचा नाहीं. परंतु जसजसा दिवस अस्तमानास चालला, तसतसा मेनकावतीचा धीर तुटत चालला, तिला त्यापैकीं कांहींच खरें वाटेना. अस्त-

मान होतांच सोमकांत अंग हालवूं लागला; लागलेंच वीरसिंहानें पाणी आणिलें, कांहीं सीतोपचार केल्यानंतर सोमकांतानें डोळे उघडले. काळाच्या तोंडांतून आपणास मुलगा सांपडला, हें पाहून मेनकावतीला आनंद झाला; मोठ्या प्रेमानें ती त्याला पाजूं लागली. अतिशय भूक लागल्यामुळें कांहीं भक्षणार्थ शोधून आणण्याकरितां वीरसिंह रानांत शिरला. बराच आंत जाऊन पाहतो तों खाण्याजोगें एकही फळझाड त्याच्या दृष्टीस पडेना. इतक्यांत रात्र पडत चालली, रानांतील जनावरांचे कळप त्याच्या दृष्टीस पडूं लागले. तरी जिवाचा निर्धार करून तो तेथें उभा राहिला, काळोख पडला नाहीं तोंच आपल्या आईकडे जाण्याची त्याच्या मनांत काळजी होतीच, त्या विचारांत उभा आहे तों जवळच कांहीं खुसखुसलें, असें त्याला वाटलें दचकून इकडे तिकडे पाहतो तों कांहीं नाहीं. मग निराश होऊन मागें परतला, तों थोडथोडें दिसत होतें, इतक्यांत आपल्या उजव्या बाजूस एक निंबाचा मोठा वृक्ष आहे, असें त्यानें पाहिलें. रात्र पडत चालली होती. ह्मणून एवढ्या मोठ्या वृक्षावर चढण्याचें धैर्य त्याला होईना; आतां रिकाम्या हातानें आईला तोंड दाखविण्यापेक्षां येथेंच मरावें, असें त्याच्या मनांत येई. परंतु आई दुःख करून मरेल, या रानांत तिला एकटी सोडणें हेंही बरोबर नाहीं, असें पुनः त्याच्या मनांत येई. मग इकडे तिकडे पाहतो तों तीन चार खालीं पडलेले नासके कुसके नींब त्याला सांपडले. तिकडे वीरसिंहाची वाट पाहत मेनकावती रस्त्याकडे डोळे लावून होती तों त्यानें धांवत

धांवत येऊन ते नीव तिला दिले. मेनकावतीनें मोठ्या कष्टानें ते खाल्ले. सर्व दिवसभर शोक केल्यामुळें अगदीं दमून गेली होती, ह्मणून बिछान्याला अंग लागतांच ती झोंपी गेली. वीरसिंहही उपाशीं तळमळतच तेथें जवळच निजला. पोटांत कांहीं नसल्यामुळें त्याला नीज येईना. मग अनेक तऱ्हेचे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. आतां उदयिक आपण काय करावें, आईला कोठें न्यावी, तिच्यानें चालवेल कसें. वाटेनें खावयास तरी मिळेल काय? अशा अनेक विचारांनीं त्याचें मन अगदीं गढून गेलें. आपल्या पित्याची दशा काय झाली असेल, ही एक मोठीच काळजी त्याला येऊन पडली. उजाडेपर्यंत अशा विचारांत बिचारा तळमळत राहिला. प्रातःकाल होतांच त्या दोघांनीं पुढें कोठें तरी गावांत जाऊन राहण्याचा निश्चय केला. मेनकावतीला आपल्या पतीची आठवण होऊन पुन्हां ती रडत बसली; परंतु आतां शोक करणें व्यर्थ आहे, असें जाणून तिनें आपलें दुःख शमन करण्याचा यत्न केला. सोमकांत अद्यापि गुंगींतच होता. आपल्या मुलाचा अपमृत्यु टळला, ह्मणून ती परमेश्वराची प्रार्थना करूं लागली. त्या दुष्टाच्या नरडीचा घोट घ्यावा कीं काय असें तिला वाटलें. पण बिचारी करते काय? असो, आपल्या आईकरितां त्या दोन बिछान्यापैकीं एकाची वळकटी करून वीरसिंहानें आपल्या डोकीवर घेतली. आणि सोमकांतास आईनें कडेवर घेऊन दोघें मार्गस्थ झालीं. ज्यांस पालखींत बसण्याची संवय, ज्यांस उन्हांतून व खड्यांवरून पाऊल टाकण्याचें जन्मांतही माहीत नाहीं; त्यांना डोकीवर ओझें घेऊन अन्नपाण्याशिवाय कांटे तुडवीत अनवाणी जाणें

किती बरें कठीण आहे. असो, मेनकावतीला मध्यें मध्यें आपल्या पतीची आठवण होऊन पाऊल उचलेनासें होई. पण सोमकांताकडे पाहून आपलें दुःख ती विसरे. तो अद्याप धुंदीतच होता. दोनप्रहर झाली, तेव्हां एका झाडाखालीं उतरलीं. मग वाटेनें जमविलेलीं फळें वगैरे खाऊन पुढें जाऊं लागलीं. आपण कोठें जात आहों हें कोणालाही समजेना. त्यांनां वाट तुटतां तुटेना. चार पाउलें पुढें जाऊन मेनकावती सपसोल जमिनीवर पडे, सूर्याचे तीव्र किरण तिच्या सकुमार अंगाला विस्तवाप्रमाणें झोंबत, पतीच्या शोकानें चेहरा अगदीं म्लान होऊन गेला. पायांत कांटे भरले होते, ठेंचा लागत होत्या तशांत मुलाला कडेवर घेऊन तापलेल्या खड्यावरून मजल मारण्याचा तर हा पहिलाच प्रसंग वृद्धापकालीं त्या राजपत्नीला होता. यावरून तिची स्थिति काय झाली असेल हें सहज ध्यानांत येईलच. याप्रमाणें तीं त्रिवर्ग मजल घेत असतां मेनकावतीनें मागें पाहिलें तर वीरसिंह बिछाना टाकून एका दगडावर आपलें डोकें ठेऊन पडला आहे, हें पाहून ती बिचारी धांवत धांवत त्याजवळ आली. वीरसिंहही आपल्या आईस दुःख होईल ह्मणून उठवत नव्हतें तरी जिवावर उठून तो बिछाना डोकीवर घेतला आणि चालूं लागला, परंतु पुढें दोन पाउलेंही टाकवतना; तेथेंच घेरी येऊन खालीं पडला. हें पाहून मेनकावतीचा शोक आवरेना. मोठा दुःखाचा सुसकारा टाकून ती परमेश्वराचा धांवा करूं लागली कीं, हर, हर, हे ईश्वरा, अशी आह्मांकडे तूं डोळेझांक कां करतोस! असा तुझा आह्मीं अपराध तरी कोणता केला? माझी अशी दशा

होईल हें थोड्या दिवसांपूर्वी स्वप्नीं तरी वसत होतें काय ? हे नारायणा, हे करुणाकरा माझ्या प्रिय तान्ह्याला आतां तरी दुःख देऊं नको. त्यांना चिरंजीव कर आणि मला या दुःखांतून एकदां लवकर सोडीव. हे देवा, आतां माझा अंत नकोरे पाहूं. हे कृपावना, तुझ्या कृपेच्या तान्हेलेल्या मनुष्यांची तूं दयारूप उदकानें तान भागीव. आह्मीं पीडित लेकरें आहोंत तुला आमची करुणा येऊंदे" याप्रमाणें विलाप करीत आहे, तों वीरसिंह शुद्धिवर आला. मग त्या त्रिवर्गांनीं रात्र तेथेंच काढिली. रात्रीं मेनकावती निजली असतां, चालून चालून फार थकली होती, ह्मणून वीरसिंह उठून तिचे पाय चेपीत बसला. जवळच रानांतील पशू फिरत होते, ह्मणून हातांत एक सोटा घेऊन तो आपल्या आईचे संरक्षणार्थ सर्व रात्र जागत होता. अरुणोदय होतांच पुनः तीं मायलेकरें मार्गस्थ झालीं; आणि मोठ्या सायासानें दोन प्रहर होईपर्यंत चाललीं पुढें मुळींच रस्ता खुंटला. तीं एका भयंकर अरण्यांत आलीं. दूर कुतऱ्याचे भुंकण्याचे आवाज मात्र कांनीं पडत, त्यावरून येथें कोणी पारधी आले आहेत, असें त्यांनीं अनुमान केलें. वीरसिंह कांहीं फळें आणण्याकरितां रानांत गेला. सोमकांताची प्रकृति आतां साफ चांगली झाली होती. प्रथमच तो इकडे तिकडे खेळूं लागला. उष्मा अतिशय होऊं लागला, ह्मणून तो अगदीं व्याकुळ झाला होता. आईला विचारतो " आई ऊन फालग लागत, बाबा ग कुत गेले, मला खायाला दे, भूक लागली, मला कलेवल घे," अशीं तीं बोबडीं बोलणीं चालली आहेत, तों वीरसिंह तिकडून किंकाळ्या फोडीत येत

आहे, असें त्यांनीं पाहिलें. मेनकावती वेड्यासारखी झाली पुढें पाहते तों वीरसिंहाच्या पाठीमागें एक भयंकर आस्वल लागलें आहे; त्या बिचाऱ्याजवळ शस्त्रास्त्र कांहीं नवतें मग त्यांच्या दशेस काय विचारावें !

दुर्वीर्यानें चंद्रकांताबरोबर लोक दिले होते हें मागें सांगितलेंच आहे. ते लोक देण्यांत त्याचा हेतु अगदीं निराळा होता. त्यांना, महाराजांनीं असें सांगितलें कीं, तुह्मीं दुसऱ्या मुक्कामास राजाच्या जेवणांत अमली पदार्थ घालवे; नंतर राजास उचलून एका खाड्यांत टाकून द्यावा आणि तुह्मीं आपल्या स्वदेशीं निघून जावें. त्या प्रमाणें त्या दुष्टानीं काळोख अगदीं कीट्ट पडला असतां राजास उचलून त्याला एका जवळच्याच कड्यावरून लोटून दिला; आणि ते स्वदेशीं निघून गेले. सोमकांताला मूर्च्छा येण्याचें कारण हेंच होतें कीं, तो त्या रात्रीं आपल्या पित्याच्या पुढ्यांत जेवला होता. असो, आतां इकडे दुर्वीर्य महाराज काय करिताहेत तें पाहूं.

चंद्रकांताची रवानगी करितांच दुर्वीर्य महाराजांनीं मत्सपूराचें आधिपत्य घेतलें. नवपुरी देशाचा हा मागें राजा होता; तें व मत्सपूर मिळून दोन्हीं राज्यें त्याचे स्वाधीन झालीं. दुसरे दिवशीं गावांबाहेर एक विस्तीर्ण सभामंडप काढून गावांतील संभावित लोकांस बोलावून महाराजांनीं कचेरीचा मोठा थाट केला; आणि शहरांतील खजिन्याविषयीं वगैरे चौकशी चालली असतां, आग, आग, असा चहूंकडे ध्वनीं उठूं लागला. वाराही बराच सोसाट्यानें चालला होता, पूर्वदिशेस मोठमोठाले धुराचे ढग दिसूं लागले. उत्तरेस अग्नीचे लोळचे लोळ आसमंतांत

उठूं लागले. कोठें कोठें मोठे भूकंप होत आहेत कीं काय असा भास झाला. लोकांच्या आरोळ्यांची एकच गर्दी होऊन गेली. भयंकर आवाजांवर आवाज होऊं लागले. धुराच्या लोटांनीं चारी दिशा व्याप्त झाल्या. कसलें घर आणि कसलें सामान! जो तो आपला जीव घेऊन ओरडतच बाहेर पडला. कोणाचीं लहान लहान मुलें, कोणाचे वृद्ध आईबाप; चालण्याची शक्ति नाहीं ह्मणून त्यांची जळून तेथेंच त्या अग्निकुंडांत आहुती झाली. रस्त्यावरून हजारों स्त्रिया कोणाचीं मुलें नाहींशीं झालीं, कोणास वैधव्य आलें ह्मणून ऊर पिटीत तेथेंच लोळूं लागल्या. कित्येक त्या दुःखांत जळत्या घरांत उड्या टाकून अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडल्या. कित्येक धुरांत कोंडून, कित्येकांवर विस्तव पडून, कित्येक अग्नि विझविण्याच्या यत्नांत मरण पावले. याप्रमाणें त्या भयंकर दिवशीं लक्षावधी मनुष्यें काळाचे तोंडीं पडलीं. या प्रसंगीं पाहिजे तशी लूट करण्यास दुर्वीर्याच्या लोकांनीं फारच चांगली मदत केली. लूटच काय? परंतु या वेळीं त्यांनीं जुलमाचा जो कहर केला, त्याचें या पुस्तकांत वर्णन करितां येत नाहीं. असो याप्रमाणें त्या सुंदर रमणीय मत्सपुराची धूळदैना झाली. गावांतील थोडेच लोकांचा या प्रसंगीं जीव बचावला गेला. इकडे गावांबाहेर महाराजांची स्वारी आपल्या अष्टप्रधानांसह होती. हा काय अनर्थ आहे. अशी मोठी हांका हांक करून आपणास मोठें आश्चर्य झालें आहे, असें प्रदर्शित केलें; परंतु तें अंतःकरणपूर्वक नसल्यामुळें वेड्यासारिखें दिसूं लागलें. आग विझवण्यास शहरांतील लोकांस मदत करण्यास

आपल्या लोकांस हुकूम केला. इतक्यांत महाराजांनीं दुसरा लागलाच हुकूम दिला कीं, जमलेल्या लोकांपैकीं थोर थोर लोकांस एकदम कैद करावें. आरोप इतकाच कीं, त्यांचा पूर्वींचा राजा गेल्यामुळें त्यांजकडील लोकांनीं शहरास अग्नि लाविला असावा, अशा वरील अनर्थाचें कारण वाचकांच्या ध्यानांत येईलच. दुर्वीर्याकडून त्या दुष्ट प्रधानास असा निरोप गेला होता कीं, आपले हेतू सिद्धीस नेण्यास त्या लोकांस पहिल्यानें भोळेपणा दाखवून अकस्मात घाला घातला पाहिजे. तरी आपण येऊं त्याचे दुसऱ्या दिवशीं शहरांत चहूंकडे अकस्मात् अग्नि लावण्याची तयारी ठेवावी, ह्मणजे आपलें काम झालें. नंतर त्या दुष्टांनीं अगदीं गुप्तपणें सर्व तयारी करून असा अनर्थ केला. याप्रमाणें दुर्वीर्य, कांहीं कारण नसतां मत्सपुरावर चढाई करून आला होता. हलकट उपायांनीं तेथील लोकांचा छळ करण्यास त्यानें आरंभ केला होता. कित्येक दुष्ट लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घेतलीं होतीं, आणि त्यांचे मदतीनें असे भयंकर अनर्थ त्या बिचाऱ्या गरीब लोकांवर आणिले. अनेक रीतीनें त्यांचा छळ करून त्यांच्या संपत्तिचें हरण करून ती आपले देशीं नेऊन भरण्याचा पहिल्यानें त्यानें आरंभ केला.

इकडे मेनकावती व सोमकांत एका अरण्यांत बसलीं असतां आस्वल पाठिमागें लागल्यामुळें वीरसिंह तिजकडे धांवत येत आहे, हें मागें सांगितलेंच आहे; परंतु जवळ शस्त्रास्त्र नाहीं ह्मणून त्याचा कांहीं उपाय चालेना. आपल्या आईच्या पूर्वीं आपण मरावें, ह्मणून वीरसिंह धांवत येऊन तिच्या समोर उभा राहिला, इतक्यांत अकाळ

विक्राळ स्वरूप पाहून सोमकांतही घाबरून रडूं लागला, आणि तो अस्वल तीन चार उडींत त्यास धरणार इतक्यांत एक भयंकर आवाज झाला. मेनकावती दचकून इकडे तिकडे पाहते तों तो अस्वल गोळी लागून खालीं तडफडत पडला आहे. हें परमेश्वरानेंच आपणास साह्य पाठविलें कीं काय ? हा आवाज कोठून आला, आसपास कोणी नाहीं. अशा मोठ्या आश्चर्यांतच तीं पडलीं आहेत. तों एक पारधी हातांत बंदुक घेऊन येऊं लागला. मेनकावती त्याला रडत रडत विचारूं लागली कीं, बाबा तूं आपले यजमान कोठें पाहिलेस काय ? रात्रीं मी निजलें असतां मला अरण्यांत टाकून गेले. त्या मेल्या दुष्टांनीं त्यांचे हाल करून प्राणतर घेतले नसतीलना ! आज तीन दिवस झाले. थांग नाहीं आतां मी काय करूं हें तोंड बाहेर कसें दाखवूं ! आजपर्यंत कसें तें ऊन तरी माहित होतें काय ? आतां ते कोठें असतील ! त्यांचें काय झालें असेल ! मी मेली अंतरवैरीण झालें. मला हें दुःख दाखविण्यास परमेश्वरानें जिवंत तरी कशाला ठेविलें आहे. हा देवानें अकस्मात घाला कसा तरी हो घातला ! आह्मीं त्या राज्याची अशा तरी बाळगली होती काय ! जळो तें राज्य, कोणाला पाहिजे; आह्मीं एके ठिकाणीं रानांत जरी असतों, तरी आह्मांसारिखीं कोणी सुखी नव्हतीं. अशी अकस्मात् तातातूट कशीहो पडली. सर्वांनीं ही आपली राणी आहे असें ओळखिलें. मग ते पुढें सरसावून ह्मणूं लागले कीं, हें तुह्मीं करितां काय ? प्रसंगावर नजर द्या. आपणावर परमेश्वर कोपला खरा; परंतु असें दुःख करून कसें चालेल. सोमकांत रडत आहे

त्याजकडे पहा, रडून रडून त्याचा घसा अगदीं कोरडा पडला आहे, असो याप्रमाणें तिचें शांतवन करून मेनकावतीचे डोळयांस पाणी लाविलें, तिला शुद्धीवर आणिली, आणि त्या त्रिवर्गास घोड्यावर बसवून वीरभद्र त्यांना घेऊन आपल्या घरीं जाता झाला. वीरभद्राचा पराभव झाला हें मागें सांगितलेंच आहेच. नंतर राजाला तोंड दाखवूं नये असा विचार करून तो आपल्या घरीं आला. चंद्रकांतानें राज्य सोडिलें व दुर्वीर्याला ते दुष्ट प्रधान मिळाले आहेत असें ऐकल्यावर परत आपल्या जाग्यावर रुजू न होण्याचा त्यानें निश्चय केला. कारण कीं, आतांच आवा दावांत पाऊल काढणें बरें, असें त्याला वाटलें. मग कधीं कधीं कांहीं मंडळी घेऊन मौजेनें तो शिकारीस जात असे, त्यामुळें तो मेनकावतीच्या संकटसमयीं तिजला भेटला.

चंद्रकांत आणखी कांहीं दिवस राज्य करीत असता तर वीरभद्रास मोठे आनंदाचे दिवस येणार होते. कारण कीं, वीरसिंहास वीरभद्राची कन्या सुशीला देण्याचा निश्चय पूर्वीच झाला होता, परंतु ते दिवस आतां गेले ह्मणून त्याला मोठें वाईट वाटलें. तरी झाल्या गोष्टीस इलाज नाहीं, वधुवरें जवळच आहेत, जोडा ठीकच आहे; त्यापेक्षां तो समारंभ डोळ्यांदेखत एकदां उरकून घ्यावा असें त्यानें मनांत आणिलें; परंतु तो फार विचारी असे, दोघांची परस्परांवर ममता आहे किंवा नाहीं हें आपल्या दृष्टीस येईपर्यंत आपला हेतू उघड करावयाचा नाहीं असा त्यानें निश्चय केला. सुशीलेचें वय यावेळेस सुमारें पंधरा वर्षांचें होतें, व वीरसिंहाचें वय सुमारें अठरा एकोणीस वर्षांचें होतें. दोघेंही मोठीं सुंदर होतीं, आपण

राजाची सून होणार आहों ही कुणकुण सुशीलेचे कानावरून पूर्वींच गेली होती. मेनकावती आपली होणारी सासू, हें जेव्हां तिला समजलें; तेव्हांपासून ती तिच्या फार आज्ञेंत सर्वकाल तत्पर असे. ज्या वेळीं तिच्यापाशीं बोलण्याचा प्रसंग येई. तेव्हां सुशीला मोठ्या नम्रतेनें थोडें हळू मंजुळ असें बोलत असे. सुशीलेचें स्वरूपही या दशेंत मोठें अवर्णीय असे. बांधा ठेंगणा असून केतकीच्या पानाप्रमाणें वर्ण असे. मुख केवळ पौर्णिमेच्या चंद्रासारिखें आल्हादकारक दिसत असे. अधरोष्ट आरक्त असून नेत्र मृगाप्रमाणें असत. दंत केवळ कुंदाच्या कळ्याच आहेत कीं काय ? असा भास होई. हस्तपादादि गोंडस व आरक्त असून वृत्ति मोठी शांत आणि गंभीर असे. तशांत यौवनदशा प्राप्त झाल्यामुळें सुशीला फारच रमणीय दिसे. असो, वीरसिंहाच्या स्वरूपाकडे पाहून सुशीला अगदीं मोहित होऊन गेली होती. कारण, तोही फार सुंदर होता. त्याजपाशीं विनोदयुक्त हंसत हंसत बोलण्याची संधि तिनें कधींही टाकली नाहीं. आपले नेत्रकटाक्ष बाणांनीं त्यास घेरून मोहपाशांत घालण्याच्या उद्योगांत तिचें मन अगदीं व्यग्र होऊन गेलें होतें. त्या राजपुत्राचा क्षणभरही वियोग तिला युगवत् होऊं लागला. शयनीं, आसनीं, हिंडतां खेळतां, त्याची मुर्ती तिच्या डोळ्यांसमोर दिसत असे. घराबाहेर जाणें तिनें सर्वस्वी वर्ज केलें. कारण तितकाही वियोग तिला सहन होईना. बाहेर जाण्याचा प्रसंग तिजवर येऊन ठेपलाच तर लागलीच मागें परतून हा रस्ता एकदां केव्हां संपेल असें तिला होई. त्याला पाहतांच तिच्या सर्वांगास घाम

सुटे. उरांत धडकी वसून मन फारच चंचळ होऊन जाई; परंतु ती मोठी विचारी असल्यामुळें आपल्या मनांतील उद्देश लोकांस कळूं नये याविषयीं फारच खबरदारी घेई. रात्र झाली ह्मणजे ही वैरीणच आली आहे, असें तिला भासत असे. बिछान्यावर पडली ह्मणजे त्याची मूर्ती तिच्या डोळ्यांसमोर दिसत असे. जराशी डुलकी आली तर स्वप्नांतसुद्धां तोच. एखाद्या वेळेस असें व्हावें कीं, त्या दुःखदायक विचारांत तळमळतच सर्व रात्रच्यारात्र निघून जावी. तिचें प्रीतिपूर्वक हंसणें, मधुर शब्द बोलणें, सर्वकाळ समोर उभें राहणें, याचा अर्थ वीरसिंह पूर्णपणें समजत होता; व तो तिच्यावर प्रीतिही करीत असे, परंतु त्याचें मन आपल्या पित्याच्या विरहानें अगदीं उदास होऊन गेलें होतें. सर्वकाळ आपल्या आईचें दुःख पाहून तो मनांत झुरत असे. असो, या प्रमाणें बरेच दिवस चाललें असतां वीरसिंह वीरभद्राच्या पलंगावर विचारांत पडला असतां कोणी नाहीं असें पाहून सुशीला धांवत धांवत त्याजवळ गेली. तिच्या पैंजणाचा झणत्कार ऐकून सुशीला आपणाकडे येत आहे कीं काय? ह्मणून राजपुत्र मागें पुढें पाहतो तों ती हंसत हंसत थोडी लाजत ठुमकत अगदीं जवळ येऊन उभी राहिली. तिला पाहून वीरसिंहही उभा राहिला, तें पाहून.

**सुशीला.**—छः छः आपण उठायचं कां झालं, असं उफराटंच काय हें?

**वीरसिंह**—कां, थोर लोकांस मान नको काय?

**सु०**—समुद्रांत बुडी मारून कोरडंच निघायाला पहायाचें पण मी समजत नाहीं काय? हत्तीचे दांत खाव-

याचे एक आणि दाखवावयाचे दुसरे असतात.

वी०—पण आजचा थाट माट कांहीं निराळाच आहे.

सु०—आकाशाचा चंद्रच हातीं आल्यावर मग निराळा कां नसावा ?

वी०—मला यांत कांहीं समजत नाहीं.

सु०—पुरे पुरे, आतां अजून मेला अंत ह्मणून किती पहायाचा.

याप्रमाणें तीं उभयतां गोडींत गोष्टी बोलत आहेत. इतक्यांत वीरभद्राची स्वारी बाहेर गेली होती, ती अकस्मात् आली, त्यास पाहून जराशी मनांत खट्टू होऊन लाजत लाजत सुशीला खोलीबाहेर पडली. हीं झालेली सर्व बोलणीं तिचे आईनें खोलींतून ऐकिलीं होतीं, तीं वीरभद्रास सांगितलीं. त्याच्या मनांत होतेंच मग त्यानें लागलीच लग्नाची तयारी चालविली. मेनकावतीला वारंवार पतीची आठवण होऊन तिचें ह्दय दुःखानें अगदीं पोळून गेलें होतें. परंतु लग्नसमारंभ नाकारून वीरभद्राची हौस मोडणें हें तिला अगदीं गैरशिस्त वाटलें. वीरसिंहाच्याही मनांत हे सोहाळे अशा दिवसांत भोगण्याचें नव्हतें; परंतु आईच्या आज्ञेबाहेर तो कधींही पाऊल टाकीत नसे. मग लग्नाचा निश्चय झाला. ज्योतिषी बावास बोलावून मुहूर्त ठरविला. मंडप घालण्याच्या तयारींत शेकडों मनुष्यें लागलीं व वराडी आणण्याकरितां मनुष्यें रवाना केलीं. याप्रमाणें लग्नसमारंभाची तयारी जारी चालली.

अंबापुरी जरी खेडेगांवाप्रमाणेंच होती, तरी तिच्या भोवतीं सुंदर बागबगीचे असल्यामुळें फारच रमणीय दिसत असे. तशांत या लग्नसमारंभानें तिला अधिकच

शोभा आली होती. अनेक शहरांहून वीरभद्राचे इष्टमित्र जमल्यामुळें तो सर्व गांव गजबजून गेला होता, लग्नमुहूर्त गोरज महुर्तावर असल्यामुळें त्या दिवशीं एकच गडबड होऊन गेली होती. सभामंडपांत फारच उत्तम काम केलें होतें. सुंदर छत देऊन सुरूचे खांब करून किनखापी पडदे सोडून दिले होते. तशांत आरसे, झुंबरे, हंड्या, ग्लासें, यांचा एकच चकचकाट होऊन गेला होता. चौघडे झडत आहेत वाजंत्री सनयांचे सुस्वर निघत आहेत, तितक्यांत कोठीवाल्याची एकच गडबड होऊन गेली आहे, कोणी पानसुपारीचीं तबकें भरीत आहेत, कोणी आचार्यास सामान देत आहेत, कोणी बिछाईत पसरण्याच्या उद्योगास लागले आहेत. हार, तुरे, गजरे, घालण्याची बायकांची एकच गडबड होऊन गेली आहे, तितक्यांत सुशीला रत्नजडित श्रृंगार करून गालांत हंसत हंसत इकडे तिकडे विद्युल्लतेप्रमाणें चमकत असे. त्या मायलेंकरांशिवाय त्या दिनशीं चहूंकडे आनंदमय होऊन गेलें होतें. भोजन होऊन तांबूल झाल्यानंतर नाच सुरू झाला. भडंग भिकाऱ्यांची दाराशीं एकच गर्दी झाली होती. त्यांना वाडवें देण्यांत एकच लगबग उडाली होती. इतक्यांत यजमान साहेबांचीही स्वारी तेथें आली, तेव्हां एक भिकारी तेथें आला आणि वीरभद्रापाशीं कुशल वृत्त विचारूं लागला. वीरभद्रानें त्याच्या तोंडाकडे पाहिलें. मग गहिंवर येऊन कंठ सद्गदित झाला. त्याणें त्याच्या पांयाला घट्ट मिठी मारिली, आणि ह्मणूं लागला कीं, मी आपल्या पदरचा सेवक असून इतक्या थोड्या वेळांत आपणास कसा हो विसरूं!

सर्व मोठ्या अचब्यांत पडले. वीरसिंहही तेथें आला, हा आपला पिता चंद्रकांत आहे, हें त्याणें लागलेंच ओळखून त्याजकडे धांवला. ही बातमी घरांत कळतांच एकच गोंधळ झाला. ते अमृतासारिखे शब्द कांनीं पडतांच मेनकावती धांवतच तेथें जाऊन चंद्रकांतास घट्ट मिठी मारिली, आणि आपलें सर्व दुःख आठवून जो विलाप केला त्याचें वर्णन करितां येत नाहीं. असो, कांहीं वेळानें सर्वांचें शांतवन झालें. सुशीलेच्या पोटांत आनंद मावेना आणि ती इकडे तिकडे उड्याच मारूं लागली, सोमकांतही "बाबा बाबा" करीत धांवत आला. एवढ्या मोठ्या समारंभांत ज्या फक्त चंद्रकांताकरितां सर्व विरस होऊन गेलें होतें, तोच त्यांस अशा विलक्षण समयीं अकस्मात् भेटला तेव्हां त्यांस आनंद किती झाला असेल ! याचा वाचकानींच विचार करावा. त्या समारंभास हजारपट अधिक शोभा दिसूं लागली. सुनेला पाहून चंद्रकांत अगदीं खुष झाला. मेनकावतीचीही मुखश्री टवटवीत दिसूं लागली. वीरसिंहाचें ही सुहास्य वदन पाहून सुशीलेचा आनंद त्रैलोक्यांत मावेनासा झाला सर्वांस मोठें समाधान झालें. अस्तमान होतांच लोकांचे थव्याचे थवे जमूं लागले. त्यादिवशीं त्या सभेंत इंद्रभुवनाचीच शोभा दिसत होती.

मेनका०–( दुःखित मेनकावतीस जाहांदाराचें स्मरण होऊन ) बिचारा ह्यावेळीं जाहांदार असता तर त्याला किती आनंद झाला असतां बरें !

चंद्र०–खरोखर प्रिये ! त्याचा कांहीं शोध कळत नाहीं, कीं तो जिवंत आहे किंवा स्वर्गवासी झाला !

मेन०–महाराज ? त्याचा स्वभाव किती सौम्य व मन

मिळाऊ होता; तसाच तो महाशूर, विचारवान व दूर दृष्टी होता. एकदां मी त्या दुष्ट दुर्वीर्यांच्या सैन्यांत एकटीच शिरलें होतें व सभोवार पाहिलें तों आपलें कोणीही मनुष्य दिसेना, तशी मी कांहींशीं गोंधळल्या सारखी झालें, परंतु इतक्यांत माझी स्थिती अशी झाली आहे असें ह्या जाहांदारानें दुरून पाहिलें तसाच एकदम घोड्याचा रोंख फिरवून त्यानें मोठ्यानें हांक मारिली कीं " काकू घाबरूं नका हा मी आलों " ही हांक त्या दुर्वीर्याचे सैन्याच्या कानांत प्रत्यक्ष कृतांताच्या आरोळीप्रमाणें पडली व माझ्या कानांत एखाद्या सहायकारक भ्रात्याची पडावी तशी पडली. रामाश्वमेधाचे वेळीं जसा त्या लहूस शत्रूघ्न बांधून नेत असतां मागून तो कुश येऊन त्या शत्रूघ्नादि भरतास सूचविता झाला तेव्हां त्या रामसैन्यास तर प्रत्यक्ष यमुना बंधुचाच भास झाला, परंतु लहूस असें झालें कीं आतां हें सैन्य गिळून टाकूं कीं ह्याचे तुकडे तुकडे करूं कीं ह्यास असे आकाशांत झोंकून देउं तशा प्रकारें मलाही त्यावेळीं झालें होतें परंतु पुढें त्याचें काय झालें हें कळत नाहीं. बिचारा कोठेंही असून सुखी असो ह्मणजे झालें.

चंद्र०—मी खचीत सांगतों कीं, तो जिवंत असल्यावर आपणांस कधीं तरी भेटल्याशिवाय राहणार नाहीं. इकडे जाहांदार फकीरी वेशानें त्याच गांवच्या मार्गानें जात असतां सहज एक कवीत ह्मणाला.

कवीत.

कहां राजा चंद्र है और कहां है वो सती मेनका
कहां भ्रात विरसिंग है और विर है पति सेनका॥

हें ऐकून वीरसिंहाचा एक दुसऱ्या त्याच मार्गानें जात होता त्यानें त्यास जवाब दिला.

जहां राजा चंद्र है वहां है सती मेनका ॥
तहां वीरसिंह है जो घर है पति सेनका ॥

हे अमृतासारखे शब्द जाहांदार याच्या कर्णद्वयांत शिरतांच तो चकित होऊन हा ध्वनी कोठून आला या-करितां इकडे तिकडे पाहूं लागला, परंतु कांहींच शोध न लागल्यानें तसाच तो निराश होऊन मार्गास लागला. जाहांदार यास हें ठाऊक नव्हतें कीं आपला राजा, राणी व विरसिंह हीं याच गावांत आहेत, परंतु त्यास त्या भाषणावरून इतकें कळलें कीं, विरभद्र सेनापतीच्या घरीं हीं आहेत तर आतां त्याच्या घराचा शोध काढीत गेलें असतां त्यांचा पत्ता तावडतोब लागेल, असा विचार करीत ज्या गांवांत वीरभद्र राहत होता त्याच गांवाच्या रस्त्यां-तून क्षुधातूर झाल्यामुळें उदर निर्वाहार्थ रोटी तुकडा मागत चालला असतां दोनतीन घरांतून त्यास शिळे पाके उष्टे वगैरे भाकरीचे तुकडे मिळाले ते त्यानें आपल्या पदरांत घेतले व देणाराचें कल्याण चिंतून पुढें चालता झाला, थोडासा पुढें गेल्यावर त्याला एक धर्मशाळा आढ-ळली त्या धर्मशाळेच्या एका बाजूस जाऊन उतरला व हात पाय तोंड धुवून " निमाज पडल्यावर " बिसमिल्ला" म्हणून ते मिळविलेले भाकरीचे तुकडे खात बसला. दैवाची गती किती विचित्र आहे पहा ! ज्याच्या एका शब्दानें हजारों लोकांचा उदरनिर्वाह चालणार त्यानें केवळ क्षुधा निवारणार्थ दुसऱ्याच्या येथें आपलें दीन वदन पसरून

तुकडे मागीत फिरावें काय ! ! ह्याविषयीं एक कवी काय ह्मणतात.

" प्यास लगे धोबि घांट ॥ भुख लगे झुटा भात ॥
निंद आवे टुटी खाट ॥ प्रीत लगे मसण वाट ॥

अर्थ—तहान लागली असतां धोबी घाटांतीलही पाणी प्यावें लागतें, क्षुधा लागली असतां उचिष्टही भक्षण करावें लागतें, व निद्रा आल्यास मोडलेली खाट असली तरी निद्रा लागते व प्रीति लागलेली असल्यास त्यास मसणाच्या वाटेचेंही भय वाटत नाहीं. आणखी ह्याविषयीं आपले प्रसिद्ध तुकारामबुवा ह्यांचेंही ह्मणणें आहे.

## अभंग.

कई वहावें जीवन ॥ कई पलंगीं शयन
कई भोज्य नानापरी ॥ कई कोरड्या भाकरी
कई बैसावें वहानीं ॥ कई पायीं अनवाणी
जैसी जैसी वेळ पडे ॥ तैसें तैसें होणें घडे ॥

ह्यावरून पाहिलें असतां मनुष्यांचे सर्व दिवस सारखे जात नाहींत. असो, इकडे वीरसिंहाच्या हुजऱ्यानें येऊन जाहांदार—फकीराची सर्व हकीकत त्यानें असें ह्मटलें व म्यां त्यास असा जबाब दिला वगैरे सर्व मजकूर सांगितला तो ऐकतांच वीरसिंहानें लागलाच आपल्या आईबापास कळविला. तेव्हां चंद्रकांतानें वीरभद्रास हांक मारून दोनचार स्वार बरोबर घेऊन आपल्या फकीरसाहेबाचा ( जाहांदार ) शोध करण्यास पाठविलें. वीरभद्र शोध करीत येत असतां ज्या धर्मशाळेंत जाहांदार भाक-

रीचे तुकडे खात बसला होता तेथें आला व त्यास देखाव न देतां एका बाजूस उभा राहिला. जाहांदार त्यास ते भाकरीचे तुकडे खाववत नसतांही क्षुधेमुळें तसेच डोळे झांकून खातांना पाहून वीरभद्रास फारच वाईट वाटलें. नंतर त्यानें भाकर खाऊन पाणी वगैरे प्याला व बाकीचे तुकडे होते ते तेथील कुत्र्यास घालून ह्मणाला " कलका तो खुदा है " नंतर हात धुवून ती ध्वनी कोठून आली व आपणांस ह्याचा शोध कसा लागेल वगैरे विचार करीत बसला असतां वीरभद्रानें पुढें जाऊन सलाम केला, वीरभद्रास पाहतां तत्क्षणींच जाहांदार पटकन उठून त्यास कडकडून भेटला तेव्हां त्यास फार गहिंवर येऊन त्यानें बराच शोक केला. नंतर वीरभद्रानें त्याचें शांतवन केल्यावर जाहांदार ह्मणाला.

जहा०—सेनापतिसाहेब! महाराजांचा, काकूंचा, वीरसिंहाचा कोणाचा कांहीं पत्ता लागला आहे काय ?

वीर०—सर्व सुखरूप असून आपलीच मार्गप्रतिक्षा करीत माझे येथें बसलीं आहेत.

जाहां०—( आनंदानें उभा राहून ) चला तर उठा मी त्यास केव्हां पाहीन असें झालें आहे !

वीर०—( जाहांदार यांस घोड्यावर बसण्याविषयीं आग्रह करितो. )

जाहां०—छे छे सेनापति साहेब ! अशा फकिरी वेशानें आश्वारूढ होऊन मार्गांतून जाणें ह्मटलें ह्मणजे हास्यास्पद होणार. आपण आश्वारूढ व्हावें मी पादचारीच येतों.

वी०—वाहवा ! असें करणें मला योग्य आहे काय ?

मग मला महाराज दुषण देणार नाहींत ? तर आपण उभयतांही पायींच बोलत बोलत जाऊं.

**जाहां०**—बरें आहे आपली इच्छा.

राजा चंद्रकांत ह्यांची वाट पहात ओट्यावरच बसला होता, जाहांदार यानें राजास पाहतांच धांवत जाऊन त्याच्या पायांस मिठी मारिली. राजानें त्यास वर उचलून कुशल प्रश्न विचारिले. वीरसिंहास जाहांदार आला ही खबर लागतांच तो एकदम धांवत आला व दादा ! दादा! ह्मणत त्याच्या गळ्यास मिठी मारली. उभयतांसही अतिशय गहिंवर येऊन त्यानीं फार शोक केला. नंतर मेनकावती येऊन उभयतांचें शांतवन करून ह्मणाली.

**मेन०**—बाबांनो ! आतां पुरे करा, तुह्मां उभयतांस ईश्वर चिरायु करो व अशीच उभयतांची प्रीति दृढतर राहो. ( जाहांदार यास ) अरे बाबा पण तूं इतके दिवसपर्यंत होतास कोठें ? मला त्या दुष्टांनीं अटकेंत ठेवल्यापासून आह्मांस तुझा पत्ताच लागला नाहीं, आह्मीं तर असें समजलों कीं तूं लढाईत पडलास ह्मणून तुझ्या शवाचाही शोध केला परंतु व्यर्थ; पुढें मग तुझी हकिकत कशी काय झाली ती सांग पाहूं अगोदर.

**जाहां०**—काकू ! त्या गडबडींत कोणी दुष्टानें माझी नजर चूकवून माझ्या मांडीवर वार केला, त्याबरोबर मी घोड्यावरून खालीं पडलों इतक्यांत आपल्या पायदळांतील एका भिल्ल शिपायानें पाहून मोठी त्वरा करून व सर्वांची नजर चुकवून मला आपल्या पाठीवर बांधून घेऊन त्यानें नीट अरण्याचा मार्ग धरिला व ज्या ठिकाणीं त्याचें खोंपट होतें तेथें मला नेऊन एक प्रकारच्या वन-

स्पतीचा रस त्यानें माझ्या जखमेस लाविला त्याबरोबर ती जखम वाहण्याची बंद झाली, नंतर तो दररोज अशीच कांहीं वनस्पती आणून तिचा रस लावीत असे, त्यामुळें थोडक्याच दिवसांत ती जखम भरून मी हिंडू फिरूं लागलों. अशा प्रकारें त्या भिल्लानें माझी चांगल्या प्रकारें सुश्रूषा केली.

**वीर०**—अशा मनुष्यास उत्तम प्रकारचें बक्षीस देणें योग्य आहे.

**जाहां०**—नंतर तेथून आपला शोध करीत ह्या गांवच्या मार्गानें जात होतों तों आपली सर्वांची आठवण झाल्यामुळें सर्वांचीं नांवें घेतलीं तों मी ह्मणालों, त्याचप्रमाणें कोणी मार्गस्थानें त्याचें उत्तर देऊन सुचविलें कीं, सेनापतीच्या घरीं सर्व सुखरूप आहेत. हे अमृतासारखे शब्द ऐकल्याबरोबर मी चकित होऊन इकडे तिकडे पाहूं लागलों, परंतु मला तो मनुष्य भेटलाच नाहीं. तेव्हां किंचित् वाईट वाटलें, परंतु त्याच्या त्या शब्दावरून मला उमेद येऊन मी आपल्या सेनापति साहेबांच्या घराचा शोध करीत ह्या गावांत शिरलों, तेव्हां क्षुधेनें पिडल्यानें व जवळ एकही पै शिल्लक न राहिल्यानें क्षुधा निवारणार्थ दोन तीन घरीं कांहीं भाकर तुकड्याकरिता विनंति केली. तेव्हां कित्येक बिचाऱ्या दयाळू बायांनीं कांहीं आणून दिलें, त्यांचें कल्याण चिंतून ते एका धर्मशाळेंत जाऊन भक्षण केलें, तों इतक्यांत सेनापति साहेबांची स्वारी आली व तेथून येथें आलों.

जाहांदार ही आपली हकिकत सांगत असतां बिचाऱ्या चंद्रकांताच्या डोळ्यांतून अश्रू आले व तो ह्मणाला,

अरेरे मी किती दुष्ट आहे कीं, माझ्या एकट्याच्या जिवाकरितां बिचाऱ्या कित्येक प्राण्यांस दुःखें व संकटें भोगावीं लागतात. नंतर वीरभद्रानें व जाहांदरानें त्याचें समाधान केलें, पुढें जाहांदार यास स्नान वगैरे घालून भोजन घातलें. नंतर तो ज्या दिवाणखान्यांत वीरसिंह बसला होता तेथें गेला, तेथें गेल्यावर वीरसिंहानें आपली सर्व हकिकत सांगितली, ती ऐकून जाहांदार यांस फार दुःख झालें, पुढें रात्र फार झाल्यामुळें ते दोघेही झोंपी गेले. दुसरे दिवशीं वीरसिंहास हळदी लावण्याचा समारंभ सुरू होऊन लग्नतिथीचा निश्चय ठरविला. चौथे दिवशीं वर हत्तीच्या अंबारींत बसून गांवांतून फिरून आल्यावर गोरज मुहूर्तावर वीरसिंहाचें सुशीलेशीं मोठ्या आनंदानें लग्न लागलें. पुरोहितांनीं वधूवरांस आशिर्वाद दिला, नंतर चंद्रकांत ह्मणाला.

॥ श्लोक ॥ ( शार्दूलविक्रीडित )

श्री लक्ष्मीपति शांत तेज भगवन् जो सुप्त शेषावरी ॥
जो पाळी जगतास पूर्ण सुदयें धर्मास जो उद्धरी ॥
जो घेई अवतार भूवरि मुनी ध्याती जयाच्या पदा ॥
तो क्षीराब्धि विहारिया वधुवरां रक्षो सदां सर्वदा ॥ १ ॥

वीर०—योग्यांमाजि शिरोमणीच अथवा जो पार्वतीचा पती॥
जो कैलासि करीत वास अथवा गंगा जयाची सती ॥
भाळीं चंद्र तसेच नाग शरिरीं ज्याच्या रहाती सदां ॥
तो शंभू त्रिपूरारि या वधुवरां रक्षो सदां सर्वदा ॥२॥

जा०—मोठो ह्या उभयतांस सूख अतितें दीर्घायु आरोग्यता॥
होवो संतति द्रव्यादि विपुळतें सन्मानही योग्यता ॥

जावो सर्वही क्लेश दुःख दुरतें पावो न कष्टा कदां ॥
होवो कल्याण सदां ह्या वधुवरां रक्षो प्रभो सर्वदां॥३॥

इकडे मांडवांत लग्नाची गडबड बंद होत आली. इतक्यांत दिवाणखान्यांत पानें मांडून भोजनाची तयारी झाली. मग सर्वजण भोजन करण्यास गेले व पाहतात तों पात्रांत

॥ श्लोक ॥ ( शार्दूलविक्रिडित )

पक्वानें बहु वाढिलीं षड्रसें शाखा बहुतापरी ॥
नाना पापड सांडगे लघु वडे मांडे पुऱ्या भीतरीं ॥
सांबारीं कथिका बहु ठिकरिच्या नानापरी लोणचीं ॥
बोले कोमल आम्ल तीक्ष्ण मधुरे नाहीं कदा वाणचीं॥४॥

मनुष्यें पात्रांवर बसल्यानंतर वाढण्यांची एकच घाई होऊन जो ज्याला पदार्थ लागेल तो पटकन पुरवीत असत व ह्मणत.

॥ श्लोक ॥ ( शार्दूलविक्रिडित )

घ्या घ्या घ्या कढिभात घ्या वरण घ्या शाखा बहू फारच्या
घृताचा वरि स्वाद घ्या लवण घ्या पोळ्याच मागोन घ्या॥
सांबारीं बहु फार घ्या मग तुह्मीं रूचेल तें सर्व घ्या ॥
कृष्णेच्या उदकासि घ्या मग तुह्मीं विश्वेश नामाशीं घ्या॥

॥ श्लोक ॥ ( शार्दूलविक्रिडित )

मांडे साखरभात बुंदि जिलब्या फेण्या करंज्या पुऱ्या ॥
क्षिप्रा मोहनभोगही घिवरही खाज्या गुरोळ्या बऱ्या ॥
पक्वानें विविधें यथापरि बहु घालोनियां भोजना ॥
केले आश्रित् सर्व तुष्ट दिधल्या शिष्टां बहू दक्षिणा ॥६॥

अशा समारंभांत ती रात्र निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशीं वरातीची तयारी चालली.

राजाचा मार्गे कडेलोट केला असतां आतां राजा येथें कसा आला ही आमच्या वाचकांस भ्रांति असेलच, तर ते दुष्ट त्याचा बिछाना डोकीवर घेऊन चालले असतां अगदीं काळोख पडला होता. तो कडा होता खरा; परंतु राजास खालीं लोटतांच तो गडगडत वरतीच एक मोठा पायरीचा वृक्ष होता, त्यास अडखळला. याप्रमाणें मोठ्या विलक्षण रीतीनें संकटसमयीं त्यास परमेश्वरानें हात दिला. त्या विषाच्या गुंगीत दुसऱ्या दिवशीं अस्तमान होईपर्यंत तेथेंच पडून होता. नंतर शुद्धीवर येऊन पहातो तों आपण अगदीं एकटें ह्या खाड्यांत पडलों आहों. हें स्वप्न पडलें कीं काय? ह्मणून तो वेड्यासारखा इकडे तिकडे चपापून पाहूं लागला. अनेक भयंकर कल्पना त्याच्या मनांत येऊं लागल्या, आपल्या प्रिय पत्नीची व बालकांची काय दशा झाली असेल, ही एक मोठीच काळजी त्यास येऊन पडली. मग त्यानें सर्व दुःख आठवून विलाप चालविला. बिचारा करतो काय शोष लागून घशास अगदीं कोरड पडून गेली होती. तोंडांतून एक शब्दही निघेना, मग हलके हलके एक दगड धरीत तो मोठ्या प्रयत्नानें वर चढला. तों रात्र पडत चालली, मग जवळच एक पाण्याचा झरा वाहत होता तेथें पाणी पिऊन दगडावर बसला आणि आपली मेनकावती कोठें असेल! सोमकांत काय करीत असेल? त्यांची सुद्धां माझ्या सारखीच त्या दुष्टांनीं दशा केली असेल काय? आतां मी त्यांस कोठें पाहीन. असे अनेक तऱ्हेचे विचार करून रडूं लागला. बिचारा रडतां रडतां दमला. मग तेथेंच डुलकी आली, ह्मणून डोकें खालीं करतो तों जवळ दगड होता त्यास तें आपटलें. पुनः द-

चकून इकडे तिकडे पाहतो तों आपण दगडावर आहों-मग त्यास झोंप कशी येईल ? कारण, ज्यास रत्नखचित पलंगावरील पुष्पशय्येवर निजण्याची संवय त्यास थंडीत कुडकुडत पोटांत कांहीं नसून दुःखानें अगदीं अंतःकरण व्यापून गेलेलें होतें. तशांत दगडावर कसें निजवेल. मध्यरात्रीस पशूंच्या भयंकर गर्जनेनें त्याचे रोमांच उभे राहात, ह्यापैकीं एखादें जनावर येऊन आपणास खाईल कीं काय ? हें त्याच्या वारंवार मनांत येई. अशा अनेक प्रकारच्या विवंचनेंत असतां दोन घटिका रात्र उरली, मग राजास थोडीशी डुलकी लागली तों स्वप्नांत मेनकावती व सोमकांत आपण त्यांजवळ गोष्टी बोलत बसलों आहों असें त्यानें पाहिलें. दचकून उठून पाहतो तों कुठली मेनकावती आणि कुठला सोमकांत, याप्रमाणें ती भयंकर रात्र गेल्यावर मग दुसऱ्या दिवशीं सर्व रानोमाळ त्यानें मेनकावतीचा शोध चालविला तरी ती त्यास सांपडेना. तिसऱ्या दिवशीं दोनप्रहरीं अकस्मात दोन बिछाने त्याचे दृष्टीस पडले. मग तेथें त्यानें जो विलाप केला त्याचें वर्णन करितां येत नाहीं. माझा सोमकांत येथून कोठें गेला असेल ? या बिछान्यावरील एक बिछाना वीरसिंह आपल्या डोकीवर घेऊन उन्हातान्हांतून गेला असेल काय ! त्याचे पाय भाजले असतील ! ! सोमकांतास भूक लागली असेल ! मग रडून रडून त्या तान्ह्याची दशा काय झाली असेल ! एखादें जनावर त्यांजवर आलें तर तीं काय करतील ! असा अरण्यवास वृद्धापकाळीं भोगण्याचें परमेश्वरानें आमच्या कसें कपाळीं लिहिलें, याप्रमाणें अनेक तऱ्हेनें तो तेथें विलाप करीत बसला, मग निराश होऊन त्यांच्या शोधार्थ पुढें

चालता झाला. मिळेल तर एखादें फळ खावें, एखादे वेळेस उन्हांत तळमळत पडावें, तसेंच दुःखदायक विचारांत एखादे वेळीं रात्रीच्या रात्री निघून जाव्यात. गांवांत कोणास दया येऊन भाकरीचा तुकडा घातला तर घातला नाहीं तर कित्येक शिव्या देऊन दगड मारून आपल्या दाराजवळून हाकून लावीत. किती चमत्कारिक दशा ही ! कीं ज्याच्या जिवावर कोट्यावधी लोक आपलें पोट भरीत असत तो एका भाकरीच्या तुकड्यास महाग व्हावा काय ? आणि त्याची अशी दशा व्हावी काय?परमेश्वराची लिला अद्भुत आहे. तो राजाचा रंक एकदम बनवूं शकेल ! याजकरितां कोणाजवळ कितीही संपत्ति असली, तरी त्याचा गर्व बाळगूं नये, हें जग मुळींच नाशीवंत आहे; मग संपत्तीचा तो पाड काय ! असो विषयांतर झालें याकरितां आपल्या पूर्व विषयाकडे वळूं. याप्रमाणें चंद्रकांत शोध करीत करीत अंबापुरीमध्यें आपल्या प्रिय पत्नीस भेटला. आणि मोठ्या आनंदानें वीरसिंहाचा लग्न समारंभ केला.

त्याचप्रमाणें तिकडे लग्न समारंभ आटोपल्यानंतर वरातीची तयारी होऊं लागली. चंद्रकांताचे येण्यानें सर्वांस मोठें सुख झालें. मग अस्तमान होतांच तासे; कर्णे, मर्फे, वाजूं लागले. लग्नघरांत एकच धांदल उडून गेली. सर्वांनीं आपलें जेवणखाण लवकर आटपून तयारीस लागले. कित्येक स्त्रिया शेजपलंग तयार करूं लागल्या. याप्रमाणें धांदल चालली असतां हळू हळू लोकही जमूं लागले. हत्ती, पदाती, घोडेस्वार यांची एकच गर्दी होऊन गेली. सुंदर दारूकामही सुरू झालें; तोफांचे भयंकर भडिमार होऊं लागले, इतक्यांत नाच उभा राहिला, शेज

वगैरे होऊन तो जोडा सभामंडपांत आला. मग चंद्रकांतानें उभयतांस आपल्या मांडीवर घेतलें. सुशीला आधींच अतिशय सुंदर तशांत त्या दिवशीं भरजरीचा पोशाख करून रत्नखचित अलंकार घातले होते. यामुळें प्रत्यक्ष रतीच आहे कीं काय ? असा भास होई. वीरसिंहही राजबिंडाच, तशांत हिऱ्या पाचूचे अलंकार घालून भरगच्चीचे पोशाख केल्यामुळें केवळ मदनच दिसत असे, अशा जोडप्याकडे सर्व लोक टक लावून पहातच राहिले. त्या दिवशीं मंडपशोभाही विशेष झाली होती. हजारों झुंबरांचा एकच चकचकाट झाला होता; तशांत रत्नदीप चहूंकडे झळकत होते, यामुळें दैदीप्यमान् रत्नांची शोभा पडली होती. हार, तुरे, गजरे, गुलाब, अत्तर, यांचा एकच घमघमाट सुटत होता. मधून मधून कांचेचीं कारंजीं सोडून दिलीं होतीं; त्यामुळें ही दुसरी मय* सभाच आहे कीं काय असा भास होई.

असो. हार, तुरे, गजरे, पानसुपारी, गुलाब, अत्तरें वगैरे वांटल्यानंतर कचेरी उठली मग तासे मर्फे वाजण्यास आरंभ झाला, मशालींचा एकच चकचकाट होऊन गेला. भालदार ललकारूं लागले. तोफांचे भयंकर भडिमार होऊं लागले. तितक्यांत, सुंदर दारूकामही सुटूं लागलें. मग सर्वांपुढें तोफखाना, पाठीमागें हत्ती, घोडेस्वार, वाद्यें, मग सर्व लोकांचा थाट, मध्यें नाचाचे ताफे, नंतर रत्नजडित अंबारींत बसलेला जोडा त्यांच्या पाठीमागें नायका, या प्रमाणें तोफखान्यापासून नायकांच्या मेळ्यापर्यंत सुमारें अर्ध कोशाचें अंतर होतें; परंतु सर्वांची टक त्या हत्तीवरील

* पूर्वी पांडवांच्या वेळीं मयासुरानें रचिलेल्या सभेप्रमाणें.

अंबारींत बसलेल्या मनोहर जोड्याकडे लागली होती. वारा झुळ झुळ वाहात होता. याप्रमाणें मोठ्या थाटानें वरात चालली असतां अंबिकेचें देवालय समोर आलें. देवीला नमस्कार करण्यांकरितां जोडा खालीं उतरला नमस्कार करून परत अंबारींत बसण्यास आलीं; आणि वर चढणार, इतक्यांत अकस्मात् भयंकर ध्वनीनें आकाश भरून गेलें. हा अनर्थ काय आहे, ह्मणून लोक टकमक पहातच राहिले; तों एकच गर्दी उसळून गेली. धरा, मारा, हाणा, असे शब्द चालले आहेत, तों बहुतेक मशाली विझून गुडुप अंधार पडला. कोणाची कोणास दाद लागेना. हें काय आहे हें घोडेस्वार येऊन पाहतात तों, वीरसिंह नाहीं, सुशीला नाहीं चंद्रकांताचाही कोठें ठिकाण लागेना ! जाहांदार याचाही पत्ता नव्हता. एकच सर्व हाहाःकार होऊन गेला मग कसली वरात ! या चौघांस कोणीं नेलें याचा कांहीं थांग लागेना सर्वांनीं रडून एकच कल्होळ केला, याप्रमाणें सर्व गोंधळ झाला. असो, याप्रमाणें कांहीं वेळ गेल्यानंतर सर्वांनीं परस्परांचें शांतवन केलें. आणि दुःख करीतच हळू हळू सर्व आपापल्या घरीं निघून गेले.

सुशीलेच्या मातापितरांचा मात्र शोक आवरेना. त्यांना वाटलें कीं आपल्या प्रिय मुलीचे सुख सोहाळे यापुढें पहावयाचे, तें सर्व आतां एकीकडेसच राहिलें. अकस्मात् कोणता शत्रू येऊन त्यानें घाला घातला हें त्यांना कांहींच समजेना. या चौघांची दशा काय झाली, या काळजीनें त्यांचें अंतःकरण अगदीं उद्विग्न होऊन गेलें. आपल्या प्रिय मुलीचा आणि आपला आजपर्यंत एक क्षणभरही वियोग नाहीं आणि अकस्मात् ताटातूट कशी पडली, आतां तिची दशा

काय झाली असेल अशा अनेक दुःखदायक कल्पना मनांत येऊन तीं उभयतां बिचारीं शोकार्णवांत बुडून गेलीं. या वेळीं मेनकावतीनें जो शोक केला त्याची कल्पनासुद्धां करणें अशक्य आहे. पूर्वींच तिचें अंतःकरण दुःखानें अगदीं पोळून गेलें होतें; तें चंद्रकांताचें एक दिवसाचें येणें तिला अगदीं स्वप्नवत् होऊन गेलें. इतके अरण्यावास काढून आतां तरी आपलें नष्टचर्य सरेल, असें जेव्हां तिचा प्रियपति भेटला, तेव्हां तिला वाटलें होतें, परंतु अद्यापही ईश्वर आपला छळ चालवित आहे, यावरून त्याचा आपणावर पूर्ण कोप आहे असें तिनें जाणिलें. अंगावरील सर्व दागिनें काढून टाकिले, आणि पूर्वींपासून दुःख आठवून तिनें विलाप चालविला, तें पाहून सोमकांतही रडूं लागला, याप्रमाणें थोड्याच वेळापूर्वीं जेथें आनंदमय होऊन गेलें होतें, तेथें आतां सर्व दुःखमय झालें, आणि सर्वांस ती शोभा विषतुल्य दिसूं लागली.

इकडे दुर्वीर्यमहाराजांची स्वारी राज्यावर येतांच तें सुंदर शहर अग्नि लावून दग्ध केलें हें मागें सांगितलेंच आहे. नंतर त्या दुष्ट प्रधानांनीं कोठें काय होतें तें पहाण्याकरितां कांहीं हेर ठेवीले होते. लोकांवर जुलूम करण्यास आरंभ केला. त्या हेरांनीं ह्या लग्नाची सर्व हकीकत राजास सांगितली. हें राजकुटुंब जिवंत असून आनंदांत आहे, असें त्यांनीं सांगितलें तें त्याच्या डोळ्यांत खुपलें. अगदीं गुप्तपणें तीनशें लोक चार प्रधानांसह तेथें जाण्यास तयार केले. त्या वरातींत कोणी मशालजी कोणीं सभ्य गृहस्थ बाजूनें चंद्रकांताजवळून चालले आणि संधि राखून एकदम वर सांगितल्याप्रमाणें घाला घातला. ओरडतील ह्मणून त्यांच्या

तोडांत चोंथे देऊन जवळच्या गल्लींतून बाहेर पडले तेथें पन्नास घोडे तयार होते. चौघांस चार घोड्यांवर बांधून घोडे उधळीत अगदीं आड मार्गानें चालते होऊन लवकरच दुसऱ्या दिवशीं ते मत्सपुरास पोंचले. त्या मायलेंकरांचें मन असलीं संकटें सोसून बरेंच दृढ झालें होतें. परंतु त्या सकुमार सुशीलेची दशा फारच काकुळतवाणी होऊन गेली. अपलीं ममताळू आईबापें प्राण देतील असें मनांत येऊन रडूं लागली. तिनें स्तब्ध रहावें ह्मणून ते दुष्ट तिला लाथा बुक्या मारून धमकावूं लागले. जिला सूर्याचे कोमल किरणसुद्धां सोसवत नव्हते तिच्यानें हे हाल कसे सोसवतील? तशांत ती लहान असल्यामुळें तिचें अंतःकरण इतकें विचारी नव्हते; तथापि ती आपल्या नवऱ्याच्या जिवावर आपलें दुःख सर्व विसरली. मग राजास एकिकडे, व या उभयतांस एकिकडे अशा दोन कोठड्यांत नेऊन घातलें. राजा जिवंत आहे हें पाहून यांस मोठें आश्चर्य वाटलें, व यांतील खरी हकीकत काय आहे हें समजण्याकरितां ज्यांस दुर्वीर्यमहाराजानें पूर्वीं यास ठार मारण्याकरितां बरोबर दिलें होतें त्यांस पाचारण केलें. कारण कीं, हें भयंकर कृत्य केल्यानंतर नवपुरीस जाण्याची त्यांस आज्ञा झाली होती. हें सर्व कृत्य मोठ्या गुप्त रीतीनें झालें होतें. त्या अष्ठ प्रधानांशिवाय व दुर्वीर्याच्या सैन्यांतील कांहीं लोकांशिवाय त्या गांवातील एकासही हें माहीत नव्हतें. चंद्रकांताच्या पायांत शृंखला घालून व नेसावयास एक लंगोटी देऊन ढेकुण पिसवांत अगदीं अंधारांत कोंडून टाकला होता. हालहाल करून त्यास मारावें अशी

महाराजांची आज्ञा झाली होती. तीन दिवसांस अर्धी भाकर तीही अर्धीमुर्धी भाजलेली व त्याचप्रमाणें स्वच्छ पाणी कधींही पिण्यास देऊं नये. तितक्यांत राजा मोठ्यानें रडेल किंवा कुंथेल तर लाथा बुक्या बक्षिस द्याव्यात. याप्रमाणें सक्त ताकीद देऊन मजबूद पहारा ठेविला होता. मग राजश्रीची स्वारीही तेथें कधीं कधीं येऊन पाहिजे तशी निर्भत्सना करून पाहिजे तसें तोंडसुख घेण्याचा प्रकार होतच असे, व याच्या संरक्षणार्थ तीन असामी आपल्या सेनेंतील मुख्यांपैकीं ठेविले होते, याप्रमाणें चंद्रकांताची बरदास्त ठेविली होती.

इकडे वीरसिंहाची व सुशीलेची ही तजवीज अगदीं वर सांगितल्याप्रमाणेंच ठेविली होती. त्यांत त्यांना सुख इतकेंच कीं, तीं उभयतां एक ठिकाणीं होतीं. वीरसिंहास नेसावयास एक लंगोटी, व सुशीलेला एक घाणेरडा तेलकट फडका, तिचे असे हाल पाहून वीरसिंहाचें मन अगदीं गहिंवरून जाई. एकेवेळीं ती अतिशय भूक लागल्यामुळें अगदीं व्याकुळ पडली आहे, तों वीरसिंह तिला ह्मणूं लागला कीं, प्रिये, माझ्याकरितां तुला " दुःखें भोगावीं लागत आहेत. तें ऐकतांच तिनें उत्तर केलें कीं, हीं दुःखें काय परंतु आपणाकरितां माझा प्राण जरी आतां जातो आहे तरी मी देतें. आपली मात्र अशी दशा पाहून माझा जिव तिळ तिळ तुटतो. मी कोठेंही असलें तरी। आपल्या सहवासानें सर्वकाळ आनंदांत असेन. अशी बालणीं चाललीं आहेत तों वीरसिंहास आपल्या आईची आठवण झाली. मग त्यास कांहीं सुचेना, चंद्रकांतास त्याच्या बरोबरच आणिला होता, व तें त्यानें

पाहिलें होतें. मग त्याची दशा त्या दुष्टांनीं आपल्यासारखीच केली असेल कीं काय ? आपल्या आईस वृद्धापकाळीं हें दुःख ह्मणून किती झालें असेल ! आजपर्यंत आपण तिजबरोबर अरण्यवास भोगिला आतां तिची दशा काय होईल ! चंद्रकांताच्या येण्यानें तिला एकच दिवस सुख झालें होतें. परंतु तिनें त्याला डोळांभर तरी पहावयाचें होतें, आतां माझा बंधू सोमकांत काय करील ! परमेश्वरा ! आतां आमचा छळ ह्मणून किती करणार ! या बंदिखान्यांत हाल भोगण्याचें आमच्या नशीबीं आलें आहे ना ! शिव ! शिव ! माझ्या प्रियसखीच्या आईबापांची दशा तिकडे काय झाली असेल ! एवढ्या मोठ्या आनंददायक समारंभांतून त्या दुष्टांनीं आह्मांवर कसा हो अकस्मात् घाला घातला. याप्रमाणें दुःखें आठवून वीरसिंह विलाप करीत बसला. हें पतीचें दुःख पाहून सुशीलाही हुमसा हुमशी रडूं लागली. याप्रमाणें दुःख करून अगदीं थकून गेल्यामुळें त्यास गाढ निद्रा लागली. मध्यरात्रीचा अंमल झाला होता, इतक्यांत खाडदिशीं द्वार वाजलें ह्मणून एकदम चपापून सुशीला जागी झाली, चहूंकडे एकच चकचकाट दिसल्यामुळें तिचे डोळे अगदीं दिपावून गेले. मग पुढें पहाते तों अक्राळ विक्राळ स्वरूपाचे सहा धटिंगण पुरुष हातांत मशाली घेऊन उभे आहेत, हें पाहतांच तिचें काळीज थरथरलें, आणि त्यांस विचारूं लागली कीं, आपण एवढ्या रात्रीं येथें कशाला आलां आहां ? कशाला तें सांगतों ह्मणून एकानें वीरसिंह जवळ निजला होता त्याच्या कंबरेवर दोन तीन सडकून लाथा मारिल्या. इतक्यांत तो ओरडतच उठला.

सुशीला वेड्यासारखी झाली तिनें एकदम जाऊन त्याच्या पायांस घट्ट मिठी मारिली आणि रडत रडत त्यांची विनवणी करूं लागली कीं, आधीं माझा प्राण घ्या, मग त्यांचे हाल करा. इतक्यांत त्यांतील दोघांनीं वीरसिंहास धरून त्याचे हात बांधूं लागले. सुशीलेनें त्याच्या गळ्यास घट्ट मिठी मारिली, आणि मोठा गळा काढून ह्मणूं लागली कीं, माझ्या प्रियास नकाहो नेऊं आह्मीं दोघें येथेंच आनंदानें राहूं मला तुमचें दुसरें कांहीं नको. एवढें चुडेदान द्या ह्मणजे पुरे. मी तुमचे जन्मोजन्मीं उपकार विसरणार नाहीं. नाहीं तर त्यास या बंदींतून सोडून तरी द्या. मी मेली राहीन एकटी. अशी अनेक प्रकारें तिनें त्यांची विनवणी चालविली; परंतु त्यांच्या पाषाण ह्रदयास किंचित्‌ही द्रव आला नाहीं. सुशीलेनें मारलेली मिठी त्यांनीं सोडवून लाथा बुक्या देतच वीरसिंहास बाहेर काढिला. मग त्या बिचारीच्या शोकास काय विचारावें ! मोठमोठ्यानीं हंबरडे फोडूं लागली. " प्रिया, एकदां इकडे येऊन तरी जा. मला तुह्मांस एकदां तरी पाहूं द्या. तुह्मीं जाता पण तुमची सुशीला प्राण देईल, हें तुह्मीं कसें हो मनांत आणीत नाहीं. तुमच्याच जिवावर मी येथें सुखानें रहात होतें. आतां येथें एकटी काय करूं. " याप्रमाणें विलाप करीत आहे तों त्यांपैकीं एकानें तिजकडे धांवत येऊन त्या सकुमार सुशीलेला पाहिजे तितक्या लाथा मारिल्या, आणि चूप रहा नाहीं तर प्राण घेईन अशी धमकी देऊन दारास कुलूप ठोकलें. मग तिनें अनिवार शोक केला. सर्व रात्रभर ती बिचारी ओरडत होती. जिच्या सेवेस ५०।६०

दासी जिला जन्मांत कसे तें दुःख माहीत नव्हतें. तीच सुशीला आतां आई, बाप, भ्रतार यांशिवाय लाथा बुक्या घेत तुरुंगांत रडत पडली आहे; दैवाची गति विचित्र आहे. विधीनें ललाटी लेखन केलें आहे तें कधींही चुकणार नाहीं. अन्नपाण्याशिवाय त्या बिचारीनें सर्व दिवस घालविला. परमेश्वराची प्रार्थना करून ह्मणत्ये. देवा, असा मी तुझा कोणतारे अपराध केला ! सर्वांतून सोडून मला या बंधनांत कारे टाकिलेंस ! ज्याच्या जिवावर मीं आपलें सर्व दुःख विसरून येथें आनंदांत होत्यें तो माझा जिवलग सुद्धां या दुष्टांनीं कसारे नेला, आतां मी कायरे करूं ! हा गुप्तमारा तुला समजत नाहीं काय ? देवा, आतां उपेक्षा करूं नको. मी अनन्यभावें करून तुला शरण येत्ये. तूं आपल्या ब्रिदास राख. माझ्या प्रियाची त्या दुष्टांनीं कायरे अवस्था केली असेल. माझे आई बाप माझ्या करितां दुःखकरून प्राण देतील. त्यांस दुःख देण्यास तरी मला त्यांच्या उदरीं जन्म कशाला दिला. असा विलाप करीत आहे; मुख म्लान झालें आहे. केश विकलित पडले आहेत नेत्र लाल झाले आहेत. इतक्यांत आपल्या दाराची कोणी कडी काढीत आहे असें तिला वाटलें; पाहते तों एक भव्य पुरुष हातांत नागवी तलवार घेऊन आंत शिरला, तो तिला यमस्वरूपी भासला. हा आपणास कोणींतरी मारावयास आला आहे असें समजून तिला आनंद झाला. कारण कीं, आपण या दुःखांतून सुटूं असें तिला वाटलें मग त्यास ह्मणते हाल करून मात्र मारूं नको. तलवारीच्या एकाच घावानें माझा शेवट करा. ह्मणजे मी तुमची उपकारी होईन. तें ऐकून तो ह्मणतो कीं, प्रिये ! तुला

मारण्यास माझे हात कसे वाहतील ! तुझ्यावरून मी आपला जीव ओंवाळून टाकीन ! तूं मला माझ्या प्राणा पलिकडे आहेस ! इतके शब्द कानीं पडतांच ती चाणाक्ष्य सुशीला त्या दुष्टाच्या मनांतील हेतू समजली. त्याचे शब्द ते बाणाप्रमाणें तिच्या त्द्दयांत टोंचले. पण बिचारी करते काय ? मध्यरात्र झाली आहे. ओरडेल तर आसपास कोणी नाहीं, आणि हा दुष्टतर बलात्कार करून प्राणच घेईल; अशी मोठ्या विचारांत पडली. आधींच तिचें अंतःकरण दुःखानें अगदीं पोळून गेलें होतें. मग एका-वरएक अशीं संकटें येताहेत असें पाहून तिची अगदींच कंबर खचून गेली. हा आलेला मनुष्य दुर्वीर्याचा मुलगा दुर्मती नामें होता. सुशीलेचें स्वरूप पाहून तो अगदीं मोहित झाला होता, ह्मणून त्या उभयतांस एके ठिकाणीं ठेविले होतें, तें त्यास आवडलें नाहीं. आणि ह्मणूनच त्यांस निरनिराळें ठेवण्याकरितां त्यानें गेल्या रात्रीं सहा असामी पाठविले होते व आतां यांची स्वतः स्वारी आली.

असो इकडे चंद्रकांताच्या बंदीखान्यांतील बडदास्ती-बद्दल पूर्वीच सांगितलें आहे. त्या बिचाऱ्यानें शोक करावा ह्मणून कशाचा, त्याजवर सर्व आकाशच कोसळलें होतें. मग तो अगदीं विरक्त होऊन संसारसंबंधीं त्यानें सर्व काळजी सोडून दिली. त्याची सर्व आशा तुटल्यासारखी झाली इतके त्याचे विलक्षण हाल चालले होते परंतु त्यां-तच तो संतोष मानून परमेश्वर चिंतनाकडे आपला सर्व काळ घालवीत असे. असो त्याच्या शत्रूंमध्यें बागेंत तुळस याप्रमाणें शालमलाक्ष ह्मणून त्याचें संरक्षण कर णाऱ्यापैकीं एक होता. त्यास या राजाची दया येऊन

तो त्यास जितकें सुख देववेल तितकें देत असे. शेवटीं त्या परस्परांचें मैत्रत्व इतक्या शिखरास जाऊन पोंचलें कीं, शालमलाक्षानें महाराजास विषप्रयोग करून मारून नंतर चंद्रकांतास राजा करण्याचा बेत केला व तो त्यास सांगितला. चंद्रकांतानें तें सर्व ऐकतांच नाकारिलें आणि उत्तर केलें कीं, अशा हलकट उपायांनीं मी राजा होऊं इच्छित नाहीं; तसें होण्यापेक्षां मी येथेंच ईश्वर भजनांत कालक्षेप करीन. असें केल्यास तुह्मीं दुर्वीयाचा विश्वासघात केल्याबद्दल तुह्मांस महत्पातक लागेल; याकरितां हल्लीं आहे हेंच ठीक आहे. तुह्मीं हे सर्व विचार सोडून आपल्या राजाच्या आज्ञेंत वागत ज़ा. तुह्मां सर्वांस आनंद असला ह्मणजे मी कोणत्याही स्थितींत असलों तरी मला आनंदच आहे. नंतर हाच बेत त्यानें राजपुत्रास कळविला परंतु त्याणें ही स्पष्टपणें नाकारिला. याप्रमाणें शालमलाक्षास आपले विचार सोडून देणें भाग पडले. परंतु त्याच्यानें त्याची दुर्दशा पहावेना, ह्मणून त्यानें राजास बंदींत टाकिल्याची बातमी सर्व गांवांत पुकारिली. पहा बरें! या उभयतांसारखें दुःखी या जगांत कोणी नसून ते बंदीखान्यांत अतिशय हाल भोगीत होते. अशा निकृष्ट अवस्थेंतही असतां त्यानें राज्यसुख नाकारलें; कारण फक्त त्यास तें हलकट उपायांनींच प्राप्त होणार होतें. खरोखर थोर मनाचे लोक आहेत त्यांस गैरशिस्त मार्गानें किंबहुना कुबेराची दौलतही मिळत आहे तरी ते तुच्छ मानितीलच मानितील!

असो सुशीला बंदीखान्यांत मध्यरात्रीं विलाप करीत पडली असतां दुर्मती तिजवर बलात्कार करण्याकरितां

आला आहे हें मागें सांगितलें आहेच. मग तो येतांच सुशीलेजवळ येऊन बसला. ती बिचारी काय करते तरी मनांत न डगमगतां मोठ्या चातुर्यानें बोलून त्याचे पंचही प्राण आपल्याकडे ओढून घेतले; आणि आतां अगदीं वेडा झाला असें जाणून जवळच कांहीं लांकडें पडलीं होतीं त्यांस काय ह्मणतात असा प्रश्न केला.

दु०—प्रिये यांस खोडें ह्मणतात.

सु०-खोडे तें कायग बाई, याचं काय करायाच.

दु०—प्रिये, त्यांत पाय अडकविला असतां मनुष्यास पळतां येणार नाहीं.

सु०—नाहीं तें भलतेंच सांगाव कोणीकडून आपली समजूत करावयाची ना !

दु०—नाहीं नाहीं सखे, मी तुला खोटें सांगेन काय ? तूं माझ्या जिवाचा कलिदां नव्हेस काय ?

सु०—बरें त्याचें काय करावयाच तें दाखवा. ( असें ह्मणून आपला पाय पुढें करते.)

दु०—छेः छेः लाडके, तुझे सकुमार पाय दुखतीलग मीच आपला पाय घालितों. ( असें ह्मणून आपला पाय घालून त्यास कुलूप लावून किल्ली सुशीलेजवळ देतो.)

किल्ली हातीं येतांच सुशीला झडकर उठली आणि धांवत बाहेर पडून बाहेरून दारास कुलूप ठोकलें, आणि त्या मुर्खाच्या विनवणीस कान न देतां सर्व रात्रभर इकडे तिकडे फिरून आपल्या पतीस शोधीत होती पण त्याचा थांग लागेना. तेव्हां निराश होऊन कोणी नाहीं असें पाहून झुंजुंमुंजूं राजनगरा बाहेर पडली; परंतु आतां काय करावें, हें तिला कांहीं सुचेना. कदाचित् आपणास

कोणी ओळखील तर परत राजगृहीं नेतील ही एक मोठीच धास्ती तिच्या मनांत येऊन पडली. आपल्या प्रिय पतीचा शोध कसा लागतो, आपल्या आई बापाच्या घरीं तरी आपणास कोण नेतो, येथें आपणास अन्न कोण घालील, तशांत एक फाटकें फटकुर नेसलेली असल्यामुळें जाण्यास लज्जा वाटून मोठें दुःख झालें. मग वेड्यासारखी इकडे तिकडे फिरूं लागली येथें कोठेंतरी जीव द्यावा ह्मणजे आपण या सर्व दुःखांतून मुटूं असें तिला वाटलें. मग दोन प्रहर होईपर्यंत फिरत फिरत ती एका रानांत आली. अन्न पाणी नसल्यामुळें चेहरा अगदीं म्लान झाला होता. ऊन अतिशय असल्यामुळें जमिनीवर पाय ठेववतना. भुक लागल्यामुळें उह्मासे येत. तृषा लागून कंठ अगदीं शोषून गेला होता. मग जीव देण्याकरितां इकडे तिकडे धांवत आहे, पण तलाव किंवा विहीरही तिच्या दृष्टीस पडेना. इतक्यांत पाठीमागें घोड्यांच्या पाउलांचा आवाज तिला ऐकूं येऊं लागला. आपणास त्या दुष्टानें धरणें पाठविलें आहे, असें समजून ती इकडे तिकडे धांवूं लागली, तों, तो घोडेस्वार तिच्या पाठीमागें येऊं लागला मग ती बिचारी त्या घोड्यापुढें किती धांवणार ! इतक्यांत " भिऊंनको, भिऊंनको, " असे अमृतासारखे शब्द कानीं पडतांच तिच्या जिवांत जीव आला, आणि उभी राहून पाहते तों आपला पिता विरभद्र आहे असें तिनें ओळखिलें. मग दोघांनीं परस्परांच्या गळ्यास मिठी मारून जो शोक केला त्याचें वर्णन करितां येत नाहीं सुशीलेची ती दशा पाहून तिच्या बापास अतिशयच दुःख झालें. वीरभद्र विचारूं लागला, नये

सुशीले, तुझी दशा अशी कोणिग केली. तूं अशी या दुःखांत कशी वांचलीस. मीं आतां तुला भेटलों नसतों, तर तुझी काय बरें अवस्था झाली असती. मग आपल्या पतीची ही आठवण करून सुशीलेनें अतिशय शोक केला. पण आपण कोणत्या स्थितींत आहों त्याची परस्परांस आठवण झाली. मग सुशीलेस अगदीं भुक लागली होती पण त्याजवळ कांहीं नव्हतें ह्मणून तिला पाणी पाजून घोड्यावर बसऊन अंबापुरीत घेऊन चालता झाला. लग्न समारंभातून सुशीलेस पळवून नेल्यावर अंबापुरींतील धांदल पूर्वी सांगितलीच आहे. नंतर वीरभद्रानें या त्रिवर्गाच्या शोधाकरितां पुष्कळ घोडेस्वार रवाना केले; परंतु कोणासही थांग न लागतां ते सर्व निराश होऊन परत आले. मग हा स्वतः वेष पालटून नेहमीं मत्सपुरास येत असे. तेथें बारकाईनें शोध करून परत जाई; परंतु त्यास कांहीं थांग लागेना. याप्रमाणें होत असतां एके दिवशीं निराश होऊन अंबापुरींत जात असतां अकस्मात् सुशीलेस भेटला हें मागे सांगितलें आहेच. इकडे दुर्मती खोड्यांत अडकून दोन प्रहरपर्यंत रडत पडले होते. अन्नपाणी घेऊन सेवक आंत येऊन पहातात तों ही स्वारी तोंड खालीं करून पडली आहे. मग त्याला त्या बंधनांतून मुक्त करून महाराजांची सुटका केली.

चंद्रकांत बंदीखान्यांत आहे ही बातमी लोकांस कळतांच निनांवी पत्रें येऊं लागलीं. मजकुराचा सारांश इतकाच कीं, “ चंद्रकांतास बंदींतून मुक्त करावा नाहींतर राज्यास धोका येऊं शकेल असे लोक अगदीं निर्वाणीवर आलेले पाहून माहाराजांनीं राजास व राजपुत्रास एकदम

मारावयाची मसलत केली. रात्र पडतांच चंद्रकांतास बाहेर काढला, आणि बराबर एक घोडे स्वार देऊन त्यास सांगितलें कीं, रात्रौ रात्र तुह्मीं पंधरा कोशांचा पलीकडे जावें, आणि कदाचित् तुह्मीं येथें छपून रहाल ह्मणून तुह्मां बरोबर एक स्वार दिला आहे. असें ह्मणून त्यांची रवानगी केली. ते उभयतां तेथून निघून सर्व रात्रभर चालले, उजाडावयास त्यांणीं बारा कोशांची मजल घेतली; इतक्या वेळांत चंद्रकांतानें तोंडांतून एकही शब्द काढिला नव्हता- बिचारा विचारात अगदीं निमग्न झाला होता ती मेनकावती, सोमकांत लग्न समारंभ, याच्या डोळयांपुढें दिसूं लागला. मेनकावतीचें भेटणें त्याला स्वप्नवत होऊन गेलें- असो. याप्रमाणें चालले आहेत तों चार घटिका दिवस आला, आपल्या आसपास फिरे अरण्य आहे. असें पाहून त्यास्वारानें राजासघोड्यावरून ओढिला, आणि ह्मणूं लगला कीं, तूं दुष्ट चांडाळ आहेस, ह्मणून तूला येथें मारावा अशी राजेसाहेबांनीं मला आज्ञा केली आहे तें ऐकून तो किंचितही न डगमगतां फार उत्तम आहे असें ह्मणून एकदां परमेश्वर चिंतन करण्याकरितां थोडीशीवेळ त्याणें प्रार्थना करून त्याजपासून मागून घेतली.

मत्सपुरांत त्याच मध्यरात्रीं राजपुत्रास बंदीतून बाहेर काढिला, आणि दहा वाजतां बंदीची तोफ झाल्यानंतर लागलेच एक घोडा देऊन शहर सोडण्याविषयीं त्यास हुकूम दिला. नंतर त्यास मारण्याविषयीं त्या दुष्टांनीं अशी युक्ति केली कीं, शहरांत सर्व कोट असल्यामुळें बाहेर पडण्यास एक दार त्या दारावर पंधरा रामोशी ठेविले आणि त्या राजपुत्राचे तुकडे तुकडे करून पुरून टाकण्या-

विषयीं हुकूम दिला. अशा विलक्षण रीतीनें हाल करून प्राण घेण्याची युक्ति त्या दुष्टांनीं योजिली. असो याप्रमाणें करून ते लोक हत्यारबंद होऊन त्याची वाट पाहत बसले तों दूर घोड्याचीं पावलें वाजताहेत असें त्यांस ऐकूं आलें. व तो घोडा जवळ येत आहे तोंच त्यांणीं त्यास खालीं ओढिला. तो ओरडतो, अरे मी राजपुत्र, नकोरे मारूं. मला तुह्मांस कांहीं सांगावयाचें आहे; त्यांणीं उत्तर केलें कीं, तूं राजपुत्र ह्मणूनच तुला मारावयाचा. इतकें ह्मणताहेत तों त्याच्या तोंडांत चोथा घालून हाल हाल करून त्याला मारून पुरून टाकिला. हें घोरकृत्य करून तर ते दुष्ट आपल्या जागच्याजागीं गेले.

असो. इकडे सुशीला घरीं येतांच तिची ती दीनवाणी अवस्था पाहून व बंदींतील दुःख दायक वागणूक ऐकून सर्वांनीं जो अनिवार शोक केला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे, पतीच्या विरहानें सुशीला दिवसें दिवस कृश होत चालली, अन्नपाणी दागदागिन्याचा त्याग करून रात्र दिवस सर्व चित्त तिकडेस लागलें होतें. त्याच्या विरहाने सर्व ऐष आराम तिला विषतुल्य भासूं लागलें रात्र दिवस नुसत्या भूमीवर तळमळत पडत असे. कधींही नेत्रांतील अश्रु खळत नसत कधींही डोळ्यांस झोप नाहीं. जराशी डुलकी आली असतां रडतच उठावें. वीरसिंहाचें बोलणें व त्याचें स्वरूप तिला डोळ्यांपुढे दिसूं लागलें. कधीं कधीं स्वप्नांत आपला पति आपल्या जवळ आहे असें भासावें उठून पाहावें तों कोणीं नाहीं मग जास्ती दुख करून रडण्यास लागावें. अशा दुःखांत नेहमीं त्या बिचारीचे आईबाप शांतवन करीत असत व ती कदाचित् प्राणत्याग करील ह्मणून

तिजपाशीं सुखाच्या गोष्टी सांगत असत. हिकडे मेनकावती तर वेड्यासारिखीच होऊन गेली सर्वकाल त्या दुःखाग्नीत दग्ध झाली होती. एखादे वेळीं जरासा विसर पडला तर सोमकांत आपल्या पित्याविषयीं विचारूं लागला ह्मणजे पुनः तें सर्व दुःख आठवून ती रडत बसे चंद्र कांताचें तें चार प्रहराचें येणें तिला स्वप्नवत् झालें. सर्व रात्र नेत्रांस झोंप नाहीं एके दिवशीं अगदीं वेड्यासारखी होऊन आपल्या बिछान्यावरून सोमकांतास निजलेला कडेवर घेऊन उठली आणि मत्सपुरास जाऊन पतीस भेटावें नाहीं तर या यत्नांत मरावें असा तिणें निर्धार केला मग तशीच उठूण कोणास न समजतां मत्सपुराचा मार्ग धरला.

पर्जन्य काळ समीप आला असतां प्रचंड ढग आकाशांतून हिकडे तिकडे फिरूं लागले. सर्व आकाश अभ्रानीं अच्छादित असल्यामुळें चारी दिशा धुंद दिसूं लागल्या. जोराचा वाराही सुटण्यास आरंभ झाला. अंतःकरणास धडकी बसण्यासारखे विद्युल्लतेचे कडकडाट ही होऊं लागले. मोठ्या कडाक्याच्या पर्जन्याच्या सरीवर सरी पडूं लागल्या. आकाशांतील भयंकर गडगडाट ही होऊं लागले. गगनचुंबीत वृक्ष उन्मळून पडताहेत कीं काय अशी धास्ती पडली. अशा प्रसंगी आपला चंद्रकांत निबीड अरण्यांत त्या दुष्ट घोडे स्वारांच्या हातीं सापडला हें मागेंच सांगितलें आहे. नंतर राजानें ईश्वर चिंतनास्तव कांहीं वेळ मागून घेतला होता. तो संपताच तो दुष्ट त्याला मारण्यास उत्सुक झाला. चंद्रकांताचा घोडा मोकळा सुटतांच त्या वाऱ्याच्या सपाट्यात तो रानो माळ उधळू लागला अशी त्याच्या टांपांच्या

कडाक्यानें दूर एक मोठा भयंकर व्याघ्र निजला होता- तो जागा झाला. घोडेस्वार हिकडे तिकडे पाहतो तो विक्राळ यमस्वरूपी व्याघ्र आपणाकडे धांवत येत आहे असें त्याच्या दृष्टोत्पतीस आलें. तें प्रचंड स्वरूप पाहतांच त्या बिचाऱ्याची बोबडी वळून गेली हातांतून तलवार गळून पलडी, एक पाऊल पुढें टाकवेना, जवळच झाड होतें त्यावर कांपत कांपत चढूं लागला; अशी त्या तरवार बहादराची व्यवस्था झाली इतक्यांत तो व्याघ्रही तेथें येऊन ठेपला, आणि त्याचा प्राण घेणार इतक्यांत जवळच चंद्रकांत उभा होता त्याणे त्या घोडेस्वारांच्या हातांतून गळून पडलेली तलवार घेऊन आपण त्या वाघावर धांवत गेला आणि एकाच प्रहारें करून त्या घातकी जनावराचा त्या शूर चंद्रकांतानें प्राण घेतला; आणि त्याप्रमाणें जो घोडेस्वार त्याचा प्राण घेण्याकरितां आला होता त्यास त्या राजानें काळाच्या तोंडातून राखिलें; आणि तीच तलवार त्याच स्वराचा हातीं देऊन आपणास लवकर मारण्याविषयीं त्याची विनवणी करूं लागला, परंतु त्याच्या पाषाण हृदयास द्रव आला; आणि राजास मारण्याकरितां त्याचा हात वाहीना. ज्याणें त्याचा प्राण राखिला त्याचा प्राण घेण्याचें त्याला धैर्य कसें होईल ? मग त्यास किंचित्ही न दुखवितां तो स्वार परत आपल्या मार्गी जाता झाला.

राजा मोकळा सुटतांच मार्ग सापडेल तिकडे चालता झाला. आतां अरण्यवास काढण्याची त्याला बरीच सवय पडून गेली होती. बिचारा पोटभर अन्नपाण्याशिवाय अनेक शहरांतून फिरतां फिरतां एका समुद्र कि-

नाऱ्यावर आला. तेथें बरीच तारवें नागरलेली पाहून देश पर्यटन करण्याची उत्कंठा त्याला प्राप्त झाली. विजयपूर नामक नगरास जलमार्गानें जाऊन तेथील राजास भेटावें कारण कीं तो त्याचा अत्यंत मित्र असे. नंतर यात्रेस जावें असा विचार करून एक गलबत मोठें पाहून चंद्रकांत निघाला, परंतु त्याच्या पाठीमागें ग्रहदशा लागली आहे तो त्याचें नष्टचर्य पुरेंपर्यंत त्याचा पाठलाग केल्याशिवाय रहाणार नाहीं. दोन दिवस गलबत नीट चाललें विजयपुराच्या पुढें दोन तीन दिवसांचा रस्ता राहिला तो अस्तमानच्या समयास वारा बदलला, आंतील खलाशासुद्धां सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. अशा समयास वरवा करण्याजोगें कोणतेंही बंदर नव्हतें. चोंहोकडे अफाट समुद्र कांहीं अंतरावर भव्य खडक मात्र दृष्टीस पडत. मोठमोठे ढग आकाशांतून हिकडे तिकडे फिरूं लागले. दिशा धुंद झाल्या कांहींवेळानें काळोखी रात्र आपला भयंकर पडदा चोंहोकडे पसरूं लागली मोठमोठ्या पर्वतप्राय लाटा उसळूं लागल्या समुद्र अगदीं खवळून गेला, एका लाटेनें गलबत तळास जातें कीं काय असें सर्वास वाटलें. काळोखही अगदीं निबिड पडला होता, यामुळें दुसऱ्या आसपासचा गलबतांची दशा काय झाली तेंही त्यानां समजेना इतकेंच नव्हे परंतु अकस्मात मोठे कडकडाट होऊन विद्युल्लतेच्या चमकीनें एकदम चोंहोंकडे प्रकाश पडे पुनः गुडुप अंधार होई. त्या गलबताचा दोरींतून वारा चंगाप्रमाणें वाजूं लागला, पाणीही गलबतांत शिरण्यास आरंभ झाला, जें सापडेल तें समुद्रांत टाकण्याकडे शुद्धीवर होते ते गुंतले; कित्येक परमेश्वराचें स्तवन करूं

लागले, कित्येक आपल्या मुलाबाळांची आठवण काढून आक्रोश करूं लागले; प्रत्येकक्षणीं आपण बुडालों असें त्यांना वाटे, असो अशा स्थितींत आमच्या चंद्राकांताची दशा काय झाली असेल याचा वाचकांनींच विचार करावा. त्याला वाटलें कीं दैव आतां आपल्या पाठीमागें हात धुवून पाठीस लागलें आहे; परंतु असे हाल करून जीव घेण्यापेक्षां एकदम प्राण जाईल तर उत्तम, असा विचार करून देवाचा धांवा करूं लागला. "हे देवा" या वादळांत माझा शेवट कर, परंतु माझाबरोबर बाकीचांस संकटांत घालूं नको. सर्वांबद्दल माझा प्राण घे, असें मीं पूर्वजन्मीं कोणतें पातक केलें होतें, कीं एकाहून एक अधिक अधिक संकटें माझ्यावर येऊन पडतात. देवाधिदेवा मी करुणास्वर भाकीत आहें हिकडे लक्ष दे. आतां अंत पाहूं नको. मी संकटानें बांधला गेलों आहें. अत्यंत दुःखानें गांजलों आहें. आपल्या मुलांबाळांस अंतरलों आहें. सर्व सृष्टीवर निराश्रीत दैवहीन आहें. तुला शरणांगत आहें रक्षणकर. याप्रमाणें अनेक तऱ्हेनें चंद्रकांत दुःखांत पडला असतां परमेश्वराचें स्तवन करूं लागला, आणि तें वादळ तर जास्त जास्त होत चाललें.

हिकडे मेनकावती अन्न पाण्याशिवाय सोमकांताला कडेकर घेऊन मार्गक्रमण करीत चालली आहे हें मागें सांगितलें आहे, व विचार करितेकीं आपण आतां मत्सपुरास कसें पोंचूं, तेथें आपला प्रियपति कसा भेटल, त्याची दशा काय झाली असेल ! अशा अनेक कल्पना तिच्या मनांत येऊन बिचारी रडूं लागली. कांहीं केल्या अश्रू

थांबेनात. तितक्यांत सोमकांतही रडूं लागला. त्या विचारीनें दुःख ह्मणून किती आठवावें. तिचा परमेश्वरानें पुराच छळ चालविला होता. असो जवळच एक धर्मशाळा होती तेथें सुमारें रात्रीं आठ वाजतां जाऊन रडत बसली. अन्न पाणी नसल्यामुळें फारच थकून गेली होती. सोमकांताचे दीनवाणी शब्द बाणाप्रमाणें तिच्या हृदयांत टोंचत, याप्रमाणें तीं उभयतां माय लेकरें मोठ्या दुःखांत आहेत तों एक घोडेस्वार तेथें आला. त्याच्या मागून दुसरा तिसरा याप्रमाणें पांच सात आले, आणि त्यांणीं त्या मेनकावतीला ओळखतांच घोडयावर घालून सुवर्णपुरांत नेऊन विचारीला बंदिखान्याच्या सुखांत ठेविली. हे दुर्वीर्याच्या हेरांपैकीं होते, व त्यांच्या हातांत आयतीच ती विचारी सांपडली.

असो हिकडे समुद्राच्या मध्यभागीं मध्यरात्रीं मोठ्या भयंकर वादळांत आपला चंद्रकांत सांपडला आहे, हें मागें सांगितलेंच आहे. सुमारें अरुणोदय होण्याचा वेळ आला तरी काळोख गुडूप पडला होता, परंतु वादळाचा जोर कमी होत चालला ह्मणून अशा संकटसमयीं परमेश्वरानें विलक्षण रीतीनें आपलें संरक्षण केलें, याकरितां सर्व त्याचा धांवा करूं लागले. आपल्या जवळील तारवांची दशा काय झाली, हें पाहाण्याकरितां खलाशी लोकांनीं मोठमोठ्या चुडी पेटविल्या परंतु भयंकर खवळलेल्या समुद्रांत लाटांशिवाय त्यांना कांहीं दिसेना. समुद्र शांत होत चालला, वाराही बराच कमी झाला, थोडें दिसूं लागलें तों वाऱ्याच्या सपाट्यानें तारूं खडकावर आपटण्याच्या बेतावरच आलें होतें असें त्यांणीं पाहिलें; आणि जवळ त्यांना

एक किनारा दिसूं लागला. तो गांव कोणता आहे तें मात्र समजेना, परंतु चंद्रकांताची ग्रहदशा अद्यापही पुरी झाली नव्हती. खलाशांनीं पेटविलेल्या चुडींतून नकळत एक ठिणगी उडून अवजारांत जाऊन अडकली आणि थोड्याच वेळांत तेथून अग्नीच्या ज्वाला निघूं लागल्या. कोणी पाहाताहेत कोणी न पाहाताहेत तों बराच भडका होत चालला. तितक्यांत वाऱ्याचें साह्य मिळाल्यावर काय विचारावें ! थोडक्याच वेळांत एकच होळी झाली. एकासंकटांतून बिचारा चंद्रकांत पार पडतो आहे तों हें दुसरें अरिष्ट त्यावर येऊन पडलें. सर्वांनीं रडून एकच कल्होळ केला. कित्येक वेड्यासारखे होऊन हिकडे तिकडे फिरूं लागले. कित्येक घिरी येऊन खालीं पडले, बहुतेकांची बोबडी वळली. इतक्यांत साफ उजाडलें जिकडे तिकडे तांबडा प्रकाश पडला. दुःखांत सुख एव्हढेंच होतें कीं, तेव्हां रात्र नव्हती व एक किनारा जवळच होता तो विचार करण्याची वेळ नव्हती. गलबतावरील दोन तीन होड्या होत्या त्या घेऊन शुद्धीवर होते ते निघाले. इतक्यांत तें अवजार कोसळून दोन्ही होड्यांतील लोकांची जलरूपी कुडांत आहुती झाली. परमेश्वरकृपेनें चंद्रकांत ज्या होडींत होता ती अद्याप पर्यंत शाबूद होती, परंतु पुढें जातां जातां ती होडी वाऱ्याच्या सपाट्यानें आंतील मनुष्याच्या हातीं राहीना, इतक्यांत एका लाटेच्या सपाट्यानें ती होडी एका खडकावर आपटली. मोठ्या प्रयत्नानें चंद्रकांत त्या खडकावर जाऊन बसला, परंतु बाकीचे एकही मनुष्य त्याच्या दृष्टीस पडेना. तेव्हां त्या बिचाऱ्याची तेथें दशा काय बरें झाली असेल ! त्यानें

कुटुंब पुनः भेटण्याची त्याची आशा तुटली इतकेंच नव्हे, परंतु या खडकावरच उपाशीं मरावें लागणार असें त्याला वाटलें. सर्व कपडे भिजले होते ह्मणून थंडीनें खुडखुडून भ्रमिष्टासारखा तेथें विचार करीत बसला. ओहोटी असल्यामुळें पाणी कमी होत चाललें होतें. तेव्हां जवळून किनाऱ्यावर पोहून जाण्याचा त्याणें निश्चय केला, परंतु तेथें तरी रानांतील भयंकर जनावराच्या भक्षस्थानी पडावें लागणार ही एक मोठीच काळजी त्याला येऊन पडली. आतां हा एकांतवास जन्मभर काढावा लागणार कीं काय ? आतां अन्न पाण्याशिवाय थंडीनें खुडखुडत लवकरच आपला परिणाम होणार असें त्याला वाटलें; मेनकावती कोठें असेल ! सोमकांत काय करीत असेल ! वीरसिंहाची दशा काय झाली असेल. हे विचार मनांत येऊन बिचारा रडूं लागला. कांहीं वेळानें तें भरतीचें पाणी बरेंच निखर झाल्यानंतर तो मोठ्या प्रयत्नानें त्या तीरावर येऊन पडला, व परमेश्वरानें त्याचा प्राण संरक्षण केला ह्मणून मोठ्या हर्षानें त्याची प्रार्थना करून ह्मणतो, देवाधिदेवा तुझे म्यां पामरानें किती बरें आभार मानावेत ! त्या दुष्टानीं मला मारण्याचा कट केला. मला मारावयास घोडेस्वार धाडले. बंदीखान्यांत माझे विलक्षण हाल केले, परंतु इतक्याही संकटापासून त्वां मला राखलेंस. ह्या भयंकर वादळापासून व अग्नीपासून माझें संरक्षण केलेंस. आणि मला या जमिनीवर आणून टाकलें आहेस, परंतु नारायणा असे माझे हाल करण्यांत तुझा कांहीं तरी बेत असेल व हें सर्व तुझ्या पासूनच आहे; असें मनांत आणून मी हें सर्व आनंदानें सोसतों. ज्यापेक्षां त्या संकटापासून

त्वां माझे प्राण राखले आहेस, तेव्हां याही स्थितींतून तूं मला खचितच सोडविशील हेंही मी जाणतों. तूं तें तारूं इतकें किनाऱ्याजवळ आणिलेंस हें तरी तुझें ह्मान कौतुक काय ? आतां मी तुझे उपकार ह्मणून किती मानूं. अशी अनेक तऱ्हेनें देवाची प्रार्थना करीत बसला आहे तों टळटळीत दोन प्रहर झाली. पोटांत कांहीं नसल्या-मुळें अगदीं व्याकुळ झाला होता, मग कांहीं फळें मिळतील तीं खाण्याकरितां चंद्रकांत त्या अरण्यांत शिरला. आंत पाहातो तों गगनचुंबित वृक्ष व चमत्कारिक जनावरें त्याच्या दृष्टीस पडूं लागलीं. चंद्रकांतास पाहातांच पक्ष्यांचे कळपाचे कळप किलकिलाट करीतच चोहोंकडे उडूं लागले. झाडावरील वानरही पळूं लागले, परंतु तो शूर चंद्रकांत किंचितही मनांत न डगमगतां कंबरेस नागवी तरवार लटकत होतीच ती हातांत धरून पुढें चा-लला. परंतु या तरवारीशिवाय व दोन कपड्यांशिवाय दुसरें कांहीं एक बरोबर नव्हतें. मग सांपडतील तीं फळें खाऊन व पाणी पिऊन एका अंबराईत येऊन पडला. अनेक विचार त्या बिचाऱ्याचे मनांत घोळूं लागले. वृद्धा-पकालपर्यंत सर्व दिवस सुखांत घालवून आतांही संकट भोगणें प्रालब्धीं आलें. अद्यापि तरी आपली दशा काय होणार आहे ? आतां पुढें काय करावें. मेनकावती, सोमकांत, वीरसिंह अपणास कसे भेटतात, त्यांची दशा काय झालीअसेल ! अशा अनेक दुःखदायक विचारांत त्याचें मन अगदीं गढून गेलें. भ्रमिष्ठाप्रमाणें हिकडे तिकडे फिरण्यांत तो त्यानें दिवस घालविला, रात्र पडतांच थंडी वाजण्यास आरंभ झाला, चोहोंकडे एकच कूई होऊन

गेली. भालुकादि उग्र पशूंचे भयंकर आवाज कानींपडूं लागले. तितक्यांत व्याघ्रादिकांच्या दूर होणाऱ्या डुरकण्या व दुसऱ्या कितीएक जनावरांच्या चमत्कारिक किंकाळया ऐकूं येऊं लागल्या. तरी तो चंद्रकांत मनांत डगमगला नाहीं. कांहींवेळ परमेश्वर स्मरण करून अनेक तऱ्हेचे विचार करीत असतां त्याला झोंप लागली. ज्यास रत्नखचित पलंगावर निजण्याची संवय त्याला थंडीनें कुडकुडत त्या काट्यांत उपाशीं कसें बरें निजवेल! असो बिचारा करितो काय? त्याणें दुःख ह्मणून कशाचें करावें! त्यावर आकाशच लोटलें होतें. दुसऱ्या दिवशीं उठून ईश्वर चिंतन केलें, मग कांहीं वेळानें तो तें अरण्य धुंडण्यास निघाला. पुष्कळ वेळ फिरून परत आपल्या आमराईत आला. असो याप्रमाणें त्यानें कितिएक दिवस तो अरण्यवास काढला. तितक्या वेळांत पुष्कळ घातकी जनावरांपासून त्या तरवारीच्या योगानें त्याणें आपलें संरक्षण केलें. फळें खाऊन राहाण्याची त्याला सवय नसल्यामुळें दिवसें दिवस अगदीं कृश होऊन फक्त अस्थिचर्म उरलें होतें.

एके दिवशीं मध्यरात्रीं रानांत जागा होऊन पाहतो तों एक मोठी आग पेटली आहे. हा काय चमत्कार आहे ह्मणून येऊन पाहतो तों तीन चार चोर कांहीं दागिन्यांची व वस्त्रांची आपसांत वांटणी करीत आहेत असें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. अकस्मात् घाला घालून त्यांस मारणें हें पातक आहे, असें चंद्रकांताच्या मनांत येऊन तो आपली तरवार घेऊन त्यांजपाशीं गेला. त्याला पाहतांच ते तिघेही त्याच्या आंगावरच धांवले. राजानें तरवारीच्या

दोन परजांतच त्या तिघांस यमसदनास पाठविलें, आणि ते सर्व वस्त्रालंकार गोळा करून त्या आमराईंत आला. यावरील कृत्यावरून राजानें विचार केला कीं, येथें जवळच एक शहर असावें, व तेथें जाऊन ज्यांचे त्यांस वस्त्रालंकार द्यावे असें मनांत आणिलें. मग प्रातःकाल होतांच मुखमार्जन करून परमेश्वराचें अंतःकरणपूर्वक स्मरण केलें; नंतर ते सर्व कपडे व अलंकार घेऊन तो त्या शहरास येण्यास निघाला. पायाखालचा रस्ता दिसे त्याणें मार्ग काढीत काढीत चंद्रकांत अस्तमान होईपर्यंत चालला, तों अकस्मात् तें सुंदर शहर त्याला दिसूं लागलें तें शहर विजयापूर होतें, जेथें पूर्वी राजानें येण्याचा निश्चय केला होता, तेंच होतें, व त्या देशाच्या राजाचें नांव सुमित्र होतें आज कितीएक दिवस भयंकर अरण्य आणि घातकी जनावरें यांचेशिवाय त्याच्या कांहींच दृष्टीस पडत नव्हतें. तरी आतां हें सुंदर शहर पाहून त्याच्या मनांत किती बरें आनंद झाला असेल ! शहराचे दरवाजे बंद झाले होते, ह्मणोन चंद्रकांत सर्व रात्रभर धर्मशाळेंतच निजून प्रातःकाल होतांच प्रभात कर्म आटपून परमेश्वराचें चिंतन करूं लागला. बराच वेळ तिकडे घालविल्यानंतर कांहीं वेळानें सुंदर पोशाग करून शहरांत शिरला. त्याजवळचे चोरीचे कपडे पहातांच त्याला शिपायांनीं पकडला, आणि त्या बिचाऱ्याचा एकही शब्द न ऐकतां बंदीखान्यांत टाकिला. ही वर्दी राजास कळतांच त्याला एकदम फांशीं द्यावा असा त्याणें हुकूम केला. कारण कीं, त्या राज्यांत आलीकडे नेहेमीं दरोडे पडत असत. आज संध्याकाळीं फांशी देणार ही बातमी गावांत फुट-

त्यांच नेमलेल्यावेळीं फांशी द्यावयाचे ठिकाणीं शेंकडों लोक जमों लागले. कांहीं वेळानें स्वतः राजेसाहेबांची स्वारी, बरोबर मंत्री प्रधानासहित तेथें आली. मग त्या बंदीवानास मागें पुढें हत्यारबंद शिपायी अशा थाटानें तेथें आणिला, व हा मोठा दरोडेखोर आहे, आजपर्यंत त्रास देणारा आपणास आतां मिळाला ह्मणून याला देहांत शिक्षा देण्यांत येत आहे, असें प्रधानानें जमलेल्या सर्व लोकांस सांगितलें. याप्रमाणें तो बिचारा चंद्रकांत सर्व संकटांतून सुटून ते कपडे ज्याचे त्यास द्यावे या उद्देशानें शहरांत आला होता त्याचा एकही शब्द न ऐकतां तोच दरवडेखोर ठरवून त्याजवर हा केव्हढा बरें प्रसंग गुद-रला! बंदीखान्यांत टाकतांच चंद्रकांतास आपलीं पूर्वींचीं दुःखें आठवून व ती फांशीची बातमी ऐकतांच त्याला मनांत आनंद झाला. कारण कीं, आतां तरी आपला सर्व दुःखापासून शेवट होईल. मग आपण पर-मेश्वराचे घरीं चिरकाल आनंद भोगण्यास जाऊं. असें मनांत विचार येऊन त्याचा चेहेरा टवटवीत दिसूं लागला. त्याचें तें शांत गंभीर आणि सुहास्यवदन पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. चंद्रकांतास तेथें आणितांच प्रथम त्याणें सोमकांत, मेनकावती व वीरसिंह यांच्या मुर्ती आ-पल्या डोळ्यासमोर आणिल्या. नंतर परमेश्वर चिंतन करीत करीतच तो फांसाजवळ आला.

असो हिकडे मत्सपुरांत दुर्वीर्य महाराजानीं आपला अंमल इतका कडाक्यानें चालविला होता कीं सर्व लोक जिवावर उदार होऊन आपला देश त्या दुष्टाचे हातून सोडविण्याविषयीं बेत करूं लागले नंतर सर्वांनीं एकत्र

होऊन अकस्मात घाला घालण्याचा विचार ठरवून त्या करितां त्याणीं गुप्तपणें मोठी कडेकोट तयारी चालविली. बंडवाल्यापैकीं एकानें मेनकावतीबद्दल एका स्त्रीस तयार करून व त्या थाटानें तीस बंदीखान्यांत ठेविली. आणि मेनकावतीला सोडून त्या लोकांनीं आपल्या सेनेचें आधिपत्य दिलें व आलीकडे मत्सल लोक आपल्या सेनेंत ठेवण्याचें महाराजांनीं चालविलें होतें. ते मेनकावतीला सोडविण्यांत वगैरे बंडवाल्याचे मोठे उपयोगीं पडले.

चंद्रकांत हिकडे फांसावर चढणार इतक्यांत त्या मंडळींतून एका मनुष्यानें धांवत धांवत येऊन त्याच्या कंबरेस घट्ट मिठी मारली. आणि मोठा वसा काढून ह्मणू लागला कीं बाबा आपली दशा अशी कोणीहो केली? अशा स्थितींत आपणास पाहाण्याचें माझ्या नशीबीं आलेंना!! चंद्रकांतानेंही त्याजकडे रोखून पाहिलें, आणि हा आपला प्रियमुलगा वीरसिंह आहे असें त्याणें लागलेंच ओळखिलें. मग परस्परांनीं अनिवार्य शोक चालविला. तो पाहून सर्व थक्क झाले. मग तो फांशीचा सर्व समारंभ तहकुब ठेऊन तेथील राजानें त्या उभयतांस आपल्या वाड्यांत नेलें. चंद्रकांत राज्यावर असतां या राजाचा व त्याचा परमस्नेह होता त्याचा तो दुःखदायक इतिहास ऐकून त्याला फारच दुःख झालें. पुनः मत्सपूर त्या दुष्टापासून सोडविण्याचा त्या त्रिवर्गानीं विचार चालविला. आतां वीरसिंहास तिकडे ठार मारला असतां हिकडे कसा आला हा संशय आमच्या वाचकांस आला असेलच. पूर्वीं मेला तो दुर्मती दुर्वीर्याचा मुलगा होता. वीरसिंहास वेशीवर ठार मारणार ही बातमी त्याला कळतांच आपल्या

वाड्यांतून उठून तो समारंभ पाहाण्यास घोड्यावर बसून दुर्मती महाराजांची स्वारी निघाली, परंतु वीरसिंह शहरांतून बाहेर पडण्यापूर्वी जवळच अंबिकेचें देवालय होतें तेथें पूर्वीच दर्शनास गेला होता; इतक्यांत दुर्मती महाराजाची स्वारी घोड्यावर बसून ते रामोशी होते तेथें आली, त्यांणीं त्यास न ओळखतां हाच वीरसिंह असें जाणून हाल करून त्याचा प्राण घेतला. नंतर वीरसिंह सुरक्षितपणें बाहेर पडून बरेच दिवस रानांतून हिंडतां हिंडतां अकस्मात् चोरांची गांठ पडली. पुढें त्यांजबरोबरच तो गेला ते चोरच होते. मग त्यांणीं यास कांहीं दिवसांनंतर आपला अध्यक्ष नेमला. नंतर वर सांगितल्या देशांत यांणीं त्यावेळीं आपला व्यवहार चालविला होता. दिवसाचे वेष पालटून सर्व वेळ गांवांत असत, व अशा थाटानें येथें असतां एके दिवशीं हा फांशीचा समारंभ पहाण्याकरितां स्वारी येथें आली होती तों विलक्षणसमयीं चंद्रकांताची भेट झाली.

आतां आपण किंचीत मागें वळूं. त्या वरातींतील आकस्मिक हल्ल्यांत जाहांदर यासही तोंडांत बोळा देऊन व हात बांधून एक स्वार घेऊन जात होता, परंतु आकस्मात् त्याच्या तोंडातील बोळा सरकला तेव्हां त्यानें श्वासोच्छ्वास घेऊन तो हुशार झाला व हात सुटण्याविषयीं प्रयत्न करूं लागला . व हिसके मारूं लागला हें त्या स्वारानें पाहून दोन चार ठोंसे ह्याच्या बरगडींत लगावून ह्मणाला " कमा सुटण्यास पाहतोस परंतु आतां तूं माझ्या हातून जिवंत सुटणारच नाहींस हें पक्कें समज " असें ह्मणून पुन्हा दोन ठोंसे लगाविले, बिचाऱ्या जाहांदार यानें गपचुप

रितीनें तितकेही सहन करून घेतले. जाहांदार याचे हात किंचीत् ढील झालेले आहेत असें त्या स्वारानें पाहून ते पुन्हां गच्च बांधण्याकरितां पूर्वीची गांठ सोडली. जाहांदार यानें आपले हात सुटे झाले ही संधी पाहून मोठ्या त्वरेनें कमरेचा खंजीर काढून त्या स्वाराच्या पोटांत खुपसला तसाच तो दुष्ट घोड्यावरून उलथून पडला नंतर जाहांदार यानें त्याचीं सर्व हत्यारें घेऊन व त्यास तसाच तेथें विव्हळत टाकून आपण घोड्यावर बसून चालता झाला. पुढें कांहीं दिवस जंगलांत भटकून शेवटीं आपल्या भिल्लाच्या झोपडीकडे आला, व आपल्या सर्व भिल्ल सरदारांस भेटला; जाहांदार आला असें पाहून त्यांस मोठा आनंद झाला. त्यांतही विशेषेंकरून आपल्या हिंमतराव नायकास मोठा आनंद झाला. जाहांदार ह्यानें कांहीं भिल्लांस गुप्तपणें जाऊन मत्सपुराकडील शोध आणण्यास सांगितलें; तसे त्या लोकांपैकीं कोणी अरण्यांतील कंदमुळें, कोणी जनावराचीं कातडीं, कोणी सांबरा हरिणांची शिंगे वगैरे पदार्थ शहरांत विकण्याकरितां घेऊन गेले; व तेथील सर्व हकिकत जाहांदार यास कळविली कीं चंद्रकांत महाराज कैदेंत असून त्यांस थोडक्याच दिवसांनीं मारून टाकणार, व सुमतीनें दुष्ट दुर्मतीस युक्तीनें खोड्यांत अडकवून आपण निघून गेली, राणी साहेब मेनकावतीबाई ही कैदेंत होत्या त्यांस शहरवासी लोकांनीं त्यांच्या ऐवजीं दुसऱ्या स्त्रीची योजनाकरून त्यांची मोकळीक केली आहे व त्या आतां गुप्तपणें फौज जमवीत आहेत शेवटीं दुःखाची बातमी इतकीच कीं आपल्या राजपुत्र वीरसिंहास त्या दुष्टांनीं हाल हाल करून ठार मारिलें! इतके शब्द

ऐकतांक्षणींच जाहांदार एकदम धरणीवर पडून मोठा आक्रोश करीत गडबडां लोळूं लागला !

जाहां०—बा वीरसिंहा ! मला सोडून एकटाच स्वर्ग सुख घेण्यास तुला कसें जावेंसें वाटलें ! अरे आपण उभयतां बंधुत्वाच्या नात्यानें वागत होतों, तो संबंध आज तुटलाना आतां ! मला दादा ! असें कोण हाक मारील ! अरेरे आपणास केवढी मोठी उमेद होती ती सर्व खचून गेली काय ? अरेरे ! तुझ्या मातापित्यास किती शोक झाला असेल अरे ! ( क्रोधानें ) चांडाळा ! दुर्वीर्या असा कापट्यानें त्याचा प्राण घेतलासनां ! अरे त्यांत तुला काय मिळालें ! दुष्टा मी जिवंत राहिलों तर ह्याचा सूड उगविल्याशिवाय कधीं राहणार नाहीं ! बाई सुशिले ! आतां तूं काय करशील ! तुजवर हा एक महान पर्वत कोसळून पडल्या सारखें झालें. तुझ्या आईबापास राजपुत्र जांवई मिळाल्यानें किती आनंद झाला होता अरे ! त्या आनंदाचा आज समूळ नाश झालानां ! अरेरे फार फार वाईट गोष्ट झाली ! ! ( जाहांदार शोक करीत असतां एक भिल्ल मत्स पुराकडील बातमी काढण्यास गेला होता तो येतो. )

वाघोजी०—कां सरकार ! कशापाई इतका शोक चालला ? अहो ! आपल्यासनी एळकोट म्हणूनशानी हरुप केला पाईजे !

जाहां०—( रागावून ) अरे तूं अंतःकरणाचा अगदीं पाषाण आहेस माझ्या समोरून तूं ह्या वेळीं जा.

वाघोजी०—अनकशापाइसरकार ! पण काय झालें तें तरी मला कळवाकी.

दु०भिल्ल—अरे आपल्या सरकारचा मैतर त्या राजाचा

ल्योक गमावला म्हन्त्याती त्या पाइ सरकारास्नी है दुक्ख झालया.

**वाघोजी०**—( तिरकमठ्यास गुण लावून ) अन कंचा गाडीचा म्हनतोया त्यास आन माझ्या पुढ इथ असा बघु!

**जाहां०**—( हर्षानें ) तरकाय वीरसिंह जिवंत असून सुखरूप आहे ! !

**वाघोजी०**—तर काय तुमासनी अजून संसह हाय सरकार ! काळकाईच्यान मी त्यासनी डोळ्यांनीं बघितलें त्यानीं तर पगा येक राजबी घेतल.

**जाहां०**—शाबास ! शाबास ! आणि तें कोणाचें?

**वाघोजी०**—तें नवपुरी म्हंगत्यात तें सरकार ! आन रानीसायबांनीं पन पघा आपल्या इरभद्र सेनापतीला बोलवूनशानी लढाईची तयारी चालवली है.

**जाहां०**—वाहवा ! वाहवा ! कशी आनंदाची खबर!! आजच्या ह्या कामगिरीबद्दल घे हें तुला बक्षीस ( एक कंठी देतो ).

**वाघोजी०**—असुंद्याकी सरकार तुमासनी लई चांगली सोबतया आमी काय रानी मानस आमासनी कशाला हाव असडऊल तुमच्या पायाची कुरपा शेवकावर असली म्हंजे लई है.

**जाहां०**—कांहीं चिंता नाहीं, घे ही घे ही एक आनंदाच्या खबरीची खूण आहे.

**लिंबाजी०**—घेकी बिद्या सरकार खुशी होऊन शेनी देत्याती मग त्यांना कां रंजीस करतोस.

**वाघोजी०**—( कंठी घेऊन तीन वेळ मुजरा करितो ) आपनासनी पघा लई सरम वाटतीया घालूं आपल्या पो-

राच्या गळ्यात आनमग इची भैन बायकू पन लई खुशी होईल पगा, अर आपल्या भिल मानसासनी अस सोन्याच दागीन कशाला हावत !

( जाहांदार निमाज पडण्यास जातो )

**दुसरे भिल्ल०**—काय राव आतां तर अक्षी ह्याची अइट वाडल बगा आन ते एका कानावर मुंडास घालून अस्तनी-च आंगरखा ती कंबरेला लटकती तरवार न घोडा न मग रावाची सवारी बगा झुकत झुकत चालल मग पगा आपल सारख लवून शेनी मुजरा करतील लई बाप्याची अक्कल वाढल बगा ! सरकारची हेच्यावर लई कुरपा है.

**वाघोजी०**—आन तुमच्या कां लेकिच्याओ पोटामधी एवाशींच दुखूं लागल्या.

**लिंबाजी०**—तस न्हव राव, आमासनी तर लई हरूष झाला या तुमी पन आपलेच हा कीनाय ?

**टमाजी०**—तिट्या एवडा काय तुला राग येऊं लागला जनुकाय ल्योकानी मोठी तरवार गाजवली ! रहा उभा मुंडे ठोकून ह्या पठ्या ह्यारे तुला आतां दावतो मजा.

**वाघोजी०**—( हांसून ) काय ल्योक म्होट्या सुर मर-दाच्या गोष्टी सांगतोया आनराव परवा बघा एक कुतरे पाठी लागल तवा बायकोला हाक मारूनशेनी घरामधं पळून गेला बायकोन कुतुरडाल्या हाड करूनशेनी घरा-मधी रावाला बघु गेली तवा राव काय सांगाव ह्याच आंग थरथरा कापूनशेनी लंगोटींत मुतला पघा, असा तर सूरमर्द है. ( इतक्यांत जाहांदार येऊन )

**जाहां०**—वाघोजी.

**वाघोजी०**—जी सरकार.

जाहां०–आपल्या हिंमतराव नायकास बलावून आणा व आपल्या सर्व मनुष्यांस उद्यां गोळा करायास सांगा. कारण परवां सकाळीं आपणास मत्सपुराच्या जवळ पोंचलें पाहिजे. सांप्रत जर तेथें लढाई चालली आहे तर आपणास तिकडे जाणें जरूर आहे. कारण लढाई संपल्यावर तेथें जाऊन मग आपल्या लोकांचा शूर मर्दपणा काय दिसणार ! ! तर अशा संधीसच गेलें पाहिजे, ह्यामध्यें तुमचा कसा विचार आहे.

वाघो०–म्यां काय सांगाव सरकार! आपल्या पायाच खेटूर त्यास इतुकी बुध कोठूनशेंनी ! आपन तर पघा सरकार हुकूम करा कीं ह्या पायापाशीं मुंडक कापूनशेनी ठेवितो. ( हिंमतराव येतो व लवून मुजरा करितो ).

जाहां०–या नाईक, बरे खुशाल आहा कीं ?

हिंमत०–सरकारच्या पायाच्या कुरपेन, पन आज मला कां बोलावल सरकार ?

जाहां०–तुह्मांस बोलावण्याचें कारण सांप्रत मत्सपूराकडे लढाई चालली आहे तर मला वाटतें अशा समयासच जाऊन त्यांस मदत करावी व आपल्या अडाणी लोकांचा पराक्रमही त्यांस दाखवावा, लढाई संपल्यावर मग जाणें ह्मटलें ह्मणजे वरातीमागें घोडें याप्रमाणें होणार ! ह्यावर तुमचा कसा काय विचार आहे तो कळवा.

हिंम० व वा०–आमचा इचार कसला सरकार ! तुमी आज सांगितल तरी आमची तयारी है बगा.

जाहां०–बरें तर आज सायंकाळीं सर्वांनीं आप आपलीं हत्यारें घेऊन तयार असावें, आज रात्रींच आपण येथून कुच करून जाऊं ह्मणजे उद्यां दोनप्रहर उलटण्याच्या

सुमारास मत्सपुराकडे जाऊन पोहोंचूं.

हिं०—ठीक है सरकार.

सायंकाळीं हिंमतराव नाईकानें व वाघोजीनें आपल्या भिल्लांची जमवाजमव करून चार हजार भिल्ल जमा केले. सर्व भिल्ल एकत्र झाल्याबरोबर एक परडीं आणून त्यांत एक जळतें कोडें ठेविलें व त्यांत कुंकुम अक्षता टाकून "काळीकाईचा एळ कुडवे" ह्मणून त्या परडीस हजारों-जणांनीं हात लावून ती जमीनीवरून उचलली, असें दोन तीन वेळ केलें नंतर नाईकानें देवीची स्तुती केली कीं "आमच्या सरकारास कुळस्वामीनी अंबाबाई तुझ्या कृपेन यश येऊंदे ह्मणजे तुला शंभर बकरू वाहीन आन बालगोपाळ मिळवूनशेनी तुझी जत्रा करीन ह्मणा हरहर महादेव" !! जाहांदार पूर्वीच निमाज पढून ह्यांची ही गमत पाहत उभा राहिला होता व त्यांचा आपणावर दृढ निश्चय आहे असें पाहून त्यास मोठा आनंद झाला. नंतर सर्वांनीं देवाचें नामस्मरण करून तेथून प्रयाण केलें; दुसरे दिवशीं जाहांदार आपल्या रानटी फौजेसह सुमारें दोन वाजण्याच्या सुमारास मत्सपुराच्या किल्ल्याजवळ येऊन पोंचले व पाहतात तों लढाई घनचक्कर चालली आहे व एकच आरोळी झाली, कीं दुर्वीर्याच्या सैन्यास जय मिळाला राणीचें सैन्य पळूं लागलें, वीरभद्रास कैद केलें व राणी सभोवतीं गराडा पडला आहे; व ते दुष्ट फितूर प्रधान राणीस कैद करून तिची सर्वांनीं विटंबना करावी हा हेतू धरून तिजबरोबर लढत आहेत. परंतु ती एकटी स्त्री असून तिनें अद्याप टिकाव धरून राहिली खरी परंतु आतां अगदीं घाबरून इकडे तिकडे बावऱ्यासारखी पहात आहे. ही सर्व बातमी ऐ-

कून जाहांदार अगदींच चौताळून गेला व त्यानें आपल्या हिंमतराव नाईकास व बावोजीस सांगितलें कीं एकदम शत्रुस कापीत चला दुसरी गोष्ट नको आपणासही मराचयाचेंच आहे कारण त्यांची आज ऐंशीं हजार फौज लढत आहे व आपली फक्त चार हजार राणीची सुमारें दहाहजार असेल पैकीं कांहीं मेली कांहीं पळाली व सांप्रत एक दोन हजार असेल ! तेव्हां इतक्या लोकांनीं काय होणार ! हा विचार न करितां एकदम फौजेंत घुसा मग जें होईल तें होईल.

**हिंम० बा०**—सरकार ऐंशीं हजार सोडून दोन लाख असली ह्मणून काय झाल, आमची हीं अडाणी मानसं पघा अंबाबाईच नांव घेऊनशेनी समद्यासनी भुईवर निजवत्याल !

**जाहां०**—चला तर इलाहीचें नांव घेऊन फत्ते करा, प्रथम राणी साहेबांस मदत करून मग सेनापतीस सोडवूं.

आपल्या हिंमतराव नाईकाची फौज ह्या सैन्याच्या जवळ येतांच उभय सैन्यास आपणांस मदत आली असें वाटलें; त्यांतून दुर्वीर्याच्या सैन्यास तर खरोखरचहीं आपल्या महाराजांनीं मदतीकरितां फौज पाठविली आहे असें वाटून त्या दुष्ट फितुऱ्यांस आनंद होऊन त्यांनीं पुन्हां एकदां जयाची आरोळी ठोकली; हिकडे हा सर्व गजर पाहून बिचाऱ्या मेनकावतीची तर पांचावर धारण असली अगोदरच वीरभद्रास कैद केलें ही बातमी ऐकून तिची कंबर खचून गेली होती, त्यावरही फौज पाहून तर ती अवसान रहीत होऊन अगदीं घाबरून गेली व

कावऱ्या बावऱ्या सारखी हिकडे तिकडे पाहूं लागली; तिच्या डोळ्यासमोर आंधारी येऊं लागली, आपल्या पतिपुत्राचें स्मरण होऊन तिचे डोळे अश्रूंनीं भरून आले. तिनें अंतःकरणांत ईश्वराचा धांवा आरंभिला कीं देवा आंता सकंटसमयीं रक्षण करणारा तूं आहेस, तुजवांचून इतर कोणी नाहीं, म्यां आपल्या आयुष्यांत जीं जीं पातकें केलीं असतील त्यांची तूं क्षमा कर, तुला मी अनन्य भावें शरण आहें" अशी प्रार्थना करून आत्मघात करून ह्या जगास शेवटचा प्रणाम करण्याचा निश्चय केला; कारण तिला वाटलें कीं, आंता येथें आपला निभाव लागणार नाहीं व त्या दुष्टाच्या हातीं आपण जिवंत सांपडल्यास ते आपली फार विटंबना करतील.

मेनकावती आपल्या अशा विचारांत गर्क असतां ते दुष्ट प्रधान तिच्या अगदीं जवळ येऊन पोंचले व धरा मारा ! पळून जाईल ! भली सांपडली असे अनेक प्रकारें ह्मणत आहेत व ह्यांच्या हातीं आपण जिवंत न सांपडावें ह्मणून मेनकावतीही आपलीच तलवार आपल्या मानेवर टेवण्याच्या बेतांत आहे, इतक्यांत शाबास बाघोजीराव ! भले हिंमतराव धरा, बांधा गुलामांना सोडूं नका ! हानाकी बाबोजीराव ! काय पघताया ! इत्यादि ध्वनींकडे सर्वांचे लक्ष्य गेलें व त्या प्रधानादि सर्वांचें ध्यान हिकडे फिरलें तें पाहतात तों हे भिल्ल कोण ! आले कोठून व आपल्या लोकांस एकदम पार करीत आहेत हें काय ? इत्यादि विचारांत ते आहेत तों जाहांदराचे लोक अगदीं आंगाशीं भिडले व त्यांनीं दोघां तिघां प्रधानांस स्वर्गास पोंचविलें व बाकिच्यांस एकदम चतुर्भुज केलें असा एकच

गोंधळ झाला, हे, आपले कीं दुसरे हें कांहींच समजेना. मेनकावतीस तर ह्या गोंधळाचें मोठें आश्चर्य वाटून ती एक सारखी तटस्थ उभी राहीली. इतक्यांत जाहांदारानें मेनकावतीस हांक मारली. " काकू घाबरूं नका आतां मी सर्वांची खबर घेतों " हे ओळखीचे शब्द ऐकतांक्षणींच मेनकावतीस मोठें आश्चर्य वाटून ती टकमक हिकडे तिकडे पाहूं लागली, तों जाहांदार तिच्या दृष्टीस पडला. मग काय विचाराव ला पाहिजे ! तिला नवीन उमेद आली. जाहांदार ह्याच । लोकांनीं दुर्वीर्याचें बरेंच सैन्य कापून टाकिलें व त्या प्रधानास कैद केलें हें पाहून बाकीचे लोक पाठीमागें हटूं लागले, हें पाहून मेनकावती जाहांदारास ह्मणाली कीं वीरभद्र दादांना तिकडे धरून नेलें आहे असें वाटतें. तर अगोदर त्यांस सोडविण्याची कांहीं तजविज करावी. जाहांदार ह्मणाला कांहीं चिंता नाहीं मी आतां त्यांना सोडवून आणितों तुह्मीं हिकडे सांभाळा. तुमच्या मदतीस हिंमतरावास मीं हिकडे ठेवितों व वाघोजीस मी आपल्याबरोबर घेऊन जातों. नंतर जाहांदार यानें वाघोजीस बरोबर घेऊन जिकडे वीरभद्रास धरून नेला त्यांजवर हल्ला करून त्यांची दाणादाण करून टाकली; नंतर वीरभद्राचे हातपाय मोकळे करून टाकले, व जाहांदार व वीरभद्र उभयतां कडकडून भेटले कांहीं वेळपर्यंत उभयतांही एकमेकांच्या तोंडाकडे पाहत तटस्थ उभे राहिले; नंतर वीरभद्र ह्मणाला.

**वीर०**—जाहांदारशहा जर आज आपण आलां नसतां तर खचीत मी पुन्हां तुमच्या दृष्टीस पडलों नसतों, काय सांगू इतक्या थोड्या वेळांतही माझे त्या दुष्टांनीं हाल

हाल केले ते सांगण्यास मला मोठी लाज वाटते, प्रथमतः त्या लोकांनीं ताई ( मेनकावती ) मारली गेली अशी अवाई उठविली, हें ऐकल्याबरोबर माझे हातपाय अगदीं गळून गेले व मला कांहींच सुचेनासें झालें व मी अगदीं स्तब्ध झालों, ही संधी त्या दुष्टांनीं पाहून एकाएकीं पाठीमागून माझेवर फांस टाकिला व एकदम घोड्यावरून खालीं पाडिलें व तसेंच उचलून घेऊन गेले, मला सोडविण्याविषयीं आपल्या सैन्यांतील लोकांनीं फार झटपट केली, परंतु आपले लोक पडले थोडे व त्यांचा जमाव पडला अधिक तेव्हां ते बिचारे त्यांस कोणी आवरणारा नसल्यामुळें दशदिशा पळूं लागले; मला धरून त्या लोकांनीं कोठें चालविलें तें मला ठाऊक नाहीं परंतु काय सांगू जाहांदारशहा कोणी माझे तोंडांत मारित कोणी लाथ मारीत कोणी जोडा देखील मारण्यास चुकले नाहींत इतकेंच नव्हे तर आणखी तोंडांतून न ऐकण्यासारखीं अभद्र भाषणें करीत, इतक्यांत आपली स्वारी आली.

जाहां०—आतां आपण त्यांचा बरोबर सूड उगवून घेऊं, चला आतां काकूकडे जाऊं. कारण ती तेथें एकटी वाट पाहत असेल नंतर जाहांदार, वीरभद्र व वाघोजी मिळून मेनकावती जवळ गेले; मेनकावतीस तोंड दाखविण्यास वीरभद्रास मोठी लाज उत्पन्न झाली ह्मणून तो एका बाजूस उभा राहिला, हें मेनकावतीच्या लक्ष्यांत आलें, तशी ती वीरभद्राजवळ गेली व एकदम त्यास घट्ट मिठी मारली व ह्मणाली दादा जय अपजय होणें हें का आपले स्वाधीन आहे, तुह्मीं असे दुःखित कां होतां, शेवटीं ईश्वर

सत्तेनें जय आपलाच झाला आहे. तर आतां आनंदित वृत्ति धारण करा. इतक्यांत जाहांदार ह्मणाला काकू वीरसिंह कोठें दिसत नाहीं तो ? मेनकावती ह्मणाली बाबा तो नवपुरीवर ( दुर्वीयाचें मुळचें राज्य ) हल्ला करण्याकरितां फौज घेऊन गेला आहे त्याचें तेथें काय झालें हें अद्याप समजलें नाहीं, त्याला तर तिकडे कोणी दादा प्रमाणें कैद करून ठेवला नसेलना ? मला तर त्याची मोठी काळजी लागली आहे.

जाहां०—बरें तर कांहीं दिवस तुह्मीं येथेंच छावणी देऊन व बंदोबस्तानें असा मी नवपुरीकडील नीट व्यवस्था लावून लगेच वीरसिंहासह जलदी येतों.

इकडे वीरसिंहानें नवपुरीवर हल्ला करून तेथील दुर्वीयाच्या फौजेची दाणादाण करून टाकली व शहरांत आपला अंमल बसवून आपण शहराबाहेर दोन कोशावर छावणींत जाऊन राहिला होता. ही बातमी मत्सपुरास एक गुप्त हेराकडून दुर्वीयास कळली, तेव्हां त्यानें तावडतोब कांहीं घोडेस्वार व दुष्ट फितुरी प्रधानापैकीं कांहीं असामीस वीरसिंहावर गुप्त रीतीनें रात्रीचे प्रहरीं हल्ला करून त्यास कैद करून आणण्याची मसलत सांगून त्यांस रवाना केलें, त्यांना नवपुरीस येऊन बाकी राहिलेल्या आपल्या फौजेस जमा करून एके दिवशीं अकस्मात् वीरसिंहाच्या छावणीवर हल्ला करून त्यास बंदीवान केलें, व ते लोक मोठ्या विजयश्रीनें मत्सपुराकडे येत होते तों मार्गांतच त्यांची व जाहांदार याच्या सैन्याची गांठ पडली मग तेथेंच उभयतांची चकमक झडून आपल्या रानटी भिल्ल लोकांनीं त्यांचा अगदीं मोड केला व त्या

दुष्ट प्रधानापैकीं कांहींजणांस धरून कैद केलें आणि वीरसिंहास मोकळा केला मग उभयतां राजपुत्र मोठ्या आनंदानें परस्परास कडकडून भेटले.

( छावणींतील एका तंबूंत दोघे राजपुत्र गोष्टी बोलत बसतात ).

वीरसिंह०--दादा जर आपण ह्या अशा वेळीं आलां नसतां तर ह्या लोकांनीं माझें काय केलें असतें हें सांगवत नाहीं.

जाहां०--करणार काय ? तुझे हाल केले असते दुसरें काय ? पण मी त्यांचें मग मूळही ठेविलें नसतें साफ खणून काढिलें असतें.

हे दोघे गोष्टी करीत बसले असतां दुरून एक स्वार घोडा भरधांव हांकित येत होता हें पाहून पाहाऱ्यावरील शिपायानें आंत वर्दी दिली, तसें ह्या उभयतांचेंही लक्ष्य तेथें लागलें, तो स्वार आल्याबरोबर त्यानें वीरसिंहास मुजरा केला, वीरसिंहानें त्यास ओळखिलें व ह्मणाला-

वीर०--क्यौं जयवतसिंग सुमित्र महाराजकी सवारी आ पोंहोंची है ?

जय०--हांजी सिरकार, कलही शामके वख्त हमारे सब जहाज किनारे पर पौंहुंचे है, सरकारने मुजको आपकी खबर लाने के वास्ते भेजा है ?

वीर०-- ( जाहांदार यास ) दादा ! चला आपण सुमित्र महाराजांस सामोरे जाऊं ?

नंतर जाहांदार व वीरसिंह समुद्र किनाऱ्यावर जाऊन सुमित्रास भेटतात.

सु०--कसें काय वीरसिंहा ठीक आहेना ?

वीर०—वडिलांच्या आशिर्वादानें सुखरूप आहें.

सु०—हेचका ते जाहांदारशहा बदकशानच्या आमि-रांचे पुत्र ?

वीर०—हेच व मी ह्यांस आपल्या वडील बंधुप्रमाणें मानितों व त्यांचीही मजवर इतरांपेक्षां विशेष ममता आहे, ( चंद्रकांताचें स्मरण होऊन ) पण काका साहेब ! बाबांना आपल्याबरोबर आणणार होतेतना ?

सु०—अरे कशास पाहिजे ! इतकेका आपण थोडे आहोंत ! त्यांना उगीच वृद्धापकाळीं श्रम कशास पाहिजेत खुशाल ते आपले तेथें सुखानें आहेत आणखी माझ्या पश्चात तिकडे राज्यकारभार पाहण्यास तरी कोणी पाहिजे किंवा नको माझ्याऐवजीं तेच सर्व कारभार पहात आहेत, येथील सर्व शांतता झाली ह्मणजे येतील.

( इतक्यांत मालती दुर्वीर्याची भावजयी आपल्या कन्यापुत्रासह वीरसिंहाच्या छावणीकडे येते, हुजऱ्या वर्दी देतो तसे त्रिवर्ग तीस सामोरे जातात व आपल्या तंबूंत घेऊन येतात. ती कनातीच्या आंत मर्यादेनें उभी राहते, मुलें वीरसिंहाच्या पायां पडतात तो त्यांस आपल्या शेजारीं बसवितो. )

मालती०—सेवकांस इतका मान देण्याची जरूरी नाहीं.

वीर०—परंतु सांप्रत आह्मींच तुमचे सेवक झालों आहों.

माल०—असें कसें होईल, पूर्वेचा सूर्य कोणी पश्चिमेस उगवला असें ह्मटलें असतां शोभेल ! क्षणभर सूर्य ढगांनीं आच्छादित झाला ह्मणून काय झालें, ढग वितळून गेल्या-वर सूर्य आहे तो आहेच, जरी चंद्रास राहु ग्रासितो व सर्वत्र अंधःकार मय होतें तथापि ग्रहण सुटल्यावर स्व-

मात्रही चंद्राचा प्रकाश कमी पडत नाहीं.

वीर०—असो पण आपलें कां येणें झालें.

माल०—आपलें अभय असलें पाहिजे ह्मणजे सांगतें.

वीर०—त्यांत अभय कशास पाहिजे जें कांहीं सांगणें असेल तें सांगा.

माल०—महाराज आपणास ठाऊक असेल कीं, त्यांनीं ( नवऱ्यानें ) भावोजीस सांगितलें होतें कीं ह्या मुलास गादीवर बसवून आपण सर्व राज्याचा कारभार पहावा, रयतेस ममतेनें वागवावें व महाराजांचा करभार वेळोवेळीं पोंचवून त्यांच्या आज्ञेचें उल्लंघन करूं नये, परंतु त्यांचें सांगणें त्यांजबरोबरच गेलें, उलटें मात्र आमचे हाल मांडले व हे महाराजांच्या विरुद्ध बंड माजवून उलटा आपला कृतघ्नपणा मात्र दाखविला. ( दुःखित होऊन ) महाराज काय सांगावें ह्या माझ्या अज्ञान बालकांस मागें-पुढें तीं कदाचित् आपणांस अडथळा करतील, हा संशय मनांत धरून त्यांस विषप्रयोग करण्यास चुकला नाहीं, परंतु आपल्या चरण कृपेनें तीं जिवंत राहिलीं; माझी त्यानें अशी विटंबना मांडिली होती कीं ती सांगण्यास मला मोठी लाज वाटते कीं हें सांगणें देखील आपलें गृह छिद्रच आहे, कारण आपल्या कुटुंबांतील मनुष्याचें कुलक्षण सांगणें मला ठीक वाटत नाहीं, महाराजांचे व सुशीलेचे देखील त्यांनीं फार हाल केले असें मला कळलें, तर आतां त्या सर्व दुष्ट कृत्यांबद्दल महाराजांपाशीं मी पदर पसरून मागतें कीं, मला ते त्यांजबद्दल क्षमा करतील.

जाहां०—( किंचीत् क्रोधयुक्त होऊन ) बाई साहेब ह्या गोष्टीमध्यें आह्मी कांहींच ऐकणार नाहीं व ही तुमची

शिफारस व्यर्थ आहे, दुष्ट कृत्यें करणारांस जर शिक्षा न होईल तर पृथ्वीवर अनाचार व अनीति पुष्कळ वाढेल, तुम्ही आपणावरूनच अनुभव घ्या कीं, आपण स्वतः त्याची बंधू पत्नी असतां तुमच्या विरुद्ध कारस्थानें करून हाल अपेक्षा करण्यास चुकला नाहीं, मग इतरांची काय कथा! आतां तुमचें हें करणें सुज्ञ मनुष्यास योग्यच आहे व ह्या-बद्दल तुमची प्रशंसाच करणें योग्य आहे, आपणास ठाऊक आहे कीं, चंद्रकांत महाराजांच्या आज्ञेशिवाय आमच्यानें कांहीं एक करवणार नाहीं, तथापि आम्हीं उभयतांनीं कांहीं विचार ठरवून आपल्या पुत्रास गादीवर बसविल्यानें महाराज आम्हांवर विशेष कोपायमान होतील असें आम्हांस वाटत नाहीं. कारण कोणाचेंही राज्य खालसा करून आपल्या राज्यास जोडून टाकण्याचा महाराजांचा हेतु नाहीं. सर्वांनीं आपापलीं राज्यें प्रजेला आनंद होईल अशा रितीनें चालवून सुरक्षित ठेवून शांतिमध्यें वेळ घालवावा व कधीं रक्तपातादि दुष्ट कृत्यें होऊं नये हाच त्यांचा हेतु आहे; त्यांचा स्वभाव कोणत्या प्रकारचा आहे हें आपण जाणतच आहां.

**माल०**—त्यांजविषयीं कांहीं ह्मणणेंच नको. महाराजांचा स्वभाव किती शांत गंभीर दूर दृष्टीचा असून ते दयाभूत कोमल अंतःकरणाचे आहेत, तद्वतच धाकटे महाराज देखील केवळ त्यांचें प्रतिरूपच आहेत.

असो अशा गोष्टी चालत असतां भोजनाच्या तयारीची सूचना होतांच सर्वजण आपापल्या ठिकाणीं गेलीं दुसरे दिवशीं एक दरबार भरून सर्वानुमतें असें ठरलें कीं हें लढाईचें प्रकरण आटोपेपर्यंत हें सर्व असेंच तहकूब ठेवावें

व सर्वत्र शांतता झाल्यावर मालतीच्या मुलास राज्याभिषेक करावा. इकडे मत्सपुराच्या मैदानांत वीरभद्र व मेनकावती, वीरसिंह व जाहांदार याची मार्गप्रतिक्षा करीत मोठ्या सावधगिरीनें राहिलीं होतीं.

नवपुरीचें आपलें राज्य वीरसिंहानें घेतलें व आपल्या सैन्याचा पराभव केला व आपली भावजयी मालती वीरसिंहास जाऊन मिळाली व ते ह्या मत्सपुरावर हल्ला करण्यास येणार आहेत वगैरे हकिकत जासुद द्वारें दुर्वीर्यास कळतांच तो क्रोधानें अगदीं संतप्त होऊन गेला व हिकडून तिकडून सैन्याची जमवाजमव केली व आसपासच्या कांहीं राजांच्या सैन्याचीही मदत त्यास मिळाली ह्याप्रमाणें त्यानें लढाईची कडेकोट तयारी चालविली.

इकडे नवपुरीस वीरसिंहानें सुमित्रास व वाघोजीस व मालतीच्या पक्षाच्या कांहीं सरदारांस नीट बंदोबस्तांत राहण्याचें सांगून आपण व जाहांदार मच्छपुराकडे निघून गेले.

चंद्रकांत जिवंत असून पुन्हां आपला राजा होणार हें ऐकून मत्सपुरांतील लोकांस फार आनंद झाला व बहुतेक लोक सशस्त्र मेनकावतीच्या फौजेस येऊन मिळाले. नंतर वीरसिंहानें एक कचेरी भरली व सर्वानुमत्तें दुर्वीर्यास सामोपचारानें राज्य सोडून जाण्याविषयीं पत्र लिहिलें, परंतु त्या पत्राचें उत्तर त्यानें आपल्या नांवाप्रमाणेंच दिलें कीं, " तुमचें आयुष्य संपलें म्हणून तुह्मीं अशा सिंहास जागृत करून त्याच्या भक्ष्यस्थानीं पडण्यास आलां आहां जर तुह्मांस आपल्या प्राणाची इच्छा असेल तर " यःपलायसजिवती. " करा नाहींतर फुकट मारले जाल. उत्तर

ऐकून जाहांदारादि वीरभद्रास त्याच्या मूर्खत्वाचें हांसें आलें. नंतर वीरसिंहानें एक दरबार भरून सर्वांचे अभिप्राय घेतले, तेव्हां सर्वानुमतें युद्ध करून ह्या दुष्ट व गर्विष्ठ दुर्वीर्याची खोड मोडून टाकण्याचें ठरलें. नंतर जाहांदार पूर्वेच्या दरवाज्यावर उभा राहिला, वीरसिंह दक्षिणेच्या, वीरभद्र पश्चिमेच्या आणि आपली प्रतापी मेनकावती उत्तरेच्या दरवाजावर उभी राहिली. ह्याप्रमाणें चौघांनीं फौज व सरदार वांटून घेऊन एकदम हल्ला केला. दुर्वीर्य देखील आपली फौज घेऊन लढण्यास समोर आला, त्यानें असें केलें कीं दुसऱ्या सर्व दरवाजांवर आपले सरदार व प्रधान यांस पाठविलें व मुख्य सैन्य आपले बरोबर घेऊन एखाद्या चवताळलेल्या वाघाप्रमाणें पूर्व दरवाज्यावर आला, येथें आपले जाहांदारशहा आपल्या रानटी फौजेसह उभे होतेच, उभयतांची बरीच चकामक झडली दुर्वीर्याचें सैन्य अधिक होतें त्यामुळें जाहांदार ह्याचे लोक किंचित् घाबरल्यासारखे दिसले, हें जाहांदार ह्याच्या लक्ष्यांत आल्याबरोबर त्यानें ताबडतोब एक स्वार पाठवून वीरसिंहास आपल्या मदतीस बोलाविलें; वीरसिंह आल्याबरोबर आपले रानटी लोक मोठ्या आवेशानें लढूं लागले तसा दुर्वीर्यानें आपला मोर्चा फिरवून उत्तरेच्या बाजूस गेला, तेथें मेनकावती होतीच तेथेंहि चकामकी होत असतां वीरभद्राची मदत येऊन पोंचली; दुर्वीर्य येथें लढत असतां मागें पूर्व दरवाजावर वीरसिंह आणि जाहांदार यांनीं त्या प्रधानादि मांडलिक राजांचा पराभव करून एकदम शहरांत घुसले व प्रथम किल्ल्यावर आपलें निशाण फडकावलें तशी एकच आरोळी आली कीं शत्रु शहरांत

शिरले. दुर्वीर्यानें पाहिलें कीं, आपण चारीबाजूनें घेरलों आहोंत तसा तो एका किल्ल्याच्या भुयारांत शिरला व तेथून थेट अरण्याचा मार्ग धरिला; त्याच्या मनांतील हेतु असा होता कीं आपल्या पूर्वीच्या राज्याकडे ( नवपुरीवर ) जाऊन तेथून फौज गोळा करून पुन्हां मच्छपुरावर रात्रीचे प्रहरीं हल्ला करावा, परंतु आमच्या वीरसिंहानें तेथें पूर्वींच तयारी करून ठेविली होती, तेथें पोंचल्यावर सुमित्रानें व हिंमतरावानें त्याच्या शिल्लक राहिलेल्या फौजेचा पूर्ण-पणें पराभव करून दुर्वीर्यास व त्याच्या साथीदारांस कैद केलें व त्याच्यासह मच्छपुराचा मार्ग धरिला. इकडे जाहां-दार व वीरसिंह यांनीं दुर्वीर्यास सहाय करणाऱ्या मांडलिक राजादी त्या दुष्ट प्रधानाचा अगदीं मोड करून त्यास कि-ल्ल्यांतच कैद केलें. शहरांतील लोकांस मुळींच दुखविलें नाहीं; पुन्हां चंद्रकांत आपला राजा झाला हें ऐकून शह-रवासी लोकांस फार आनंद झाला. कांहीं दिवसांनीं हें राजकुटुंब एकत्र झालें, मेनकावतीनें सुशिलेस बोला-वून आणलें. नंतर एके दिवशीं प्रभातकाळीं सुमुहुर्त पाहून चंद्रकांत, मेनकावती, वीरसिंह, सुशिला, जाहांदार, वीरभद्र, सुमित्र, हिंमतराव, वाघोजी वगैरे मोठ्या आनं-दानें शहरांत शिरले शहरांत जिकडे तिकडे रोषनाई केली होती. जिकडे तिकडे नाचरंग, कथाकिर्तनें सुरू होतीं. चंद्रकांत व मेनकावती हत्तीच्या अंबारींत बसलीं होतीं. पुढच्या बाजूस वीरसिंह व जाहांदार आदिकरून सर्वजण घोड्यावर बसले होते. स्वारी मोठ्या थाटानें जात होती सर्वांवर पुष्पांचा वर्षाव होत होता, इतक्यांत चंद्र-कांताच्या पुर्वीच्या अष्टप्रधानापैकीं एका दुष्टानें दबून

राहून वीरसिंहास गोळी सोडली, तेव्हां एकच हाहाःकार झाला, वीरसिंहास गोळी न लागतां जाहांदार ह्याच्या स्कंधास किंचित् इजा झाली. तसेच ते सर्वजण हा कोण दुष्ट आहे हें पाहण्याकरितां जेथून गोळी आली तेथें धांवले तों तो निमकहराम पळत असतां जाहांदारानें त्याजवर पिस्तुलाचा बार करून त्याचा पाय जखमी केला तसा तो तेथेंच अडकून पडला, ह्या दुष्टानें आपणास कोणी ओळखू नये एतदर्थ सर्व शरिरास एक प्रकारचा रंग लाविला होता, डोक्याचे केंस वाढविले होते व मिशा काढून टाकल्या होत्या. नंतर त्यास कैद करून स्वारीच्यापुढें चालविला असतां कोणी त्याच्या तोंडांत मारीत कोणी शेण दगड मारीत कोणी लाथ मारीत असे त्याचे फार हाल केले, स्वारी मोठ्या आनंदानें राजवाड्यांत शिरली, जिकडे तिकडे तोफांची सरबती झाली, मग एक मोठा दरबार भरून सर्वांस नजर नजराणे इनामें वगैरे देऊन कचेरी बरखास्त केली. पुढें कांहीं दिवसांनीं वीरभद्रानें शहारांत दौंडी पिटून कळविलें कीं दुर्वीर्यादि अष्ट प्रधानाचा न्याय होणार आहे तर सर्वांनीं कचेरींत येण्याची तस्दी घ्यावी. दोन प्रहरीं मोठी टोलेजंग कचेरी भरली, ही गम्मत पाहण्याकरितां शहरवासी लोकांची एकच गर्दी झाली, नंतर जिकडे तिकडे स्वस्थता झाल्यावर न्याय करण्यास सुरवात झाली, सर्व कैद्यांस आणून कचेरींत उभे केले.

जाहां०—समस्त मंडळीस माझी विनयपूर्वक प्रार्थना आहे कीं, कोणी ही गलबला न करितां आपल्या दुर्वीर्य महाराजांची व आपल्या पूर्वीच्या अष्ट प्रधानादिकांची

हकिकत सांगतों तिकडे सर्वांचें लक्ष्य असावें. दुर्वीर्य हे नवपुरी येथील स्वर्गवासी विजयदत्त महाराजांचे कनीष्ठ बंधु आहेत, विजयदत्त महाराजांचा स्वभाव किती शांततेचा व दूरदृष्टीचा होता हें त्यांच्या कारकिर्दीच्या वेळीं ते किती प्रजाप्रिय होते हें सर्वांस ठाऊक आहेच, वेळोवेळीं चंद्रकांत महाराजांची खंडणी देऊन त्यांनी कधींही त्यांच्या आज्ञेचें उल्लंघन केलें नाहीं. परंतु त्याच्या पाठीमागें ह्या राजश्रींनीं त्यांच्या मुलाचा हक्क असून आणखी विजयदत्त महाराजानींही मरतेसमयींही मुलगा ह्यांच्या स्वाधीन करून सांगितलें कीं "हा मुलगा आतां तुझा आहे, आतांपासून तूं ह्याचा पिता आहेस मुलास फक्त नांवाचा मात्र गादीवर ठेवून सर्व कारभारांत दक्षता ठेव, प्रजेवर जुलूम होऊं देऊं नको, चंद्रकांत महाराजाची खंडणी वेळोवेळीं पोंचवून त्यांच्या आज्ञेंत राहात जा, ती ( स्त्री ) गरोदर आहे ह्मणून तीस सहगमन करण्यास देऊं नको, माझ्या पाठीमागें तिचें व ह्या मुलांचें संरक्षण करणारा तुजवांचून इतर कोणी नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव" ( दुःखानें ) "इनशांहल्लाह त्यांचा आत्मा स्वर्गांत सुखी ठेवा" ( रागानें ) परंतु ह्या दुष्टानें त्या वेळेसच मात्र डोकें हालवून होय होय असें ह्मटलें व त्यांस स्वर्गस्थ होऊन दोन महिनेही झाले नसतील तों आपलीं कारस्थानें सुरू केलीं, ह्या अज्ञान बालकांस विष देऊन मारून टाकण्याचा प्रयत्न केला, आणि त्यांच्या आईची विटंबना करण्यासही चुकला नाहीं. ह्याच दुष्टामुळें आपल्या वीरसिंहास डोक्यावर बिछाना घेऊन अन्नपाण्याशिवाय उन्हांतून तळतळत जावें लागलें; ह्याच चांडा-

ह्यामुळें आपल्या मेनकावती ताईस अन्नपाण्याशिवाय कडे-वर मूल घेऊन ज्याप्रमाणें एकाद्या गरीब गाईच्या मागें व्याघ्र लागतो त्याप्रमाणें कावरी बावरी होऊन अरण्यांतून धांवावें लागे व एकादी ठेंच लागून मूर्छित पडून रहावें लागे; अशा स्थितींत जवळ कोणीही नसल्यामुळें त्या सोमकांतानें ह्मणावें " आई उतनाग बाबाकले जाऊं " हे शब्द ऐकून त्या बिचारीचें ह्रदय तटतटां तुटत असे, कारण ह्या दुष्टांनीं एके रात्रीं सर्वांस कांहीं अंमल खाऊ घालून रात्रीचे प्रहरीं महाराजाचा कडेलोट केला होता पण जेथें ईश्वर रक्षण करणारा आहे तेथें अशा मर्कटापासून काय होणार आहे ! असो पुढें अनेक संकटें सोसून सर्वजणें सेनापति साहेब वीरभद्र यांचे येथें एकत्र जमलीं, तेथें पूर्व संकेताप्रमाणें वीरभद्रानीं आपली कन्या सुशिला हिजबरोबर आपल्या वीरसिंहाचा विवाह केला; तेथें तरी कांहीं दिवस सुखानें जावयाचे होते पण हे यमस्वरूपी तेथेंही पोंचले व त्यांच्या लग्नांत विघ्न करून सर्वांची दाणादाण केली, मी परकीय असतां माझे देखील हाल करण्यास हे चुकले नाहींत. वरातींतून सर्वांच्या तोंडांत बोळे देऊन व हात पाय बांधून येथें आणून कैदेंत टाकलें, मी मात्र एकटा निसटून गेलों. बरें ह्याचे चिरंजीव तरी चांगले असावे ते तर ह्यांहीपेक्षां दहा गुणांनीं अधिक ! ! बिचाऱ्या सुशिलेचे का थोडे हाल केले मस्त पोळाप्रमाणें तिच्या पाठीं लागला होता, लाथा बुक्यांनीं तर तिला अर्धी मेली केली; इतक्यानें संतुष्ट न होऊन वीरसिंहास तिच्याहून निराळा करून वेशीवर टार मारण्याचा बेत केला, तिनें आपणास वश्य व्हावें

ह्मणून तिची अनेक प्रकारें विटंबना केली, परंतु ती पोरी सुपतिव्रता असून दृढ निश्चयी पडली तेथें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. शेवटीं आपणच पापाचा घट भरल्यामुळें प्राणास मुकला. आतां आपण ह्या कृतघ्न मंडळीकडे वळूं. हे आपल्या महाराजांचे अष्ट प्रधान जसे गृहाच्या स्तंभ असतात तसे, चतूर, ज्ञानी, राज्य कारभारदक्ष, महाराजांचा ह्यांवर पूर्ण विश्वास, असें असतां बे इमान होऊन दुर्वीर्यास जाऊन मिळाले व आपला निमकहरा-मपणा दाखविला. ह्या सर्व अपराधाचें कारण ह्मणजे हे चांडाळ आहेत, ह्यांनीं जर महाराजांस निष्कापट्यानें सहाय केलें असतें तर दुर्वीर्य तर काय परंतु एकाद्या बलाढ्य राजाची ह्या शहरावर नजर ठेवण्याची शिशाद नव्हती, परंतु हे घरचेच भेदी पडले मग त्या परिणामा-विषयीं काय पुसावें !! ह्या दुष्टांनीं शहरांतील अनेक स्त्रियांचीं पातिव्रतें भंग केलीं, कित्येकांवर जुलूम केले, कित्येकांच्या स्त्रिया भ्रष्ट केल्या कित्येकांचे तर निरपराधी प्राणही घेतले, व कित्येकांस लुटलें ह्याप्रमाणें मी सारांश रूपानें सर्वांची हकिकत सांगितली, आतां ह्या अपराध्यांस शिक्षा करणें ती, महाराज आहेत, न्यायाधिश आहेत व रय्यत आहे पाहिजे तर शिक्षा करा नाहीं तर सोडून द्या.

लोक०—नाहीं नाहीं शिक्षा झालीच पाहिजे, नाहीं तर असेच उद्यां दुसरे करतील व लोकांत दहशत राहणार नाहीं.

चद्रकांत०— ( न्यायाधीशास ) आपला कसा काय विचार आहे.

न्या०—माझा विचार कसचा महाराज, परंतु न्यायाप्रमाणें

पाहिलें असतां अशा मनुष्यांस देहांत शिक्षा केली पाहिजे व अशांचीं बायका पोरेंदेखील बियांस ठेवूं नये कारण न जाणो पुढेंमागें तीं आपल्या वडिलांचा सूड घेण्याचा प्रयत्न करतील, ह्मणून अशांस शिक्षा करणें ती देखील एक मोठा चर खणून त्यांत खैराचीं लांकडें घालून अग्नी प्रदिप्त करावा व त्या खाचीमध्यें त्यांस लोटून वरून पाषाणाचा मारा करावा व ह्यांचीं घरेंदारें लुटवून तेथें नागर फिरवावा.

**लोक०**—बरोबर आहे असेंच केलें पाहिजे, ठीक आहे असेंच झालें पाहिजे.

**वीरसिंह०**—( उभा राहून ) परंतु आतां माझी सर्वांस हात जोडून विनंती इतकीच आहे कीं, जरी हे अपराधी असून ह्यांस शिक्षा करणें योग्य आहे तथापि मला वाटतें कीं त्यांवर कांहीं तरी कृपादृष्टीनें सर्वांनीं पहावें. एका अर्थानें पाहिलें असतां सर्वांस ह्यांनीं फार दुःख दिलें आहे त्यांतही आह्मां उभय स्त्रीपुरुषांचे ह्यांनीं असे हाल केले व दुःख दिलें आहे कीं, त्याबद्दल मला ह्यांचाबरोबर रीतीनें सूड घेतां येईल असे हे सांप्रत अटकेंत आले आहेत.

**लोक०**—( मध्येंच ) सूड घ्यावा सूड घ्यावा कधीं सोडूं नये.

**वीरसिंह०**—तथापि आपण विचार कराल तर पहा कीं, हें मानवी शरीर पुन्हां पुन्हां येत नसतें, आह्मांस जीं संकटें भोगणें होतीं तीं तर आह्मीं भोगून चुकलों मग ह्या बिचाऱ्यांच्या जिवाची हानी करून आपणास काय मिळणार आहे ? दुसरे, अपराध त्यांनीं केले मग ह्यांच्या बा-

यका मुलांकडें काय दोष आहे ? सर्व साक्षी परमेश्वर आहे तो ह्यांच्या अपराधांबद्दल ह्यांस शिक्षा करीलच ह्मणून मला वाटतें कीं, ह्यांस देहांत शिक्षा न देतां ह्यांनीं आपल्या राज्याच्या बाहेर दक्षिणेकडे समुद्रांत एक बेट आहे तेथें आपल्या परिवारासह जाऊन बसावें. तेथें इच्छेस येईल तो धंदा रोजगार करावा, व येथें पुन्हां कधींही येऊं नये, एक वर्षाच्या बेगमी पुरती सर्व सामुग्री आह्मीं ह्यांस पुरवूं पुढें मग ह्यांनीं आपापलें पाहून घ्यावें.

लोक.—शाबास ! शाबास ! ! किती दयाळू स्वभावहा !

वीरसिंह.—( हात जोडून ) महाराज ! ही सर्व बुद्धि ( जाहांदराकडे हात करून ) दादांची आहे मी केवळ पोपटाप्रमाणें शिकविलेला आहे. ह्यांचे मजवर इतके उपकार झाले आहेत कीं, मी ह्यांचा गुलाम होऊन राहिलों तरी देखील फिटणार नाहींत.

चंद्रकांत.—आज जो मी हा राज्यावर आलों तो ह्याच पुरुषामुळें, ह्यानें सर्वांचें संरक्षण करून मोठ्या पराक्रमानें हें आपलें राज्य पुन्हां मिळविलें, नाहींतर दुर्वियोदिकांनीं आह्मां सर्वांस कधींच स्वर्गसुख घेण्यास पाठविलें असतें, केवळ त्याचेच मजवर महान उपकार झाले आहेत असें नाहीं, परंतु ह्याच्या आईचे देखील मजवर मोठे उपकार आहेत. तिनें देखील एका आणिबाणीच्या प्रसंगी माझे प्राण रक्षण केले आहेत.

जाहां०—परस्परांनीं एकमेकांस सहाय्य करावें हा मानवी धर्मच आहे त्यापेक्षां म्यां कांहींच अधिक केलें नाहीं; उलट तुमचेच मजवर महदुपकार आहेत कीं, हा काळपर्यंत तुह्मीं माझें संरक्षण केलेंत व पुढें विरूपाचे

हातून आमचें राज्य सोडवून देण्याची मदत कराल ते उपकार मग का थोडे होतील ?

वीरभद्र.–असो सर्वांपेक्षां मजवर मात्र सर्वांचे उपकार अधिक झाले आहेत त्याबद्दल मी त्यांचा ऋणा उतराई होईन तें होवो.

वीरसिंह.–एकदां दुर्दैव फिरलें ह्मणजे सर्वत्र फिरत असतें. जेव्हां आह्मी सर्व देशोधडी लागलों तेव्हां सुमित्रकाकांच्या राज्याकडे गेलों. म्यां तर लुटण्याचा नीच धंदा आरंभिला होता. कारण मी त्या चोरांच्या मंडळींत अडकून पडलों होतों, बाबा जहाजांतून बुडतां बुडतां किनाऱ्यास लागले. पुढें शहराकडे येत असतां रात्रीचे प्रहरीं चोरट्यांची गांठ पडली त्यांजबरोबर झटापटी होऊन त्यांस स्वर्गास पोंचविलें पुढें तो चोरीचा सर्व माल ज्याचा त्यास द्यावा ह्या हेतूनें शहरांत शिरतांच शिपायांनीं हाच चोर असें समजून त्यांस धरिलें. बरें पुढें राजेसाहेबांनीं तरीं कांहीं चौकशी करावी ती न करितां एकदम फांशी देण्याचा हुकूम केला, बरें झालें कीं, आह्मींही सर्वजण तिकडे गेलों होतों, नाहींतर मोठा अनर्थ झाला असता.

सुमित्र०–बा वीरसिंहा ! असें तमचें होऊन तुह्मी तेथें याल असें माझ्या स्वप्नीं तरीं होतें काय ?

वीरसिंह०–मी त्याबद्दल तुह्मांस तादृशही दोष देत नाहीं, ही तर आह्मी आमच्या दुर्दैवाची हकिकत सांगितली. नंतर दुर्वीर्यादि अष्ट प्रधानांस त्यांच्या मुलांबाळांसह जहाजांत बसवून त्या बेटांत नेऊन सोडिलें पुढें सुमित्राचा मोठा मान करून त्यास नजरनजराणा देऊन चंद्रकांतानें त्याची बोळवण केली. नंतर जाहांदाराचेही

फार आभार मानून त्याचा मोठा मान केला व त्यास त्याच्या आईस व पित्यास मोठा नजरनजराणा देऊन बरोबर फौज दिली. मग जाहांदार यानें मेनकावती, वीरभद्र इत्यादिकांस भेटून चंद्रकांताचा निरोप घेतला. वीरसिंह हिंमतराव, वाघोजी, ह्यांस जाहांदारानें आपणाबरोबर घेतलें होतें. वीरसिंहानें मार्गांतील बहुतेक राजांपासून खंडणी घेतली मग २७ वे दिवशीं बदकशानचे मैदानांत सुखरूप येऊन पोंचले जाहांदार यानें एक खलिता लिहून आपल्या हुजऱ्याबरोबर विरूपाक्षास पाठविला, त्यांत लिहिलें होतें कीं, आमचे आईबाप व राज्य आमच्या स्वाधीन करावें नाहींतर युद्धास तयार व्हावें. विरूपाक्षानें तें पत्र पाहतांच लागलाच शहाजमानाच्या महालांत गेला व चंद्रप्रभेस व शहाजमानास सांगितलें कीं, आपला पुत्र मोठी फौज घेऊन आला आहे. हें ऐकून त्यांस मोठा आनंद झाला. नंतर सर्वजणें त्यास सामोरी गेलीं, विरूपाक्षानें आपले हात बांधिले होते. शहाजमानास पाहतांक्षणीं वीरसिंह व जाहांदार घोड्यावरून खालीं उतरले पिता पुत्र आनंदानें भेटले, शहाजमानानें वीरसिंहासही आलिंगन दिलें; नंतर चंद्रकांत महाराजादिकांचें कुशल वृत्त विचारिलें. विरूपाक्ष एका बाजूस उभा होता त्याजवर जाहांदार याची नजर पोंचतांच तरवार उपसून त्याच्या आंगावर धांवला, तसें त्यानें आपलें मस्तक पुढें केलें, इतक्यांत शहाजमानानें त्याचा हात धरून त्यास प्रतिबंध केला व ह्मणाला ! बाळा ! हा विरूपाक्ष आपला निमक हलाल सरदार आहे हा होता ह्मणून आपलें राज्य राहिलें नाहींतर कधींच गेलें असतें. तूं प्रवासास गेल्यावर लागलीच

येथें आसपास बंडें उत्पन्न झालीं. तेव्हां ह्यानें आह्मास जसे कैद केल्याप्रमाणें गुप्त रीतिनें लपवून ठेविलें व त्या बंडवाल्यांस सामील झाला व त्यापैकीं कांहींजणांस आपल्या राज्यांत मोठमोठ्या हुद्यावर ठेऊन युक्तीनें शांतता झाल्यावर त्या सर्वांची नीट खबर घेतली नाहीं तर त्या बंडवाल्यापैकीं एकाद्यानें आह्मांस मोठ्या पंथासही लावलें असतें; हा विरूपाक्ष होता ह्मणूनच आमचा व आपल्या राजाचा बचाव झाला.

**जाहां०**—तर मग आज मजपासून मोठा अन्याय घडणार होता. ( विरूपाक्षासमोर गुडघे टेंकून ) मला आतां आपण अपराधाची क्षमा करावी.

**विरू०**—छी ! छी ! ! उलट मीच आपणाजवळ क्षमा मागतों कीं, मजमुळें आपणांस असा अरण्यवास काढावा लागला.

**वीरसिं०**—असो जें झालें तें झालें, चला आतां शहरांत जाऊं.

मग सर्वजण घोड्यावर बसून शहरांत गेले. जाहांदार आला ही बातमी शहरांत पसरतांच शहरवासी लोकांस मोठा आनंद होऊन एकत्र जमले व त्यास सामोरे गेले. राजवाड्यांत स्वारी पोंहचतांच प्रथम जाहांदारानें आपल्या आईची भेट घेतली, **रोशन जेहल** हिनें त्याचें मुख कुरवाळिलें व ह्मणाली बाबा, असा आह्मांस वृद्धापकाळीं टाकून जाऊं नको, आह्मांस राज्यवैभवाची कांहींच जरूर नाहीं, तूं जवळ असलास ह्मणजे आह्मांस मोठा संतोष आहे. नंतर जाहांदार यानें वीरसिंहाची आपल्या आईशीं ओळख करून दिली; तेव्हां चंद्रप्रभेनें

वीरसिंहासही आलिंगन दिलें व विचारिलें चंद्रकांतदादा व मेनकावतीबाई सुखरूप आहेतना ? वीरसिंहानें उत्तर दिलें, बाबांनीं आपणांस आशिर्वाद दिला आहे व आईनें आपणांस ही वस्तु ( मोत्यांची माला ) स्विकारण्याविषयीं विनंती केली आहे, बाबांचें तुह्मी संकटसमयीं संरक्षण केलें त्याबद्दल आईनें तुमचे फार फार अभार मानिले आहेत; दादांचे तर आह्मांवर फार उपकार झाले आहेत, आईनें दुसरी आपणास इतकी विनंती केली आहे कीं, आपणास फुरसत असल्यास एकदां मत्सपुरास येण्याची तसदी घ्यावी.

पुढें कांहीं दिवसांनीं शहाजमानानें जाहांदार यास गादीवर बसविलें व जिकडे तिकडे त्याच्या नांवाची द्वाही फिरविली, शहरांत जिकडे तिकडे उत्साह सुरू झाला, पुढें एके दिवशीं जाहांदार व वीरसिंह हत्तीच्या अंबारींत बसून सर्व शहरांत फिरले. शहरवासी लोकांनीं पुष्पांचा वर्षाव करून आपला आनंद प्रदर्शित केला. पुढें कांहीं दिवसांनीं वीरसिंह व जाहांदार हे दोघे मोठी फौज घेऊन निघाले व जिकडे तिकडे आपला अम्मल बसविला व खंडणी घेतली. नंतर नवपुरीस येऊन पोंचलें तेथें मालतीच्या पुत्रास तेथील गादीवर बसवून हिंमतराव व बाघोजी वगैरेस मोठें इनाम दिलें व त्यांचे फार फार आभार मानिले तसेंच सर्व भिल्लांसही त्यांच्या दर्जाप्रमाणें इनामें देऊन सर्वांस एक मेजवानी दिली. नंतर निरोप दिला. जातांना त्यांस इतकेंच सुचविलें कीं, पुढें कदाचित् मला तुमची जरुरी लागल्यास मी तुह्मांस कळवीन, तेव्हां हजर असा ह्मणजे झालें. नंतर वीरसिंहासही मत्सपुरास

पाठविलें व आपण वेश पालटून नूरमहिताब हिच्या राज्याकडे निघून गेला.

जाहांदार फिरत जात असतां समर्कंद शहरास गेला, तेथील बादशहाचा पुत्र माहमूदशहा हा प्रीतीच्या पाशामुळें अगदीं बेहोश होऊन बिछान्यावर पडला होता. त्याच्या बापानें अनेक देशींचे वैद्य, जादुगीर वगैरे आणले होते, परंतु कोणाच्याही हातून त्यास गुण आला नव्हता व शहाजादा दिवसेंदिवस अगदींच अशक्त होत चालला. जाहांदार शहरांत पोंचतांच त्यास सर्व लोक दुःखी व चिंतातुर दिसले, त्यामुळें एका दोघांस ह्याचें कारण विचारल्यावरून त्यांनीं राजपुत्राची सर्व हकिकत त्यास सांगितली, कीं येथील राजपुत्राच्या स्त्रीस एका महान जादुगिरानें पळवून उत्तरेच्या दिशेकडे नेली आहे व तेथें जाऊन तिला त्याजपासून सोडवून आणणें हें मोठें धोक्याचें काम आहे; कित्येक बिचारे धैर्यवान अर्ध राज्य मिळण्याच्या आशेनें गेले, परंतु गोवर्धन शहरापर्यंतच त्यांची मजल **पोंचली** पुढें त्यांच्यानें जाववलें नाहीं. कारण तेथील रखवालदार राक्षसानें त्यांस आपल्या उदरांत अक्षय राहण्याची जागा दिली.. जाहांदारासही सर्व हकिकत समजतांच तो आपल्या बिऱ्हाडीं गेला व आपला पोषाक बदलून हकीम (वैद्य) बनला व राजवाड्याकडे गेला; तेथें पोंचतांच बादशहानें त्याचा फार सत्कार केला, व मोठा श्वास टाकून ह्मणाला, बाबा तुझ्या तरी हातास यश येवो.

**जहां०**—सरकार, फार तर काय परंतु शहाजादा सर्व राज्यकारभार पाहून आपणास विश्रांती देऊं लागला

मग तर तुमची खात्री होईल किंवा नाहीं ?

बाद०—अहाहा ! मग तर मजसारखा भाग्यवान कोणीच मिळणार नाहीं व मजसह माझ्या सर्व कुटुंबास व रयतेस जिवित्व दिल्याचें मी आपले आभार मानीन व यावत् जीव आह्मीं सर्वजण आपले ताबेदार सेवक बनून राहूं.

जाहां०—छी ! छी ! असें भाषण आपण करूं नये. मी आपल्या चरणाचा दास आहें.

नंतर एक हुजऱ्या आला व त्यानें जाहांदार यास ज्या दिवाणखान्यांत माहमूदशहा निजला होता तेथें नेलें. इकडे माहमूदशहा आपल्या प्रियेचें स्मरण करून शोक करीत पडला होता, त्याचेजवळ जाहांदार जाऊन बसला व त्याचीं सर्व चिन्हें पाहून समजला कीं, ह्यास प्रीतीचें वेड फार लागलें आहे, नंतर हळूच त्याचे कानाशीं आपलें तोंड करून त्यास हाक मारिली व ह्मणाला, माहमुदशहा उठून बैस तुला मी "**नूरजहान**" हिची हकिकत सांगतों. नूरजहान हिचें नांव काढतांक्षणीच माहमूदशहानें आपले डोळे उघडले व त्यास उठवत नव्हतें तरी त्यानें जाहांदारास आपला हात धरून उठविण्याविषयीं सुचविलें तसा त्यानें त्याचा हात धरून त्यास लोडाशीं टेकून बसविला. नंतर त्यास विचारिलें कीं, तूं असा बेहोश होऊन कां पडून राहिलास व स्त्रीकरितां त्वां आपलें खाणेपिणें ऐषआराम सोडून दिलेंस हें तुजसारख्यास योग्य नाहीं स्त्रियांचा काय भरंवसा ! ज्या स्त्रीकरितां तूं इतका शोक करितोस त्याच स्त्रीचें जर ज्यानें तीस नेली आहे त्याजवर प्रेम असलें तर ?

माह०—छी ! छी ! हकीम साहेब ( जाहांदार यास

राजपुत्र असें न ओळखून ) अशी गोष्ट कधींही होणार नाहीं. कारण माझ्या महालावर त्यांतही अगाशीवर माझ्या हुकुमाशिवाय मनुष्य तर काय परंतु पक्षीही जाण्याची पुण्याई नव्हती, आणखी माझी स्त्री पतिव्रता असून तिची मला पूर्ण खात्री आहे, आमची उभयतांची अत्यंत प्रीति आहे. आह्मीं उभयतां परस्परांस क्षणभर ही विसंबत नव्हतों. एके दिवशीं सायंकाळीं ती अगाशींत हवा खात बसली असतां एकाएकीं तिला कोणीं अदृश्य रीतीनें आकाश मार्गानें उचलून नेली. तिला नेली हें घरांत कोणासही प्रथम कळलें नाहीं. परंतु जेव्हां तिनें मोठ्यानें किंकाळी फोडून ह्मटलें कीं, " धांवा मला कोणी हा दुष्ट पळवून नेत आहे." तसे सर्व लोक धांवले व पाहतात तों तो दुष्ट तिला नेत होता हें दिसलें तसा सर्वांनीं मोठा हाहाःकार केला, त्यावेळीं मीं शहरांत फिरावयास गेलों होतों तेथें एक स्वार घोडा भरधांव टाकीत आला व मला ही सर्व हकिकत सांगितली, ती ऐकतांक्षणींच मी मूर्छागत् होऊन घोड्यावरून खालीं पडलों. तेथून मला पालखींत घालून आणलें व ह्या बिछान्यावर निजविलें त्या दिवसापासून असा मी निजलेलाच आहें आज मात्र आपण तिची हकिकत काय सांगणार आहां ती ऐकेन व तुह्मांकडून कांहीं प्रयत्न झाल्यास तुह्मीं मला ह्या दुःखांतून सोडवा, नाहींतर मी असाच तिची आठवण करून शोकांत निमग्न होईन व एके दिवशीं ह्यांतच माझें देहावसानही होईल.

**जाहां०**—शाबास ! एकंदरींत आपण आपला अमोलीक प्राण स्त्रीकरितां व्यर्थ घालविणारनां ? असें करूं

नको हा मानवीदेह वारंवार येत नाहीं. ह्मणून हिंमत धर व अल्लाताल्लाचें सहाय्य माग ह्मणजे तुझी इच्छा पूर्ण होईल, कारण ह्मण आहे कीं " हिंमते मर्दा मद्दे खुद्दा" पुरुषानें हिंमत केली कीं, ईश्वराची मदत आहेच; तर आतां तूं मी सांगतों तसें कर तुझ्या स्त्रीचें ठिकाण लागलें आहे व ती कोठें आहे तेंहीं मला ठाऊक आहे परंतु त्या मार्गांत फार संकटें आहेत तेथें तुझ्या सारख्याच्यानें जाववणार नाहीं ह्मणून मी तुझ्या स्त्रीस त्या जादुगिरापासून सोडवून आणीन व तुझ्या स्वाधीन करीन हें तूं पक्कें ध्यानांत ठेव व मी येईपर्यंत तूं आपल्या वृद्ध मातापित्यास सुख दे, असा पडून राहून त्यांच्या अंतःकरणास दुःख देऊं नको. पूर्वीप्रमाणें खा पी राज्यकारभार पहा ह्मणजे मलाही यश येऊन त्यांचे अंतःकरणासहीं आनंद होईल. वरें तूं असाच शोक करीत राहिलास तर ती पुनः तुझ्या दृष्टीस न पडतां! शरिरास मात्र त्रास होईल दुसरें कांहीं नाहीं. आतां तुला माझ्या ह्या सर्व भाषणाचा संशय येत असेल तर मी आपलें नांवगांव तुला सांगतों. ( वेश पालटून ) माहमूदशहा, जसा तूं प्रीतिपाशांत गुंतलेला आहेस तसा मी देखील आहें. मी बदकशानच्या अमिराचा पुत्र जाहांदार आहें, उत्तरेच्या बाजूस एका गुहेंतून जी सतत् ज्वाला निघते हें काय आहे त्याचा शोध लावण्याकरितां मी जात आहें, कारण बोखारा शहरच्या बादशाहानें जो त्या गुहेचा शोध लावील त्यास आपली कन्या नुरमहिताब देण्याचा पण केला आहे व त्या स्त्रीवर माझी प्रीति जडलेली आहे.

माह०—क्षमा असावी मी आपणास न ओळखून

आपण हकीम ( वैद्य ) आहां असेंच समजत होतों.

**हुमायून०**—( माहमुदशाहाचा पिता )—दोघेजण गोष्टी बोलत सुखानें बसले आहेत असें पाहून आश्चर्यानें ! ( जाहांदार यांस ) हकीम साहेब कोठें गेले व हे कोण बसले आहेत.

**माहा०**—बाबा बदकशानच्या अमिराचे हे फर्जंद जाहांदारशहा आहेत हकिमाचा वेश घेऊन आले होते ते हेच व ह्यांच्याच औषधानें मला गूण येऊन आतां मी बरा झालों

**हुमा०**-( गुडगे टेंकून ) इनशाहअल्ला ! मी आपला फार आभारी झालों आहें. आपल्या येण्यानेंच माझ्या ह्या पुत्रास आराम झाला तर माझी इतकीच विनंती आहे कीं, आपण कांहीं दिवस येथें मुक्काम करावा.

**जाहां०**—ठीक आहे जशी आपली आज्ञा.

नंतर कांहीं दिवस तेथें जाहांदार राहिला व एके दिवशीं हुमायूनशहाची रजा घेऊन आपल्या कार्यास जावयास निघाला, जातांना माहमुदशाहास सुचविलें कीं तूं कांहीं चिंता करूं नको नूरजहान हिची भेट तुला करून देईन व तूं सदाव्रत घालून अतीथ अंध पंगू ह्यांस साहाय करीत जा. आपला राज्यकारभार पाहत जा आपल्या पित्यास विश्रांती दे, आतां मी जातों.

**माह०**—( जाहांदारास भेटून ) आपण तर आपल्या कार्यास जाता परंतु ह्या गरीब मित्राची मनांत आठवण मात्र असूंद्या ह्मणजे झालें.

**जाहां०**—बा जरी मी आपल्या कार्यास जात आहें, तरी माझ्या कामांत तुझेंही काम करून येईन व नूरजहान

हिची तुला भेट करून देईन, ह्याविषयीं पाहिजे तर हें घे माझें वचन.

**माह०**—वचन कशास पाहिजे ? आपण सत्य भाषणी आहां ह्याविषयीं माझी पूर्ण खात्री आहे, माझी आपणास विनंती इतकीच आहे कीं, आपण परत फिराल त्यावेळीं प्रथम येथून यावें, कारण आतां मी पूर्वीप्रमाणें पडून राहण्याच्या ऐवजी आपण सांगितलें आहे त्याप्रमाणें वागतों.

**जाहां०**—ठीक आहे, बरें तर आतां रजा घेतों.

( जाहांदार हा नूरमहिताब हिच्या महालाजवळ फिरत असतां त्याला नूरमहिताब हिची एक दासी भेटते तिच्याजवळ एक पत्र व खुणेकरितां हातांतील मुद्रिका ( आंगठी ) देतो. )

**नूरम०**—( दासी पत्र आणून देते तें जाहांदार याचें ओळखून त्याचें चुंबन घेते व तें फोडून वाचूं लागते )

प्रिय शहाजादी नूरमहिताब यांस,

वि० वि० कळविण्यांत येतें कीं, आपल्या भेटीरूप चंद्राचें दर्शन घेण्याकरितां हा चकोर काळोखी रात्र जाऊन कधीं चांदणें पडेल व चंद्रदर्शन होईल ह्याची वाट पहात आहे.

आपलें दर्शन इच्छिणारा,

**जाहांदर.**

**नूर०**—( पत्रवाचून ) वाहवा ! एकंदरीत पत्र लिहिण्याची खुबी खरी ( दासीस हाक मारित ) अग सखीना, कलमदान ! येथें घेऊन ये पाहूं !

**दासी०**—जी सरकार साहेब ! आणते. ( आणून देते. )

( नूरहिताब पत्र लिहूं लागते. )

प्रिय बदकशानचे अमीर यांस,

चरणारविंदीं प्रणिपात करून ही दासी कळविण्याची रजा घेते कीं, " ह्या चातकीच्या आपसरेलेल्या मुखांत आपल्या दर्शनरूप मेघबिंदुची वृष्टि होऊन पडेल तर आणखी काय पाहिजे ! दुसरी विनंती करण्यांत येते कीं, आपण जवाहिऱ्याचा पोषाक करून माझ्या माहालांत बेलाशक यावें, मी आपल्या भेटीची सर्व तजवीज करून ठेवितें. आतां अन्य पोषाकानें बोलाविलें याचा मनांत कांहींच रोष बाळगूं नये, कारण आपण जाणतच आहां कीं, आपल्या लोकांच्या रिवाजाप्रमाणें परपुरुषास जनानखान्यांत जाण्याची अगदीं मनाई असते. कळावें हीच विनंती.

आपली नम्र दासी,

**नूरमहिताब.**

पत्र लिहिल्यावर तें बंद करून एका दासीजवळ जाहांदर यास देण्याकरितां देते. )

( दासी जाहांदार याच्या मुक्कामावर जाते–तेथें जाहांदार याच्या हुजऱ्याची **गांठ पडते त्यास शहाजादा कोठें** आहे ह्मणून विचारिते )

हु०–आप काहांसे आये हो और शहाजादेकों मिलनेका क्या काम है सो कहो तो मैं जाकर आपके मुलाकातकेवास्ते शहाजादेकों अर्ज करूं ?

**दासी**०–शहाजादेकों कहो के आपके मुलाकातकेवास्ते एक लौंडी खत ( पत्र ) लेके आ खडी है हुक्म होवो तो अंदर भेजूं ?

हु०—शहाजादा सीतार बजानेमे मशगुल हुवा है इस खातर जो मै अभी जा सामने खडा रहूं तो गुस्सेमे आ-जावेगा इसलिये आप थोडी देरतक यहां बैठनेकी तस्दी लिजिये. ( जाहांदार याजकडे जाऊन ) सरकार! कोई लौंडी आकर आपके मुलाकातकेवास्ते आ खडी है हुक्म होवो तो यहां भेजूं.

जाहां०—उसको आकर कितनावख्त हुवा है?

नू०—आदा घंटा हुवा होयगा सरकार.

जाहां०—( रागावून ) गव्हार! मुजको ओ आतेही वख्त किसलीये न फरमाया? पराये आदमीकों इत्नी देरतक तस्दी देना वाजवी है?

हु०—जी सरकार. ( जातो व दासीस घेऊन येतो. )

दासी खुरनी सात बजाउन पत्र देते; जाहांदार तें पत्र घेऊन त्याचें चुंबन करून वाचूं लागतो व आनंदाच्या भरात खुष होऊन दासीस एक मोत्यांची माला बक्षीस करितो; नंतर दासी निरोप घेऊन जाते. पुढें जाहांदार एका करंड्यांत कांहीं आमोलिक जवाहीर घालून आपण सौदागिराचा पोषाक करून नूरमहिताब हिच्या महालीं जातो, तेथें नूरमाहिताब हिनें पूर्वींच एक खोजा ( नपुंसक ) ह्याची वाट पाहत उभा केला होता; जाहांदार तेथें पोंचल्यावर त्या खोजानें त्यास जेथें नूरमहिताब चिकाच्या पड्यांत बसली होती तेथें नेलें, जाहांदार आल्याबरोबर नूरमहिताब हिनें आपला हात पड्याबाहेर काडिला त्या हस्ताचें चुंबन घेऊन समोरील एका कोचावर जाऊन बसला.

नूर०—आपण तर अगदीं हुबेहुब सौदागरच बनलां आहां.

जाहां०—थोरांची आज्ञा शिरसा मान्य केलीच पाहिजे व त्याप्रमाणें सरंजामही बरोबरच आहे हा पहावा व ह्यांतील जे इच्छेस येतील ते ठेवावे. ( करंडा देतो. )

नूर०—वाहवा ! ह्यावरून उघड दिसतें कीं, आपण फार दूरदृष्टी अहां !

जाहां०—परक्या टिकाणीं जाणें ह्मटलें ह्मणजे फार धोक्याचें आहे तशांतून कोणी आपली चौकशी केली असती व मजजवळ त्यास प्रमाण दाखविण्याचें हें साधन नसतें तर पुरी फजिती होऊन बंदी शाळेंनही पडावें लागतें ?

नूर०—भ्रमर जे आहेत ते स्वसंतोषानेंच बद्ध होत असतात असो. हीं सर्व रत्नें उत्तमच आहेत परंतु ह्यांचे मालक रत्न जें आहे त्याकारितां कित्येक बिचाऱ्या राज्यकन्या हातांत माळ घेऊन एका पायावर उभ्या राहून तपश्चर्या करीत असतील; त्या मजसारख्या हतभागिणीस असें रत्न कोठून सांपडणार कीं, जें कोंदणांत घालून कंठाचेठायीं ग्रहण करवेल ! !

जाहां०—अहाहा ! दुसऱ्या मनुष्यास थोरपणा देण्याची खुबी पूर्ण माहीत आहे. परंतु तें रत्न ग्रहण करणाराच्या इच्छेवर अवलंबून आहे कारण, त्याच्या ननांत आलें तर तो तें रत्न प्रीतीनें आपल्या शरिराचेठायीं धारण करील, नाहीं तर तें नापसंत करून फेंकूनही देईल, किंवा त्यापेक्षां दुसरें एकादें अधिक मौल्यवान व सुंदर आढळून आल्यास मग पहिल्यावरचें मन उडून जातें ? पण येथें ज्या टिकाणीं एकदां प्रेम जडलें तेथून कदापि ढळणार नाहीं ! !

नूर०—वाहवा ! एकंदरीत आपला छाप दुसऱ्यावर बसविण्याची युक्ति बरी साधली आहे ! काय चमत्कार आहे पहा ! पुरुष तेवढे प्रामाणिक, सत्यवादि, दृढ निश्चयाचे व स्त्रिया बेइमान, कपटी, असत्यवादी, व चंचल ! ! बेअदबीची माफी असावी सरकार ! ! पृथ्वीच्या पाठीवर काय काय आहे ह्याचा पत्ता मोठमोठ्या शोध करणारांस लागला नाहीं, जसा आपणास आपल्या देशाचा अभिमान आहे तसा मलाही माझ्या देशाचा आहे, त्यांत मी इतकेंच सांगतें कीं, हें बोखारा शहर स्त्रियांच्या पातिव्रत धर्माविषयीं प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. आपल्या हस्ताच्या अंगुलिका तरी समसमान आहेत काय ? मग सारख्या स्वभावाचीं दोन मनुष्यें तरी कोठें सांपडतील ? काय करावें माझ्या आजानें जी ही अट करून ठेविली आहे कीं, " उत्तरेकडील एका गुंफेंतून सतत प्रचंड आग्निज्वाला निघत असतात व कधीं एकादेवेळीं शांत झाल्यास तेथें मोठा चमत्कारिक महाल आहे असें दिसते " ह्या गुंफेचा जो शोध लावून आणील त्यासच ही कन्या अर्पण करावी अशी माझ्या पित्यास त्याची आज्ञा आहे; व ती त्यानें शिरसावंद्य चालविली आहे खरी, परंतु आमच्या सर्व कुटुंबांतील मनुष्यें ह्या अटीमुळें फार खिन्न आहेत कारण, कित्येक बिचारे राजपुत्र ह्या दुर्भागिणीची इच्छा धरून त्या गुंफेच्या शोधास गेले ते परतच आले नाहींत, कित्येक त्या आग्नींत जळून मेले, कित्येक गोवर्धन शहरांतील दैत्यानें भक्षण केले व कित्येक फकीर बनून देशाटण करूं लागले. ( दुःखित होऊन ) म्यां पुर्वजन्मीं असें कोणतें पातक केलें होतें कीं मज एकीमुळें

इतक्या बिचाऱ्या राजबिंड्यांचा नाश झाला ! ! व पुढें कित्येकांचा होईल कोण जाणें ! ! ( गडिंवर येऊन ) खुदा ताला आतां माझें गाऱ्हाणें ऐकून मला एकदां कबरस्तानांत पोंचवील तर हें पापाचें अधिकाधिक वाढणारें ओझें सुटेल ! ! सरकार, मी अंतःकरणपूर्वक सांगतें कीं, जर ही अट नसती तर आपल्या चरणाच्या ठिकाणीं माझा दृढ निश्चय आहे किंवा नाहीं ह्याचा प्रत्यय आजच काजी साहेबांस ह्याच दिवाणखान्यांत आणून आपली खात्री केली असती. परंतु काय करूं, ह्या अटीमुळें मी नाचार आहें. सरकार, माझी विनंती इतकीच आहे कीं, आपण त्या मृत्यूच्या तोंडांत पडण्यास न जातां माझें एक मागणें आहे तें मान्य करावें. ( दासीस अत्तर, शरबत, व पान आणण्यास सांगते ) दासी गेल्यावर एकांत पाहून सरकार माझी इतकीच विनंती आहे कीं, मी आपणाबरोबर वेश पालटून येतें. आपण आपल्या राज्यांत पोंचल्यावर मग आपणांस कोणाचेंही भय नाहीं. मी आतां ह्या अशा बंदीखान्यांत राहण्यास फार कंटाळून गेलें आहें.

जाहां०—छी ! छी ! जगांत आपली अपकीर्ति होईल, असें कृत्य करूं नये. तुह्मी कांहीं चिंता करूं नका व अपला धीर सोडूं नका, मी खरोखर सांगतों कीं, तुमची ही अट आहे ती मी पुरी करीन व परवरदिगारच्या हुकुमानें मला त्यांत जय मिळेल व मग सर्व लोकांसमक्ष आपला विवाह होऊन आनंदानें कालक्षेप करण्यांत येईल, बरें तर आतां आज्ञा असावी.

नूर०—सरकार, ह्यां दासीनें आपणास काय आज्ञा

घावयाची आहे! अशी बेमर्यादा कशी होईल? तर विनंती इतकीच आहे कीं, ह्या दीन दासीची आठवण मात्र विसरूं नये. ( शरबत व अत्तर देते. )

जाहां०—बरें तर आतां मला जाण्याची परवानगी असावी, परंतु येथून पाय उचलण्यास मोठें कठीण पडतें. कारण एक हेतू मनांतला तसाच राहतो.

नूर०—तो कोणता बरें? आपली आज्ञा आतां मला शिरसा मान्य आहे.

जाहां०—आपल्या मुखचंद्राचें दर्शन झाल्यास मी आपणास मोठा धन्य मानीन.

नूर०—त्यांत काय आहे, हा सर्व देह आपलाच आहे त्यावर आजपासून आपलाच वारसा आहे असें समजा. ( बुरखा काढून तोंड दाखवून चटकन पुन्हां बुरखा घेते व जाहांदार मोठा आनंद पावून निघून जातो. )

येथून जाहांदार उत्तरेकडे प्रवास करण्यास सुरू करितो, दर मजल दर कुच करीत असतां त्यास मोठें अरण्य लागतें; त्यांत कांहीं वृक्षांच्या फळांवर व झऱ्या-च्या उदकावर आपला उदर निर्वाह करितो, पुढें फळें मिळतनाशीं झाल्यामुळें कांहीं श्वापदांची शिकार करून त्यांच्याच मांसावर आपली उपजीविका चालवितो; असाच कांहीं दिवस प्रवास करीत असतां एका महान हा अवलि-याच्या मठासन्निध जाऊन पोंचतो. हा अवलिया ईश्वराचा महान भक्त असे. हा समाधिस्त असे व सहा महिन्यांतून एकदां ह्याची समाधी उतरत असे. जाहांदार त्या मठांत गेल्यावर पाहतो तों फकीरसाहेब समाधिस्त असून मठासभोंवतालचीं सर्व झाडें अगदीं शुष्क एकही पर्णरहित

आहेत; परंतु त्यांवर चांगलीं पिकलेली फळें लागलेलीं पाहून त्याला मोठें आश्चर्य वाटलें. तेथें जवळच एक कुंड होतें त्यांत स्नान करून निमाज पढल्यावर क्षुधा निवारणार्थ कांहीं फळें तोडून आपल्या वस्त्रांत घेतलीं व मठांत आला. तेथें पाहतो तों षड्रसयुक्त पक्वान्नांनीं भरलेलें सुवर्णाचें ताट वाढून तयार आहे. त्याचा त्यास मोठा चमत्कार वाटला कीं, एकही मनुष्य किंवा इतर प्राणी नसून हें त्वरित शिजविलेलें अन्न कोठून आलें ! ! असो, आपणास काय ही अल्लाताल्लाची कृपाच समजली पाहिजे ! असें मनांत आणून "बिसमिल्ला" ह्मणाला व तें अन्न भक्षण केलें व तीं आणलेलीं फळेंही खाल्लीं. तीं त्यास अमृताप्रमाणें मधुर लागलीं; मग त्या कुंडांतील उदक प्राशन करून व्या-याम करण्याकरितां हिकडेतिकडे हिंडूं फिरूं लागला असतां त्याला त्या बागेंतील बहुत चमत्कार दृष्टीस पडले. नंतर कांहीं वेळ वामकुक्षी करून उठला व हातपाय धुवून कुराण पढत बसला; जाहांदार यास ह्या मठामध्यें येऊन तीन महिने झाले होते ते पुढें तीन महिने अव-लिया साहेबांची समाधी उतरण्याची अवधी होती ह्मणून त्यास तीन महिने कधीं जातील व ह्या बागेंतील चमत्का-रांचा खुलासा कधीं मिळेल असें झालें होतें. असो. पुढें तेही दिवस निघून गेले, समाधी उतरण्यास तीन दिवस राहिले होते तों भूमींतून भिंतींतून वृक्षांतून मधुर गायनाचे अलाप ऐकूं येऊं लागले, बागांतील झाडें हिरव्या गार पालवीनें व फलपुष्पयुक्त टवटवीत भरलेलीं दिसूं लागलीं, बुवाजीच्या मठाचें झोंपडें बदलून त्याचा एक सुवर्णानें

ओतून काढलेला एक सुंदर महाल बनला, बागेंत कांहीं सुवर्णासारिखे, कांहीं रौप्यासारखे कांहीं तांबडे, हिरवे, काळे, पांढरे अशा अनेक तऱ्हेचे पक्षी आनंदानें मधुर गायन करूं लागले, तेथील भूमीचेंही स्वरूप बदलून कांहीं प्रकारच्या सुवासिक रांगोळीनें रंगविलेली आहे अशी दिसूं लागली. जाहांदार हा सर्व चमत्कार पाहून अंतःकरणांत फारच चकित् होऊन गेला; कांहीं वेळानें आपल्या पोषाखाकडे पाहतो तों सर्व वस्त्रें हिरेमाणकांनीं जडलेलीं चकचकीत दिसूं लागलीं तेव्हां तर तो अगदींच थक्क जाहला! नंतर तो आपल्या मनांत विचार करूं लागला कीं, हा अवलिया कोणी महान जादूगार आहे, किंवा कोणी महान पराक्रमी दैत्य किंवा पिशाच्च असून असें कापट्यरूप धारण करून बसला आहे किंवा कोणी "जीन" —(स्वर्गस्थ तपस्वी देव) आहे, किंवा कोणी सार्वभौमराजा तपश्चर्या करण्याकरितां अशा जंगलांत येऊन राहिला आहे! "छी छी! माझी ही कल्पना खोटी आहे. कारण कितीही मोठा सार्वभौमराजा असो व त्यानें जरी सर्व पृथ्वीतलें द्रव्य एकत्र केलें तरी देखील असें सामर्थ्य व वैभव त्यास प्राप्त होणार नाहीं! खरोखर हा कोणी एक महान तेजस्वी तपश्चारी आहे व हें सर्व त्याच्या तपाच्या सामर्थ्याचें दिग्दर्शन आहे, ह्यांत संशय नाहीं. मला जें परवां स्वप्न पडलें होतें कीं, तुला आतां कांहीं चमत्कार दृष्टीस पडतील, तिसऱ्या दिवशीं अवलियाची व तुझी भेट होईल तर आपण आतां तेथें जावें. कारण तो दिवस आजचाच आहे." नंतर जाहांदार मठांत गेला व पाहतो तो तीन अशी सुस्वरूपी रंभा

उभय हस्त जोडून ईश्वराचें स्तवन करिताहेत असें दिसलें. थोडक्याच वेळानें त्या अवलियाचें शरीर हालूं लागलें व तो ईश्वराचें स्तवन करीत उठून उभा राहिला, तेव्हां जाहांदार हा पुढें जाऊन गुडघे टेंकून त्याच्यापुढें राहिला व त्याच्या हस्ताचें चुंबन करून स्तब्ध राहिला. नंतर तो अवलिया ह्मणाला.

( यतो मजनु ही होगा दिवाना-ही चाल. )

आफसा कहां अय आदम दिवाना ॥
येतो जादुसे पुर है किराना ॥
वो यहा शयदान है यहां आदमकी ॥
जीन और परियोका है येतो थाना ॥
धरता हयन कदम यहां कोइ आदम ॥
नथाला जीम तुजे अब यहां आना ॥
अवतो बेजार तूं होगादे वोसें ॥
पावेगा न यहांसे फिरके जाना ॥

जाहां०-( हात जोडून ) जो आपका सायां मुजपे होवे ना देव ( भुते-राक्षस ) और जिनो परियोंसें मेरा क्या होयगा !

अव०-यहासे तुझे कहां जानाहै सो मुझे बयान कर और किसलिये इस जंगलमे आ पोंहचा सो कहदे ?

जाहां०-मुजकों ऐसा मालूम हुवा है के यहांसे उत्तर तर्फ एक बडा पहाड है के उस्के गोफेंमेंसे हमेशा आतशोंका जोष निकलता है वो क्या है उस्का तालाश करनेके लिये मे जाता हूं इसलिये आप मेहेरबान होके उस रहामें मुजपर कुचभी आफत न आवे वैसी मुझे ततबीर बताओगे.

अव०-कौं तुझे अपने जानका कौफ आया है ! के

ऐसे शेअरके मुहूंमेजा पडताहे ! वो एक जादूगार हे और आप अजगर के सरूपमे बदलके मुहूसें आतष फेंकता हैं, उने एक बडा बुराकाम किया हैं के एक लडकिको उस्के मेहेलमें उठा लायाहे और ओ उसीपर बहोत आशक है लेकिन ओ लडकी अबतक उस्को अपने माशूकसा कबूल नकरती हे इसलिये उन्हें उस्को केद करके रखाहे तो तूं जाकर ओ लडकीको छूडालाजा तेरी फते होजायगी.

जाहां–( त्याच्या हातांचे चुंबन करून ) आपकी मेहेरनजर होवे तो ऐसे खवीसोंकों मै फनाकर देऊंगा.

अब०–( त्यास एक लहानशी कुपी व एक आरसा देऊन ) ले ये मुलेमानका पानीहे यहांसे तुझे एक सेहेर लगेगा ओं सेहेरका नाम " गोवर्धन सेहेर है " उस सेहेरके नाकेको एक बडा देव पहारा करनेको बैठाहै ओ तुझको देखतेही मुहू खोलकर खाने दौडेगा तब तूं येहे पानी उस्के दिलपर छांठ फिर ओ चुप होकर बैठेगा और तुझे दरवाजा खोलकर देवेगा, शहरमें जातेही वख्त तुझे एक गाय मालूम होजायगी तूं उसिको ये आरिसा दिखलाव फिरवो तुझे दुध निकालने देयगी तुं वो दूध लेके आगल रस्ता पकड फिर ओ शहरकी बस्ती छोटे छोटे परवाले लडके तुझे देखनेमे आयगे वो दूधको देखतेही अपनासर निचे झुका तुझको बहोत आहासान करेगे तूं वेसाही दरबारमें जाकर वों दूध राजाके हातमे दे फिर वो ए दूध पीके तुझकों कहां जानां है वो पुछेगा फिरंतु उसिको आपना सब हाल बयान कर. ( तिघी राजकन्यास ) लडकियो तुम इस शहाजादेकें गोवर्धन शहरके हदमे पोंचा आवो.

राजक०—आपका हुक्म आंखोंसे बजालाते हैं. ( जाहांदार यास ) चलिये साहेब.

नंतर दोघीजणींनी त्याचे दोन्हीहात आपल्या काखेंत धरून आकाशपंथानें त्यास घेऊन गेल्या व गोवर्धन शहरराजवळ त्यास आणून पोंचविलें व सांगितलें कीं, ह्या हद्दीच्यापुढें जाण्याची गुरुजींची आह्मांस आज्ञा नाहीं ह्मणून आपण पुढें गमन करावें; इतकें सांगून त्या दोघीजणी जाहांदाराचा निरोप घेऊन गेल्या व जातांना त्यास सुचविलें कीं, जेव्हां तुह्मीं परत याल तेव्हां ह्या समोरील वृक्षावर गुरुजीनें दिलेल्या पाण्याचें सिंचन करतांक्षणींच आह्मीं प्रगट होऊं, व पुन्हां तुह्मांस गुरुजीच्या मठांत नेऊन पोंचवूं. जाहांदार त्यांचा निरोप घेऊन निघाला तो तिसरे दिवशीं गोवर्धन शहरानजीक जाऊन पोंचला शहराच्या दरवाजाजवळ जातांच तेथील रखवालदार उठून उभा राहिला व आपलें शरीर पर्वताप्रमाणें वाढवून जाहांदारास खाण्यास धांवला व ह्मणाला कीं, फार दिवसापासून मी क्षुधित आहें, आज ईश्वराची मोठी कृपा झाली असेंच समजलें पाहिजे !! तेव्हां जाहांदार ह्मणाला, हें शरीर नाशिवंत आहे व तें जर तुमच्या सारख्यांच्या उपयोगास लागलें तर फार उत्तम, परंतु माझा एक प्रश्न आहे त्याचा तुह्मी खुलासा करा व मग मला पाहिजे तर खा, कापा पाहिजे तें करा, हा मी येथेंच उभा आहें. नंतर तो दैत्य ह्मणाला तुझा प्रश्न काय आहे तो सांग ? तेव्हां जाहांदार सांगूं लागला कीं, चौघे मित्र प्रवासास निघाले होते त्यांत एकजण सुतार, दुसरा शिंपी, तिसरा सोनार व चौथा फकीर होता. हे प्रवास करीत असतां

त्यांस मार्गांत एक मोठें रान लागलें. त्या रानांतून जात असतां त्यांस अरण्यांतच रात्र झाली व जवळ आसपास कोठेंही गांव खेडें नसल्यामुळें त्यांनीं त्या अरण्यांतच रात्र काढण्याचें ठरविलें व भोजन वगैरे आटोपल्यावर बिछाने वगैरे घालून प्रत्येकानें तीन तीन तास पाहारा करण्याचें कबूल केलें त्यामध्यें पहिला पाहारा सुताराचा होता, तेव्हां तो जागत बसला व बाकीचे तिघेजण झोंपी गेले, नंतर त्यानें असा विचार केला कीं, असाच बसलों तर आपणालाही झोंप येईल ह्मणून कांहींतरी उद्योग करीत बसावें, कारण ह्मण आहे कीं "उद्योगं पुरुष लक्षणं" नंतर त्यानें तेथीलच एका झाडाचें लांकूड तोडून आणिलें व त्याची एक सुंदर पुतळी घडविली व त्याचा पहारा संपल्यावर त्यानें शिंप्यास उठविलें व आपण झोंपी गेला. शिंपी उठून सावध झाला व पाहूं लागला तों एक सुंदर पुतळी त्याचे दृष्टीस पडली; तेव्हां त्यास असें वाटलें कीं, सुतारानें आपलें कौशल्य दाखविण्याकरितां हें कृत्य केलें. बरें तर आपण ही आपलें काम करून ही नग्न आहे हीस वस्त्रें नेसवून साजरी करावी; असें मनांत आणून त्यानें आपलें गाठोडें सोडलें व त्यांतून वस्त्रें काढून बरोबर घेतून एक घागरा व एक चोळी शिवून तिला नेसविली, पुढें त्याचा पहारा संपल्यावर सोनार उठला व पहातो तों आपल्या दोघां साथीदारांनीं आपापलें कौशल्य दाखविलें मग मी तरी त्यांस आपला हुन्नर कां नको दाखवूं ? असें ह्मणून त्यानें आपल्या गाठोड्यांतून दागिनें काढून त्या पुतळीवर चढविले व तिजकडे पाहतांक्षणींच फार मोहित होऊन तिला आलिंगन देऊं लागला तों ती लांकडाची

बनविलेली आहे असें पाहून आपल्या मनांत खजील होऊन स्वस्थ बसला. नंतर शेवटचा पहारा त्या फकीराचा असल्यामुळें तो जागृत झाला व सोनार झोंपी गेला. फकीर जागृत होऊन पहातो तों आपल्या तिघां-मित्रांनीं आपलें चातूर्य दाखविलें खरें, परंतु ही निर्जीव असल्यामुळें हिचा कांहींच उपयोग नाहीं ह्मणून त्यानें " हक्तालाा " ची बंदगी करून तिला जिवंत करण्याकरितां तिच्या तोडांत उदक सोडिलें, तशी ती बोलूं चालूं लागली, इतक्यांत उजाडलें तसे सर्वजण जागृत झाले व त्या स्त्रियेस पाहून सर्वजण मोहित झाले व तिजकरितां भांडण करूं लागले तर आतां ती कन्या कोणास द्यावी व ती कोणाची स्त्री होणें योग्य आहे हें सांगावें, तेंव्हां राक्षस ह्मणाला कीं, तिच्या शरिरावर ज्यानें अलंकार घातले तो तिचा पती आहे. ज्यानें तीस प्रथम उत्पन्न केली तो सुतार तिचा पिता झाला व ज्यानें तीस वस्त्रें नेसविलीं तो तिचा बंधु व फकीर तिच्या मुखांत उदक सोडणारा पुत्र झाला. नंतर राक्षस ह्मणाला कीं, आतां मी तुझ्या प्रश्नाचें उत्तर दिलें तर तूं आतां मरण्यास सिद्ध हो असें ह्मणून लागलेंच त्यानें आपलें शरीर पर्वत प्राय वाढविलें व आ पसरून त्यास खाणार तेंव्हां जाहांदारानें त्यास विनंती केली कीं, मला बहिराम जादूगिराच्या अरण्यांत जाऊन एका राजकन्येस सोडवून आणणें आहे तेथून परत फिरल्यावर पाहिजे तर मला तूं भक्षण कर ह्याविषयीं पाहिजे तर हें मी तुला वचन देतों, दुसरें तेथून मी परत ह्याच मार्गानें येणार, कारण ह्या तुमच्या शहराशिवाय दुसरा मार्गच नाहीं. ह्यावर त्या

राक्षसानें उत्तर दिलें कीं, मला मनुष्याचा विश्वास नाहीं व हातची शिकार सोडून पळल्याच्या पाठीं कोण लागतो. व माझा पूर्वींपासून परिपाठच आहे कीं, जेवढे येतात तेवढ्यांस मी येथेंच भक्षण करितों, पुढें जाऊंच देत नाहीं. मग तुला कसा सोडूं. असें ह्मणून तो त्यास धरणार इतक्यांत जाहांदारानें अवलियानें दिलेल्या " सुलेमानी " पाण्याची कुपी काढून त्याच्या आंगावर शिपडतांच त्याची राक्षसी माया जाऊन तो स्तब्ध होऊन गुपचूप खालीं मान घालून बसला; तेव्हां जाहांदार त्यास ह्मणाला कीं. कां आतां तूं मला खात नाहींस ? नंतर राक्षस हात जोडून ह्मणाला, मी तुमचा बंदा गुलाम आहें, मला क्षमा असावी. नंतर त्यानें शहराचा दरवाजा उघडून जाहांदार यास शहरांत जाण्याचा मार्ग मोकळा केला. जाहांदार शहरांत जातांक्षणींच त्यास मोठे चमत्कार दृष्टीस पडले. शहरची रचना फार सुंदर रितीची केली होती, फळफळावळवाल्याची, मिठाईवाल्याची व जवाहिरवाल्याचीं व वस्त्रें व भांडीं वगैरे नाना तऱ्हेच्या जिनसांचीं दुकानें एकसारखीं लागून गेलीं होतीं, शहरांतून कोणी घोड्यावर बसून जात आहेत, कोणी गाताहेत, कोणी वाद्यें वाजवीत आहेत, कोणी कांहीं संभाषण करीत आहेत, परंतु एकही मनुष्य किंवा इतर प्राणी जाहांदारास दृष्टीनें दिसत नाहीं, ह्याचा मोठा त्यास चमत्कार वाटून तो मोठ्या अचंब्यांत पडला व तसाच पुढें चालूं लागला; चालतां चालतां त्यास मार्गांत एक बाग लागला त्या बागेंतील झाडें मोठीं चमत्कारिक होतीं ह्मणजे एकाच वृक्षास चार रंगाच्या डाहळ्या फुलें व फळें लागलेलीं होतीं. ज्या डहाळीस पांढरी

पानें होतीं तीसच पांढरी फुलें फळें असत, तांबडीस तांबडीं व हिरवीस हिरवीं असत; त्याच बागेंतील एका वृक्षाखालीं एक गाई जिचें सर्व शरीर सुवर्णाप्रमाणें चमकत होतें व शरीर गाईप्रमाणें होतें फक्त डोकेंच काय तें स्त्रीचें होतें तिनें जाहांदार यास पाहिल्याबरोबर क्रोधानें उठून उभी राहिली व मोठ्यानें हांक फोडली, तेव्हां आकाशांतून हजारों सपक्ष लहान मुलें हातांत तिरकमटे घेऊन आलीं व तिरकमट्यास बाण लावून जाहांदार याच्या सभोंवतीं आपलीं धनुष्यें सज्ज करून त्या गाईच्या आज्ञेची वाट पाहत होतीं कीं कधीं आह्मास सांगते कीं, “ एकदम सर्वांनीं बाण सोडून त्याचे तुकडे तुकडे करून टाकवे; ” इतक्यांत जाहांदार यानें अवलियानें दिलेला आरसा काढून तीस दाखवितांक्षणींच ती शांत होऊन खालीं बसली व आपल्या मुलांस सांगू लागली कीं, बाळांनो ह्या मनुष्यांस तुमच्या दादाकडे घेऊन जा. नंतर जाहांदार यानें आपल्या जवळचें पात्र काढून त्यांत त्या गाईचें दूध घेतलें व तिला नमन करून राजवाड्याकडे चालता झाला. जाहांदार यानें त्या गाईस आरसा दाखवितांक्षणींच त्यास सर्व दिसूं लागलें, तेथपर्यंत कांहींच दिसत नव्हतें कानांनीं मात्र त्यांचीं गडबड होत असे ती ऐकण्यास येई, जाहांदार मार्गांतून जात असतां जे जे कोणी त्या दुधास पहात ते ते आपलें शीर खालीं करून नमन करीत असत, पुढें जाहांदार शहरची मजा पाहत पहात राजवाड्याकडे गेला व कचेरींत जाऊन त्यानें तें दूध राजाचे हातीं दिलें तसें कचेरीतील सर्व लोक उठून उभे राहिले. जाहांदार आपले गुडघे टेंकून त्याच्या हस्ताचें चुंबन घेतलें. मग राजानें

तें दूध पिऊन जाहांदार यास कुशल प्रश्न विचारिले, आपणास कोणीकडे जाणें आहे व आपण कोणत्या कारणास्तव इतकीं संकटें सोसून येथपर्यंत आलां वगैरे विचारिल्यावर जाहांदारानें आपली सर्व हकिकत सांगितली व ह्मणाला आपली मदत मिळेल तर मी त्या शहाजादीस ( नूरजहान ) त्या जादुगिरापासून सोडवून तिच्या पतीच्या घरीं पोंचवीन. इतकें ऐकल्यावर राजानें त्यास " सुलेमानी " तलवार देऊन सांगितलें कीं, जा तुझा जय होईल, ही तरवार तुजजवळ असूंदे, सदोदित हिला तूं आपलेजवळ बाळगीत जा, हिजपासून तुला कोणत्याही भूत पिशाच व जादुपासून विघ्न होणार नाहीं. नंतर जाहांदार त्याचा निरोप घेऊन पुढें चालता झाला. बेहेराम जादुगिराच्या अरण्यांत जाऊन जाहांदार पाहतो तों सर्व अरण्यभर प्रचंड अग्नीज्वाळा निघतात असें त्यास दिसलें. तेव्हां त्यानें आपल्याजवळील सुलेमानी पाणी शिंपडतांच सर्व अग्नी विझून गेला. हें पाहून तो जादुगिर समजला कीं, आपणास कोणी तरी शत्रु उत्पन्न झाला खरा. जाहांदार पुढें जाऊन पाहतो तों हा जादुगिर मोठ्या प्रचंड सर्पाचें रूप घेऊन मुखावाटे अग्नी फेंकीत आहे असें दिसलें; जादुगिरानें जाहांदार यास पाहातांक्षणींच त्या गुहेच्या बाहेर येऊन आपली फणा पर्वताप्रमाणें वाढविली व तोंड पसरून मोठ्यानें किंकाळी फोडली, त्यासरसे कित्येक वृक्ष उन्मळून भूमीवर पडले धरणीकंपाप्रमाणें जमीन हालूं लागली, डोंगराचे कडे कोसळून पडले व समुद्रास मोठी भरती येऊन पर्वताप्रमाणें लाटा येऊं लागल्या. नंतर तो जाहांदारास मोठ्या क्रोधानें विचारूं लागला.

**सर्प०**–( जादूगिर ) तूं कौन है और यहां आनेका तेरा क्या काम है सो जल्द बयान कर नहीं तो मुफ्तका मरा जायगा फिर अपने माबापकों और जोरू लडकों न मिल सकेगा ! ! !

**जाहां**–मै बदकशानका शाहाजादा हूं और मेरा नाम जाहांदार है और लडकी नूरजहानकों तेरे केदमेसें छूडानेके लिये यहां आया हूं. ऐ नापाक, अहमक जादूगीर ! वो लडकीकों तुने उसकी खाविंदसे जुदाई करके चुराके लाया हैं ओ तुज नापाकपर नाखुष है तोबी तूं उसिकों बहोत सताता है ये बडी शरमिंदगीकी बात है, तूं गुन्हागार है और तुजकों सजा करना लाजीम है, जो तुझकों अपने जानकी मोहोबत होवें तो ओ लडकीकों जल्द मेरे हवाले कर फिर मै तेरा गुन्हा मवाफ् करूंगा और तुझे तेरी जान बक्ष दुंगा ! !

**जादू०**–ऐ नादान ! आदम जात तूं मुजकू पहछानता नहीं है मै तुजकों एक पलमें खाक कर दुंगा ! लेकीन मुजकू तेरे उपर रहेम आती है. अब तूं इस शेअरके मुहुमे आ पडा है अब तूं जिंदा न जा सकेगा ! !

**जाहां०**–अयबदशिकल तूं कुचभी खुदाका डर दिलमे नहीं रखता हैं और अपने जादुईकी मगरूरी रख सकता है लेकीन देख मै अब तुजे फना कर देता हूं ! !

असें ह्मणून जाहांदार यानें आपली सुलेमानी तरवार त्या सर्पाच्या मस्तकावर मारली त्यासरसा काळोख पडला व एक मोठा आवाज होऊन ती गुहा नाहींशी झाली व तिच्या जागीं एक सुंदर महाल झाला व त्या महालाच्या खिडकींत नूरजहान शोक करीत बसली आहे व आपण त्या-

च्या दरवाज्याजवळ उभे आहों. असें जाहांदार यास दिसलें, तेव्हां तो गुप्त राहून ती काय ह्मणते व महामूदशहा-वर हिची प्रीति आहे किंवा नाहीं, हें ऐकत गुप्त रितीनें तेथेंच उभा राहिला. इकडे नूरजहान शोक करीत ह्मणते

( गजल भैरवी )

( इष्कोंमे तेरे कोहे गम ॥ सरपे लियाजो होसो हो–ही चाल. )

गरदींसें आसमासे हम ॥ सेहते हैं ह्मां सितम सितम ॥
दूनियादगा तोकरती है ॥ और जफा जुलम जुलम ॥
इसहस्तीके कारखानेमें ॥ कुछनहमारा काम हूवा ॥
है रंज उठातें हम सदां ॥ दिलपे हमारे है अलम ॥
न दूनया हूई किसीकी येह ॥ न होगी किसीकी येक भू ॥
शाहा और गरीब एकसा ॥ येहजालीमका होता है जम
न काय मरहेगा कोई मुदाम ॥ नदमामर है गाये ही हाल
आज खडे हैं जानदार ॥ लेटेंगें कल कफनमें हम ॥
अराम और करारसें ॥ न कोई रहा है अब तलक ॥
आज है शादी खुरमी ॥ और है कल मातम मातम ॥

जाहां०–( आपणांशीच ) खरोखर असें जगांत चालेलें आहे. ( दासी येऊन )

दासी०–ऐ शहाजादी ऐसी तूं रात्रौदीन अफसोस करेगी तो अपनेही जानकी खता पायगी.

जाहां०–( मनाशीं ) खरोखर आहे.

नूर०–मैं क्या करूं.

( गजल–झिंझोटी. )

हमे जहांसें नहीं काम ॥ हम आशक दिवाने है ॥
रहे हो आप कहां कर ॥ हमे तो ऐसे बहाने है ॥
दोहा–मडकत शैले प्रेमके, राख भयो बदन ॥

तन मन सारा चुका, नयन पडत अगन ॥
तुह्मारी पहेलुमे जानी ॥ क्या बिठाते बिगाने है हमे ॥
दोहा–गुजर गई घडी घडी, गुजरे दीन और साल ॥
अबतक जानी मिले नहीं, क्या मेरा है ये हाल ॥
ख्याल ये यार मे अफसोस ॥ गुजर गये जेमान है हमे॰
जाहां॰–सचबात है.

इतक्यांत त्या महालाच्या समोरून तो जादूगीर वाघाचें रूप घेऊन एकदम चवताळून जाहांदार याच्या आंगावर धांवला हें पाहून जाहांदार यानेंही आपलें रूप बदलून एक मोठा आस्वल बनला, नंतर दोघांचें मल्लयुद्ध होऊं लागलें, नूरजहान हिनें जाहांदार यास प्रथम पाहिल्याबरोबर तीस आश्चर्य व अति दुःख झालें, आश्चर्य होण्याचें कारण ह्या जादूगिराच्या अग्नी प्रळयांतून वांचून येणें ह्मटलें ह्मणजे मनुष्य शक्तीच्या बाहेर आहे व दुःख होण्याचें कारण तिला वाटलें कीं, हा देखील एकादा जादुगिर नसेल ना ? नाहीं तर एका संकटांतून सूटून दुसऱ्यांत पडल्यासारखें होणार ! पुन्हां तीस असें वाटलें कीं, ईश्वरास आपली करुणा येऊन त्यानें ह्यास मला ह्या क्लेशांतून सोडविण्यास पाठविलें नसेल कशावरून ? असें मनांत येतांच ती जाहांदार यास यश येण्याविषयीं ईश्वराची मनोभावें स्तुति करूं लागली. इकडे ह्या दोघांची बराच वेळ झटापटी झाल्यावर त्या आस्वलानें ( जाहांदार ) त्या वाघास खालीं पाडून त्याच्या मानेवर बसला हें पाहून तो जादुगिर समजलाकीं, हा कोणी तरी प्रबळ शत्रु आहे. ह्याजपुढें आपला टिकाव लागणार नाहीं. हें पाहून तो त्याच्या हातांतून निसटून पळून गेला व नाहींसा

झाला. नंतर जाहांदारानें आपलें पूर्वीचें मानवी रूपघेऊन माहालावर गेला व पाहतो तों सर्व महाल चमत्कारिक वस्तूंनीं भरलेला त्यास दिसला. पुढें ज्या दिवाणखान्यांत नूरजहान बंदगी करीत बसली होती तेथें गेला तों नूरजहान हिनें आपली प्रार्थना आटोपून मोठ्या सत्कारानें जहांदार ह्याच्यापुढें गुडघे टेंकून बसली, तसा जाहांदार यानें आपला हात पुढें केला त्या हातांचें चुंबन घेऊन मोठ्या अदबीनें त्यास दिवाणखान्यांत नेऊन एका कोचावर बसविलें व जवळच आपण हात जोडून कांपत उभी राहिली. हें पाहून जाहांदार ह्मणाला मुली, तूं मजपासून किंचित्‌ही भय बाळगूं नको, मी त्या दुष्ट जादुगिराप्रमाणें नाहीं, मी केवळ तुझी ह्या काळापासून मुक्तता करण्यासच आलों आहें. तूं मजविषयीं अगदीं बेफिकीर ऐस. ह्या भाषणानें तिची भीति जाऊन ती ह्मणाली माहाराज, आपण कोणतें कूळभूषित केलें व आपलें अशा भयंकर ठिकाणीं येण्याचें काय कारण तें ह्या दीन स्त्रीस कळविण्याची तस्दी घ्याल तर मजवर आपले फार उपकार होतील. तेव्हां जाहांदार यानें पूर्वीपासून आपली सर्व हकिकत सांगितली व शेवटीं माहमूदशाहाकडे तुला नेऊन पोंचविण्याकरितांच मी आलों आहे, हें ह्मटल्याबरोबर तिनें एक किंकाळी फोडली व “ हाय माहमूदशा ” असें ह्मणून मूर्च्छित पडली, तसें जाहांदार यानें तिच्या डोळ्यांस पाणी लावलें व थोडेंसें तिच्या मुखांत घालून तीस वारा घालूं लागला. काहीं वेळानें ती सावध होऊन जाहांदार याची क्षमा मागितली. तेव्हां तो ह्मणाला, मुली तुह्मां उभयतांची इतकी प्रीति आहे हें पाहून मला फार संतोष झाला. नंतर तो ह्मणाला कीं,

तो दुष्ट कोठें पळून गेला आहे व तो आपणांस कांहींतरी विघ्न करण्याच्या खटपटींत असेल ह्मणून अगोदर त्याचा शोध करून संहार केला पाहिजे, त्याशिवाय आपणांस येथून जातां येणार नाहीं. परंतु मुली, मी तुला असें विचारितों कीं त्यानें आपलें मरण कशांत आहे हें तुला कधीं सांगितलें आहे काय? नुरजहान ह्मणाली होय, एकदां तो खुशींत असतां ह्मणाला कीं "मला पृथ्वीवर मारणारा कोणीच नाहीं. कारण माझा मृत्यू फार गुप्त आहे येथून अर्ध कोशावर एक डोंगर आहे त्या डोंगराच्या पोटांत एक घोरपड आहे तीस सुलैमानी तरवारीनें जर कोणी मारील तरच मी मरेन." तेव्हां जाहांदार ह्मणाला बरें तर तूं आतां सावधगिरींत ऐस, मी त्याचा पाठलाग करण्यास जातों. जाहांदार तेथून त्या जादूगिराचा शोध करण्यास गेला तसा तो जादूगीर दडून राहिला होता तो त्या महालांत शिरला व मोठ्या क्रोधानें नूरजाहानजवळ जाऊन त्यानें कांहीं शब्द उच्चारिले व आपल्या हातांतील काठी तिजवर सारली तशी ती एकदम मांजर बनली मग तिच्या गळ्याला दोरी बांधून घेऊन गेला व एका गुहेमध्यें तिला कोंडून ठेविली व ह्मणाला आतां येथेंच तुझा मृत्युआहे. दुष्टे! तुजमुळें मला हें दुःख भोगावें लागलें व आतां जो तुझा कोणी यार आला आहे त्यास व तुला दोघांनाही एकदम यमसदनीं पाठवितों. इतकें ह्मणून तेथून चालता झाला. नंतर बिचारी नूरजहान एक तर रूप बदलल्यानें व ह्या पाषाणांत एकटी कोंडल्यानें अगदीं शोक करूं लागली.

इकडे जाहांदार यानें त्या डोंगराचा शोध केला व त्या डोंगरावर सुलैमानी पाणी शिंपडतांच तो डोंगर फुटू

न ती घोरपड सोन्याच्या सांखळीनें बांधलेली दिसली, इतक्यांत त्या जादूगिरानें मोठ्या पक्षाचें रूप घेऊन आपल्या पायांत डोंगरासारखा मोठा धोंडा घेऊन आला व आतां जाहांदार याच्या डोक्यावर टाकून त्याचा चुराडा करणार तों जाहांदाराची दृष्टी तिकडे गेली तशी त्यानें आपली सुलैमानी तरवार लावतांच त्या धोंड्याचे तुकडे तुकडे झाले व तोपक्षी अदृश्य झाला, नंतर जाहांदार त्या घोरपडीजवळ जातांक्षणींच तिनें जाहांदार यास पाहतांच आपलें शरीर पर्वताप्रमाणें वाढवून मोठ्यानें हांक फोडली व आपलें विशाळ तोंड पसरून जाहांदार यास एकदम गिळण्यास धांवली. तेव्हां जाहांदारानें तिजवर सुलैमानी पाणी शिंपडतांच तिचें विशाळरूप जाऊन ती अगदीं ल्हान झाली. मग जाहांदारानें तिची सांखळी आपल्या हातांत धरून ज्या ठिकाणीं नूरजहान हिस ठेविलें होतें तेथें आला व पाहतो तों तेथें माहालही नाहीं व बागही नाहीं. मात्र एक मनुष्य हाच तो जादूगीर होता भुईवर उताणा पडलेला दिसला, त्याजवळ जाऊन त्यास हांक मारली. तेव्हां तो उठून हात जोडून उभा राहिला.

जाहां०—क्यौं अबतक तेरी आखो नही खुलती है नूरजहानकों कहां छुपाया है जल्द बतला दे.

जादू०—मुझे क्या मालूम उसिकु तो कोई ले गया होयगा गर ओ कहां चले गई होयगी, मै आपका गुन्हागार हूं लेकीन ये गोहरकों छोड दिजिये.

जाहां०—तुझे मालूम नहीं; मै अब तुझे मालूम कर देता हूं.

असें ह्मणुन त्यानें त्या घोरपडीचा एक पाय सुलैमानी तरवारीनें उडविला तसा त्या जादूगीराचा एक पाय तूटून

गेला, मग तो अगदीं दीन होऊन जाहांदाराची प्रार्थना करून ह्मणूं लागला कीं, मी तिला दाखवितों मला जीवदान द्या. नंतर त्यानें त्या गुहेचें ठिकाण त्यास सांगितलें, तेथें जाहांदार जाऊन त्यानें त्या गुहेंत नूरजहान हिचा फार शोध केला, परंतु त्यास कोठेंच ती आढळली नाहीं. मात्र एक मांजर आली व ती त्याच्या पायास चाटूं लागली व तिच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहत होत्या असें त्यास दिसलें. नंतर जिच्याकरितां आपण इतकी खटपट केली ती एकाएकीं नाहींशी झाल्यानें त्यास फार दुःख झालें, परंतु त्यानें असा विचार केला कीं, ही मांजर इतकी आपणास चाटीत आहे व दुःख करीत आहे तर त्या दुष्टानें तर तिला अशा पशू रूपांत ठेविली नसेलना? असें ह्मणून त्या मांजरीस उचलून घेतली व तीस प्रश्न केला कीं, नूरजहान ती तूंच आहेस काय? तसें त्या मांजरीनें आपलें डोकें खाली करून होय असें दर्शविलें, नंतर तीस बरोबर घेऊन तो ज्या ठिकाणीं तो जादूगिर विव्हळत पडला होता तेथें आला व मोठ्या क्रोधानें ह्मणाला कीं चांडाळा, ह्या गरीब स्त्रीस त्वां अशा दुःखांत टाकिलेंस आणि मजजवळ क्षमा मागतोस तुला लाज वाटत नाहीं? मग त्यानें आपल्या जवळील सुलेमानी पाण्याची कुपी काढून ह्मणाला हे प्राण्या जर तुझें ईश्वर निर्मित असेंच रूप असेल तर तसेंच रहा, नाहींतर आपल्या पूर्वीच्या रूपांत ये, तुला पैगंबर सुलेमानाची दुहाही आहे. असें ह्मणून तिच्या आंगावर पाणी शिंपतांच ती मांजर बदलून आपली नूरजहान उभी राहिली व लागलेंच तिनें आपलें मस्तक जाहांदार याच्या पायांवर

ठेवून त्याचें चुंबन घेतलें आणि ह्मणाली बाबा ह्याच दुष्टानें मला अशा विपत्तींत घालून दुःख दिलें. तेव्हां जाहांदार ह्मणाला मुली, तूं कांहीं चिंता करूं नको, आतां मी ह्याची नीट खबर घेतों, असें ह्मणून त्या घोरपडीचा दुसरा पाय कापला तसा त्याचाही दुसरा पाय तुटून पडला. मग सरतेशेवटीं त्या घोरपडीच्या मानेवर सुलैमानी तरवार ठेवून तिचे दोन तुकडे केले तसे ह्या जादूगिराचे तुकडे होऊन तो गतप्राण झाला. नंतर जाहांजार यानें त्याच्या शरिरास व त्या घोरपडीस भूमींत आच्छादून टाकिलें व नूरजहान हीस बरोबर घेऊन एका तळ्यावर गेला तेथें उभयतांनीं स्नानें करून आपणांस सर्व संकटांपासून ईश्वरानें रक्षिलें ह्मणून त्याची स्तुति केली, व कांहीं फराळ करून तेथून गोवर्धन शहराचा मार्ग धरिला, तेथें पोंचल्यावर तेथील राजास भेटला त्यानें नूरजहान हीसह सुखरूप आल्यामुळें आपला फार आनंद प्रदर्शित केला व कांहीं दिवस त्या उभयतांस तेथेंच राहण्यास सांगितलें, तेव्हां जाहांदार यानें राजाचे फार आभार मानून त्याच्या शब्दास मान दिला, व कांहीं दिवस तो तेथें राहिला. जाहांदार दिवसास शहरची मजा पाहण्यास जाई व नूरजहान जनानखान्यांत राहून आपल्या पतीची ( माहमुदशहा ) आठवण करून दुःख करीत असे.

**गजल—भैरवी.**

( नाम जानेका नले यार में मर जाऊंगी—ही चाल. )

रात तो रोनेमे कटी दिनको तो आराम नहीं ॥
गिरीया ओ नालाके सिवा और कोई काम नहीं ॥ रात०
तेरे महेफिलमे है जाना हमे आना है मुदाम ॥

गयेरोंके उलजाने अबसफेंक कही दान नहीं ॥ रात०
हैफ है जुलम है कैसा तेरे मयखानेंमे ॥
नतो हैं साकी यहां शिशान है जाम नहीं ॥ रात०
कुछभी रहेम मुजपर महामूद तुझे आती नहीं ॥
मिसले अफ लाक बदल रंग सुबोह शाम नहीं ॥ रात०
रुख दिखाये न कोई हम दमोका बाका हमे ॥ रात०
बूत परस्तों है हम किबलेसें कुच काम नहीं ॥ रात०
फकत् एक बुतकी परस्तीमे झुकातें हैं सर ॥
किस न तो वोह है नहीं हरभी नहीं राम नहीं ॥ रात०
हमतो कहतें है मामूद है माहमूद हैं वोह ॥
अबतो माहामूदके सिवालेंते कोई नाम नहीं ॥ रात०

( इतक्यांत जाहांदार येऊन ह्मणतो. )

**जाहां**—ऐसा अफसोस करनेमे क्या फायदा हैं, अब थोडेही दीनमे अपन अपनें शहेरको जा पावेगें अब दीलमे आराम रखनेको चाहिये.

**नूर०**—आराम कैसा होयगा.

**गजल खमाज**—तीन ताली.

आशक हुयें किसीपर तो आराम फिर कहां ॥
आराम जीसे होवे सरंजाम फिर कहां ॥
कहता है कोई यारनें अगीयार कर लिया ॥
मुजको रहेगा आशकका काम फेर कहां ॥
आशकसें अपने कहतां है आशक है तूं कहां ॥
मै आखोमें तेरे हुं गुलंदाम फिर कहां ॥
लोगोकों देख देखके रहेता है मुजको खोफ् ॥
जब खोफ् होतो इश्कमे हो नाम फिर कहां ॥
खुरशीदरुह निगोडमे थंडककाव्यापता ॥

जो है जलानेंवाले वोह गुलफाम फिर कहां ॥

नंतर कांहीं दिवसांनीं जाहांदार यानें राजाची आज्ञा मागून तेथून नूरजहान हीसह जाण्यास निघाला वाटेंत ती गाय भेटली तिला नमन केलें तिनें आशिर्वाद दिला कीं, तुझा सर्वत्र जयजयकार होईल, पुढें तो रखवालदार राक्षस भेटला, जाहांदार त्यास कडकडून भेटला, मग त्याचा निरोप घेऊन निघाला तो त्या वृक्षाजवळ आला व त्यावर सुलैमानी पाणी शिंपडतांच चौघीजणी परी येऊन जाहांदारासमोर हात जोडून उभ्या राहिल्या व आपला काय हुकूम आहे हें विचारूं लागल्या. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, आह्मांस अवलियाच्या मठांत घेऊन चलावें. त्याप्रमाणें दोघीनीं जाहांदार यास व दोघींनीं नूरजहान हीस धरून आकाशपंथानें मठाकडे घेऊन गेल्या. जाहांदार मठांत पोंचल्यावर पाहतो तों अवलियाची समाधी उतरण्यास तीन चार दिवस आहेत मग तितके दिवस तेथें राहाण्याचें करून त्या बागेंतील सर्व चमत्कार नूरजहान हीस दाखविले; नूरजहान हीस तेथील चमत्कारिक रंगाच्या पक्ष्यांचें, कोणीही मनुष्य नसतां आपोआप खाण्याचे पदार्थ प्राप्त होत, ह्याचें तीस फारच आश्चर्य वाटलें, पुढें त्या अवलियाची समाधी उतरल्यावर जाहांदारानें त्यास नमन केलें व ह्मणाला आपल्या आशिर्वादानें ज्या कामास गेलों होतों तें काम फत्ते करून आपल्या दर्शनास आलों आहें. नंतर अवलियानें त्यास एका वृक्षाचें मूळ देऊन सांगितलें कीं, जाहांदार तूं फार परोपकारी मनुष्य आहेस ह्मणून मी हें एक औषध तुला देतों तें तूं आपल्याजवळ ठेव. ह्या मुळामध्यें फार गुण आहेत हें सर्व प्रकारच्या कुष्टरोग रक्तपित्त

वगैरे असाध्य रोगास क्षणांत नाहींसे करून टाकील व कोणास भूत पिशाच्याची पिडा झाली असेल तर त्याच्या डोळ्यांत ह्याचें किंचित अंजन करावें ह्मणजे भूत पळून जाईल, आणखी हे किंचित् पाण्यांत उगाळून शरिरास लावावें ह्मणजे अग्नीपासून काहींच इजा होणार नाहीं. नंतर जाहांदार यानें अवलियाची रजा घेऊन माहमूद-शहाच्या राज्याकडे निघून गेला.

इकडे माहमूदशहा आपल्या महालांत एकांतांत बसला असतां त्यास नूरजहान हिची आठण होऊन ह्मणतो.

**लावणी.**

बडी मोहोब्बत बुरी है इष्ककी कहानी ॥
लाखोंके दिलकों हुई इस्सें हैरानी ॥
क्या असर किया लुभाय दुनया सारी ॥
दिल दर्द करे मिले न दिलबर प्यारी ॥
छोठे बडे और जईफ जवाने ॥
शाने अकलमंद वोभी बने दिवानें ॥
इष्क आतस है बुजेनडालो पानी ॥
लाखोंकें दिलकों हुई इस्से हैरानी ॥
नाग डसा मनको जिसे मोहोब्बतका ॥
तालेब न रहे वोह जान माल दौलतका ॥
सिलगाय दिया इष्कनें दरिया भारी ॥
सिवा वस्लके उडेन ये खुमारी ॥
न होवे कबु आराम मिले अगर नाजानी ॥
लाखोंके दिलकों हई इस्सें हैरानी ॥

**गजल—भैरवी.**

तख्त और ताजसें दिल मेरा बेजार है आज ॥

बहार ये गमसे अजब आह गिरफतार है आज ॥
माशुकके गमने मुझे कर दिया इव वख्त तबां ॥
मुजसा दुन्यामे कहो कौन दिल आजार है आज ॥
तफ्रका होगये हैं मेरे दोस्तो आशना ॥
अहा इस गमनें मुजे कर दिया बस ख्वार है आज ॥
छोड बस्तीकों फिरूं जंगलमें मैं बनके फकीर ॥
दिलमे आता है येही मेरे हरेकबार है आज ॥

माहमूद०—( एकांतांत ) प्रेम ! प्रेम ! प्रेम ह्या जिवास जसें सुख देतें तसेंच दुःखही देतें. प्रेमाप्रमाणें मधूर चीज ह्या पृथ्वींत दुसरी कोणती आहे ? ईश्वराच्या अनंत देणग्यांमध्यें सर्वोत्तम देणगी एक प्रेम आहे. प्रेमाविषयीं जें म्यां वाचिलें आहे व ऐकिलें आहे त्यावरून निःसंशय इतकें तर सिद्ध होतें कीं, प्रेममार्ग सुगम नाहीं. प्रेमामुळें पूर्वीं मोटे अजिंक्य योद्धे मारले गेले आहेत, मग मजसारख्या लहान बालकाचा पाड काय ? वसंत ऋतूंत जसें इंद्रधनुष्य आपोआप एक चमत्कारिक रंगाचें बनतें तद्वत तारुण्यावस्थेंत तरुण पुरुषाचा आभास, प्रेमाकडे सहज रीतीनें धांव घेतो. अरेरे ! माझी प्रिया नूरजहान हिजसह प्रेमारण्यांत आनंदमय होऊन विलासादि सुखाचा अनुभव घेण्याचा वेळ आला तेव्हां ( क्रोधानें ) त्या बाहिराम ! दुष्ट ! चांडाळ जादूगार यानें रंगांत भंग करून आकाश पंथानें माझी प्रिया पळवून नेली व मला असें दुःख करीत ठेविलें ! ! प्रिये तूं कधीं येऊन मला भेटशील व दृढालिंगन देशील बरें ! ! प्रियमित्र जाहांदारशहानें मुदत सांगितली होती तोही वेळ संपत चालला ; अझून तरी माझे प्रियेची व माझी भेट होते किंवा

नाहीं कोण जाणें. असें तर झालें नसेल ना कीं, तिचें सुंदर रूप पाहून जाहांदार हाच तीस वळकावून बसला ! ! छी ! छी ! मी किती मूर्ख आहें ! अशा पापभिरू व परोपकारी मनुष्यास विनाकारण दोष देतों. असो, कांहीं दिवस आपण वाट पहावी, नाहींतर ह्या जगतास शेवटचा प्रणाम करून एकदा मुक्त व्हावें ह्मणजे झालें. ( दुःखित होतो. )

( नूरमहिताब व तिची दासी. )

**सकीना.**—( नूरमहिताब एकांत ठिकाणीं विचार करीत बसली होती तेथें येऊन ) शाहजादी ! आप ऐसे गमगीन होके बेठते हो इस लिये अम्मासाहेब ( नूरमहिताब हिची आई ) बहोत दिलगिर है और शहान शहाके दिलकूभी चैन नहीं है इसवास्ते मेरी आपको अर्ज है के आपने गमगिनी छोडकर खुशाली रखनेकों चाहिये.

**नूर०**—मेरे प्यारी सकीना तूं बडी अकलकी बातें करती है लेकीन मैं क्या करूं, जिस दिनसें प्यारेकी शिक्ल देखी उस दिनसें मेरा आरामो चैन सब गुम होगया.

**रेखता.**

करके तन हा मुजे ओ प्यारा गुलफाम गया ॥
गंम अलम सोंफ गया ताकतो आराम गया ॥
क्या उसें खत मै लिखूं क्या मै जबांसें बोलूं ॥
कासदा अबतक नफिरा लेके जो पेगाम गया ॥
वायेदा कर जो गया सबकों न आया हरगीज ॥
इन्तजारीमें तेरी मुजको ऐ जाहांदार शाम गया ॥

**सकीना०**—और थोडे दिनतक आपकों गमखाना चाहिये, थोडीही मुदतमे वो आन पोहुचेंगे.

नूरमाहि०—मैने उनकों बहोत समजाया लेकीन मेरा कहेना न मानकर चले गये और मुजको ऐसा अफसोस करनेकों लगाया.

गजल—काफी.

दिल हीज्रमें दिलदारके दिवाना होगया ॥
सर अश्क चस्मोसें गिरा दुर दाना होगया ॥
येखलाससें जाहांदार ओ बैठा न मेरे पास ॥
फुरकतमें उस्के हमकों अब गमखाना होगया ॥
गुलशने दिलकों मेरे उस्ने किया नाराज ॥
गुल गये मुरझाके सब विराना होगया ॥
नहोशथी उस्मे जरी जब आया इस तरफ ॥
एकब एक कीस शहेरसें फिर शाना होगया.

गजल—भैरवी.

बसत मन ये दिले आशक कहां जाता रहा ॥
क्या हुवा यारों कहां वो मेहरखां जाता रहा ॥
जिस्की है तस्वीर मेरे दिलपे नकशे हजर ॥
दूर आखोंसे कहां वो हकदार जाता रहा ॥
इस जबासें क्या बया हो यारकी तारीफ मुझे ॥
दिलकों पुछा चाहिये वो दिलदार कहां जाता रहा ॥
थ्यां नहीं फुरसत मुझे गमसें जिगर जलाय करूं ॥
आंखोंसे वो सुरते आबेरवा जातां रहा ॥
मुबत्ला दिलकों किया है घायल जिसकी शिकुनें ॥
छोडकर मुजको यहां वो दिलोजान कहां जातां रहा ॥

( नूरजहानहिची आई येऊन ).

पिरोजा०—बेटी! तेरी गमगिनीसे हमारे जिगर कत्तल

होके हमारे होश उड गये हैं अब तूं सबुरी अख्त्यार करेगी ऐसी मै चाहती हुं.

**नूरम०**—अफसोस ! अम्मा साहेब ! क्या सबुरी अख्त्यार करूं मेरा जिगर जलके खाक होगया है.

**पिरो०**—तूं कौं उस्की उपर इतनी फिदा होती है मर्दमानेका दिल कैसा होता है वो तुजको कुच खबर है. मैने ऐसा सुनाहुं के कोई दुसरी शहाजादीके साथ वो प्यार मे गिरफतार होगया है.

**नूरम०**—नहीं नहीं ! अम्मासाहेब ऐसी बात जिनहार न हो सकेगी.

**पिरो०**—बेटी ! अबतक तूं नादान है फिर आपसेंही तुजको मालुम होजायगी. ( जाते )

**नूरम०**—( स्वतांशींच ) क्या ये बात सच्ची होयगी. अफसोस ! सद अफसोस ! !

**रेखता.**

ऐ सितमगर भला तुने ये क्या काम किया ॥
दिल मेरा लेके मुजे मुफत्में बदनाम किया ॥
तूं तो है चैनमे दिन रात और मैने ॥
गमके हातोसें न एक रोजभी आराम किया ॥
वायदा आनेका किया तुनें न आया सबको ॥
बस्लका तेरे अबस मैने सरंजाम किया ॥
वायदा जूठसेंखुरसद न किया तूं अफसोस ॥
हमने सो बारा तेरे मिलने कापैगाम किया ॥

**गजल—देस.**

( गई एकबएक जो हवा पलट—येराह. )

**मुझे अब तलक नथी कुच खबर ॥**

केहै तुज मे कुचभी वफा नयीं ॥
मुझे सख्ती में करके मुबातिला ॥
मुझे अबतो युं तुं सता नहीं ॥
मैने तुजसे दायम वफाईकी ॥
नतो तुंने मेरी कुछ दाद ली ॥
वल्लाह ये जाने मन सनम ॥
मेरे लायक येहींथी सजा नहीं ॥
न किसिको मैने दिल दिया ॥
न किसिकी की हमने दिलबरी ॥
कतु मोहोबतसें नथी बातकी ॥
कोई मेरा तेरे सिवा नहीं ॥
अरे अफसोस सदके तूं भुल गया ॥
अपने कौल और पैमानसें ॥
मेरे दिलका लुटा करारो चैन ॥
कहो कैसा पाऊ आरामको ॥
गमे हिज्रसे तो मै जल चुकी ॥
अब मुजको जियादा जला नहीं ॥

पुढें कांहीं दिवसांनीं जाहांदार माहमुदशहाच्या राज्यांत येऊन पोहोंचला. जाहांदार नूरजहान हीसह सुखरूप येऊन पोंचला ही बातमी माहमुदशहास समजतांच त्यास मोठा आनंद होऊन त्यानें ती खबर आपल्या पित्यास कळविली. नंतर हुमायूनशहा, माहमूदशहा, व अमीरउमराव जाहांदारशहास सामोरे गेले व मोठ्या सत्कारानें त्यास आपल्या महालीं घेऊन गेले. तेव्हां माहमुदशहानें गुडघे टेंकून जाहांदारशहाच्या हाताचें चुंबन घेतलें. नंतर जाहांदार हुमायुनशहास भेटला. इकडे

नूरजहान हिचा मेणा जनानखान्यांत नेला तेथें उतरून आपल्या सासूच्या चरणीं लागली. नंतर तिच्या सख्या व दासी तीस कडकडून भेटल्या. इतक्यांत माहामूदशहा आल्याची खबर समजतांच नूरजहान धांवत गेली व आपल्या प्रियपतीच्या गळ्यास दृढालिंगन देऊन तिनें फार शोक केला. तेव्हां माहमूदशहानें तिची समजूत करून तिला शांत केलें.

कांहीं वेळानें हुमायूनशहा व जाहांदार हे तेथें आले, तेव्हां नूरजहानही आपल्या सासऱ्याच्या चरणीं लागली व ह्मणाली जाहांदारशहा हे मला दुसरा जन्म देणारे पिता आहेत. नंतर हुमायूनशहानें व मामूदशहानें जाहांदार याचे फार फार उपकार मानिले व सर्व शहरांत आनंदोत्सव करण्याचा हुकूम दिला व कांहीं दिवसपर्यंत जाहांदारशहास तेथें राहण्याची विनंती केली. सांयकाळीं भोजनें वगैरे आटोपल्यावर जाहांदार यानें तेथून निघाल्यापासूनची सर्व हकिकत त्यांस सांगितली. ती ऐकून त्यांस मोठें आश्चर्य व खेद झाला; व त्यांनीं जाहांदार याची फार तारीफ केली. जाहांदार यास नित्य एकेका सरदारादिकांकडून मेजवानीचें आमंत्रण येत असे व शहरांत पाहण्यासारखीं स्थळें त्यास दाखवीत असत. एके दिवशीं एका सरदारानें आपले येथें मेजवानीचें आमंत्रण दिलें. तेथें भोजन वगैरे आटोपल्यावर त्या सरदारानें त्याची परिक्षा पाहण्याकरितां सहज ह्मटलें कीं, मला एकानें प्रश्न केला आहे कीं, उच्छिष्ट व ओकारी हीं अपवित्र असतां पवित्र कशी आहेत ह्याचा कोणी खुलासा केल्यास मी फार आभारी होईन. तेव्हां जाहांदार ह्मणाला अहो त्यांत

काय आहे, पशू पक्ष्यांचें उदाहरण घ्या ह्मणजे झालें ! इतर उच्छिष्ट अपवित्र परंतु वासरानें दूध प्याल्यावर तेंच दूध काढून आपण पवित्र मानून पितों; तसेंच मधुमक्षिका शतशः फुलांतील मध शोषण करून आपल्या उदरांत सांठविते तीच मग आपल्या गृहाकडे परतून आल्यावर पोव्ळ्यांत ओकते ती मधूर मध पवित्र आहे हें सांगणें नलगे. हें ऐकून सर्वांनीं त्याची फार तारीफ केली. नंतर तेथून जाहांदार राजवाड्याकडे निघून गेला व आतां येथून जलदी निघण्याची तयारी करावी, फार दिवस राहूं नये. कारण माझी प्रिया तेथें वाट पहात असेल हा विचार त्याच्या मनांत आला.

जाहां०—( नूरजहान हिची आठवण झाल्यानें ह्मणतो. )

रेखता.

फिर दोबारा माशुकका दिलमें असर पैदा हुवा ॥
राहमें तेरे मोहोब्बतका शजर पैदा हुवा ॥
इष्कजारी रात दिन है चष्मगिरी यासें मेरे ॥
इस कदर रोयाके माशुकोंका गोहर पैदा हुवा ॥
देखकर गुलशनमें कहते बुलबुले उसें माहसें ॥
क्या चमनमें दुसरा रस्के कमर पैदा हुवा ॥
अब मुजे तेरे बजूज आता नहीं आरामो चैन ॥
फिर तुझें कौंकर जुदाईसें सबर पैदा हुवा ॥
जखमा ले होगयें हैं हम छिलछिलके सारे जिस्मके ॥
दरद दिल जाहांदार सामों असर पैदा हुवा ॥ ४ ॥

नंतर कांहीं दिवसांनीं जाहांदार यानें नूरमहीताब हीस एक पत्र लिहून तें एका जासुदा बरोबर तिजकडे पाठविलें.

दोहरे.

हंसा चाहत मान सर कपिया चाहत मेह ॥
मछुवा चाहत नीरकों, हम चाहत तुज देह ॥
प्यासा चाहत निरकों, थका चाहत छांय ॥
हम चाहत तुम मिलनकों, लंबा करके बांय ॥
दखी हुं तो उड चलूं, घडी न रखुं धीर ॥
जौं जौं माशुक याद हो, तौं लगे कलेजे तीर ॥
कागज थोडा लिखना बात, उसपे लिखा न जाय ॥
रत्नागर सागर भरा, घटमें न रहे जाय ॥

नूरमहितान हीस पत्र मिळतांच तिनें मोठ्या प्रेमानें त्या पत्राचें चुंबन घेऊन फोडून वाचलें त्या दिवसापासून मग तिचा चेहरा प्रफुल्लित दिसूं लागला. ( सकीना व अमीना येतात. )

**सकी०**—आज तर शहाजादीचा चेहरा खुष दिसत आहे.

**अमी०**—अग तुला ठाऊक नाहीं का ! ! प्रिय पात्राचें पत्र आलें ह्मणून ही तबियत खुष आहे हो ! !

**सकी०**—मग तर दृढालिंगनाला थोडेच दिवस राहिले आहेत ! आमचेंही नशीब उघडेल हो आतां ! ! शाहजादीची अमीरजादी थोडक्याच दिवसांत होतील. मग ह्या गरीबांची आठवण होईल किंवा नाहीं कोणजाणें !

**नूरम०**—तुह्मी माझी थट्टा न कराल तर येथें का दुसरें कोणी आहे करा आपल्या मनाला वाटेल तसें ह्मणा माझी कांहीं ना नाहीं.

**अमी०**—आपणांस जर आमच्या बोलण्याचा राग येतसेल तर आह्मीं क्षमा मागतों.

नूरम०—वेड्या खऱ्या, मला मुळींच राग येणार नाहीं, तुह्मी हवें तें बोला.

सखी०—( तिच्या आंगास हात लावून ) अबबब ! ! शहाजादी तुझें शरीर हें इतकें उष्ण कां लागतें बरें ? ज्वरांश तर झाला नाहींना ?

अमी.-अग तुला ठाऊक नाहीं, ज्वरांश तर खराच परंतु तो हलकासलका ज्वर नाहीं त्यास कामज्वर असें ह्मणतात.

सखी०—मग ह्यास उपाय ?

अमी०—ह्यास उपाय काय प्रियपतीच्या शरिरास दृढालिंगन होईल तेव्हांच त्याची शांति होईल, एरवीं औषधोपचारानें कांहीं होणार नाहीं.

इकडे जाहांदारशहा यानें हुमायूनशहाची व महामूद्शहाची रजा घेऊन बोखारा शहरास जावयास निघाला, तेव्हां जातांनां नूरजहान व महामूद्शहा ह्मणतात.

**गजल.**

डोरी तुह्मारे हातमें हमभी तुह्मारे हे ॥
सारां भरोसा तुमपे हमारा तुम हमारे हैं ॥
भाई तह्मारी चाह हमको दिलमे है ॥
इस वास्ते हम आपके बंदे बिचारे है ॥
जब तक इस जहांमें रहें भुलें न आपको ॥
मरनेके बाद आपके हमभी सिधारे है ॥
सेवक तुह्मारे यादमें रहेते है सब रोज ॥
दरसनकी आस आपकी दिलमे हमारे है ॥

नंतर माहमूद्शहा व दुसरे सरदार जाहांदारशहा यास दूरपर्यंत पोंचविण्यास आले होते, त्या सर्वांचा निरोप घेऊन व शेवटीं माहमूद्शहास भेटून त्यानें सर्वांस

मार्गे जाण्यास सांगितलें व आपण पुढें चालता झाला. आठवे दिवशीं बुखारा शहरास पोंचल्यावर एका मैदानांत त्यानें आपला तंबू ठोकण्यास हुकूम केला. माहमूदशहानें जाहांदार यास थेट घरापर्यंत पोंचविण्याकरितां बरोबर ४०० ( चारशें ) हत्यारबंद मनुष्यें दिलीं होतीं. त्या सर्वांनीं आपापली व्यवस्था लावल्यावर आपलीं भोजनें उरकलीं, नंतर कांहीं सरदार लोक वगैरे येऊन जाहांदार याच्या तंबूंत गोष्टी बोलत बसले. पुढें जाहांदार यानें नूरमहिताब हिच्या पित्यास पत्र लिहून पाठविलें कीं, मी तुमच्या कन्येस वरण्यास आलों आहे व तुमचा जो प्रश्न आहे त्याचा खुलासा करण्यास सिद्ध आहे." हें पत्र पोंचतांच नूरमहिताब हिच्या पित्यानें तें पत्र आपल्या दरबारांतील लोकांस दाखविलें व दुसरे दिवशीं एक कचेरी भरण्याचा हुकूम केला, त्याप्रमाणें जाहांदार यास सन्मानानें आणण्याकरितां आपल्या सरदारांस सामोरे पाठविलें. जाहांदार कचेरींत येतांच त्यास सर्वांनीं खडी ताजीम दिली, नंतर जाहांदार पुढें होऊन त्यानें नूरमहिताब हिच्या पित्याच्या हस्ताचें चुंबन केलें व इतरांचे मुजरे घेऊन त्यास बसण्याकरितां जें सिंहासन ठेविलें होतें त्याजवर तो बसला. नंतर बादशहानें त्यास कुशल प्रश्न विचारिले मग त्यास गुहेची हकिकत सांगण्यास सांगितली, त्याचे पूर्वीं प्रधान उठून उभा राहिला व त्यानें जल्लादास* हांक मारून जाहांदार याचे पाठीमागें नग्न तलवार घेऊन उभा केला व ह्मणाला जाहांदारशहा प्रथम आपण माझ्या बोलण्याकडे लक्ष्य द्यावें. नंतर

* शिरच्छेद करणारा मांग.

आपली हकिकत सांगावी आमचा पूर्वीं पासून असा परिपाठ चालत आला आहे कीं जो त्या गुहेची व तेथें जाण्याच्या मार्गाची वगैरे खरी हकिकत सांगेल त्यासच बादशहा आपली प्रिय कन्या नूरमहिताब अर्पण करील व जो हकिकत सांगणार नाहीं तो बादशहाचा अपराधी ठरेल व त्याचे हा पाठीमागें जल्लाद उभा राहिला आहे तो सरकारचा हुकूम होतांक्षणींच शीर व धड निराळें करील तर आपला नीट विचार करून सांगा, नाहीं तर आल्या मार्गानें गुपचुप चालते व्हा. हें सर्व ऐकून घेऊन जाहांदार ह्मणाला ती हकिकत तर काय परंतु तशी कृति तुह्मांस हुबेहुब आपल्या डोळ्यानीं पाहण्याची असली तरी मी येथें करून दाखवीन. दुसरें हा तुह्मी तर एकच मनुष्य माझा शिरच्छेद करण्याकरितां उभा केला आहे, परंतु तुमच्या राज्यांतील सर्व मनुष्यें जरी माझ्या आंगावर तुटून पडलीं तरी देखील " इलाही " च्या कृपेनें माझ्या एका केंसास धक्का लागणार नाहीं. पाहिजे असेल तर थोडासा तुह्मांस चमत्कार दाखवितों असें ह्मणून त्यानें आपली सुलेमानी समशेर म्यानांतून काढून दोन तीन वेळ आपल्या सभोवतीं फिरविल्याबरोबर सर्व जण अंध बनून गेले एक बादशहा मात्र निराळा होता. तसे सर्वजण त्याची क्षमा मागूं लागले. नंतर बादशहा ह्मणाला, आतां तूं ह्यांचे डोळे रोषन कर ह्यांस दुःख देऊं नको. जाहांदार यानें बादशहाची आज्ञा शिरसामान्य करून आपली तरवार म्यानांत घातली तसे सर्व जणांस दिसूं लागलें. नंतर त्यानें त्या गुहेविषयींची सर्व हकिकत सांगितली. ती ऐकल्याबरोबर बादशहानें सिंहासनावरून खालीं उडी टाकली, तसे

सर्व लोक उठून उभे राहिले व बादशहा जाहांदार यास कडकडून भेटला व ह्मणाला आजपासून माझ्या डोक्यावरच्या अनेक हत्त्यांचें ओझें दूर झालें व या उपर कोणत्याही मनुष्याची हत्त्या मजपासून होण्याची टळली ह्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें व आजपासून प्रिय नुरमहिताब ही तुमची आहे इतकें ह्मणून जाहांदार यास आपल्या सिंहासनावर नेऊन बसविण्यास लागला; तेव्हां जाहांदार यानें त्यास मना करून त्यासच सिंहासनावर बसण्याची विनंती केली व आपण आपले टिकाणीं बसला, नंतर प्रधानादिकांनीं जाहांदार ह्याच्या हस्ताचें चुंबन घेतलें. पुढें काजीस बोलावून जाहांदार व नूरमहिताब ह्यांचा विवाह केला. बादशहानें जांवयास पुष्कळ जवाहीरा वगैरे नजराणा दिला व मुलीसही पुष्कळ द्रव्य दिलें. नंतर जाहांदार कांहीं दिवस सासऱ्याच्या येथें राहून पुढें आपल्या राज्यांत जाण्याविषयीं त्यांचा निरोप घेतला. मग बादशहानें नूरमहिताब हीस तिच्या दासदासींसह मोठ्या इतमामानें पालखींत बसवून जाहांदार याजबरोबर रवाना केली. जाहांदार तेथून निघाला तो एकविसावे दिवशीं सुखरूप बदकशान येथें पोंचला व आपल्या आई बापास भेटला. चंद्रप्रभेनें ( रोशनजहेल ) आपल्या सुनेस पाहिल्याबरोबर तीस अतिशय आनंद झाला. नूरमहिताब आपल्या सासू सासऱ्याच्या चरणीं लागली. त्यांनीं तीस आशिर्वाद दिला. नंतर सर्वजण ईश्वराचा अत्यंत आभार मानून त्याची स्तुति करूं लागलीं.

# स्तुति.

मदत कर मेहेरसें हमकों खुदाया ॥
तेरी दरगाहमें सर है झुकाया ॥ मदत०
दामें फिक्रमेसें हमकों छुडा दे ॥
येह फैलादे बादल जो छांया ॥
हम दाद मागें बंदे यह तेरी ॥
है यारीका सौर उठाया ॥ मदत०
तेरी हस्ती येह तेराही आस्मान ॥
बागे कुदरत तुनें बिछाया ॥
आफ ताबो माहताब अख्तर तेरे ॥
सब जमाना तुने जमाया ॥ मद०
जानकी बक्षेस तेरी ही यजदां ॥
तुनेही येह जगको जिलाया ॥
जीनो परी देवोंका तुंही है साहेब ॥
और तुनेही इन्सा बनाया ॥ मदत०
इन्साफका तुही मालिक है आदील ॥
नूर रहेमका तुने चमकाया ॥
दोनो जाहांका है परवर तुंही ॥
तुने लुत्फका बारा बर साया ॥ मदत०
येह फइदे मुसिबतसें दे तूं रहाई ॥
है जुल्मनें हमको सताया ॥
कदम बोसें करतें है तेरे ॥
रख हमपे खुषीका तुं सांया ॥ मदत०

समाप्त.

# पुरंदरे
आणि
# कंपनी